३/८५६

॥ श्री ॥

# नारायणबुवा

ऊर्फ

# श्रीपद्मनाभस्वामी

## यांचें चरित्र.

१००

स्वीकारल्याची तारीख १२ फेब्रुआरी १९०९
रजिष्टर नंबर ४४८ / १९०८।९

॥ श्री ॥

# नारायणबुवा ऊर्फ श्रीपद्मनाभस्वामी

## मठ धुळें

# यांचें चरित्र.

लेखक—रा. यशवंत गणेश पुरंदरे, धुळें

धुळें—आत्माराम छापखान्यांत छापिलें.

सर्व हक्क राखून ठेविलें आहेत.

दत्तजयंती १८३०

किंमत ८ आणे.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCY. POONA

# अर्पण पत्र.

श्रीमंत

**रा. रा. सिद्धनाथ धोंडदेव ऊर्फ भय्यासाहेब गरुड**

**बी. ए. वकील**

यांस

त्यांचे ठायीं परोपकारादि स्तुत्य कार्याविषयीं औदार्य,
सौजन्य, विद्येची विशेष अभिरुची, सत्यप्रीती,
कार्यदक्षता, रसिकता, ग्रंथ वाचनालयाचे
ठिकाणीं पूर्ण श्रद्धा व प्रेमादर, इत्यादि
अनेक सद्गुणांचें वास्तव्य जाणून
हा अल्प ग्रंथ परमादरानें
आणि नम्रतेनें त्यांची
संमती घेऊन संतोष-
पूर्वक अर्पण
केला आहे.

धुळें,
दत्तजयंती १८३०

**येशवंत गणेश पुरंदरे.**
पुस्तककर्ता.

# प्रस्तावना.

सर्व जगतांत दु:खसंबंधरहित संपूर्ण सुखाच्या ऐश्वर्यानें मंडित असा कोण आहे, असें जर आपण सूक्ष्म रीतीनें विचार करून पाहूं लागलों तर तशा प्रकारचा प्राणी फार विरळा. परंतु सुख प्राप्त होण्याकारितां आपआपल्या बुद्धीप्रमाणें प्रत्येकजण लौकिक उपाय करीत असतोच. जगांत जीं कांहीं मोठीं सत्कृत्यें झालीं आहेत तीं थोर सद्गृहस्थाकडूनच झालेलीं आहेत. निर्मळ अंत:करणाचे असे कित्येक सद्गृहस्थ होऊन गेले कीं, त्यांचे हातून वाईट असें कोणाचेंच झालें नाहीं. उलट काया-वाचामनें करून झटून सत्कृत्येंच त्यांनीं केलेलीं आहेत. कोणी विद्यादानाकडे, तर कोणी परोपकारार्थ तलाव, विहीरी, धर्मशाळा देवालयें, वगैरे बांधण्याकडे आपले द्रव्याचा व्यय करितात. आमचे आजे कै. श्री. **सखाराम आप्पाजी पुरंदरे** जाहागि-दार हे आपल्या वेळीं वैभव व संपत्ति हीं भोगून असत. त्यांनीं येथें श्रीराममंदिर बांधून आपले संपत्तीचा सद्व्यय तर केलाच, पण त्यामुळें आपलें नांवही ते ठेऊन गेले. आपलें नांव कांहीं दिवस तरी आपले मागें राहावे असें प्रत्येक मनुष्यास वाटत असतें. असें वाटणें सोपें, परंतु त्याप्रमाणें घडवून आणणें फार कठीण आहे, व ह्मणूनच जे आपला कीर्तिपारिमल मागे ठेऊन गेले तेच यथार्थतेनें थोर होत. आमच्या आजांनीं श्रीराम-मूर्तिची स्थापना करून अर्चा केली. मूर्ति स्थापन करण्याचा संकल्प दोन प्रकारचा आहे. एक काम्य आणि दुसरा निष्काम;

ह्मणजे फक्त ईश्वरप्राप्ती या दोन्ही प्रकारांत उत्सर्गाचा समावेश नाहीं. निर्णयसिंधु' व धर्मसिंधु' या दोन्ही ग्रंथांत देवालयाचा उत्सर्ग सांगितला नसून उलट उत्सर्गाचा स्पष्टपणें निषेध केलेला आहे. असो वर सांगितल्याप्रमाणें ति. कै. सखारामपंतांनीं मूर्तिची स्थापना वेदोक्त मंत्रद्वारें मोठी आर्चा करून आपलें नांव चिरकाल राहिल अशी तजविज करून ठेविली. वेदोक्त मंत्रांनीं आर्चा व मूर्तिची प्रतिष्ठा झाल्यावर देवस्थानाची व्यवस्था मालकीहक्कानें वहिवाटींत ठेवून त्यांनीं नारायणबोवा-ब्रह्मचारी नामें सत्पात्र ब्राह्मणास पुजारी नेमिलें. त्यांनीं एक तप आमचे मंदिरांत घालवून पुजा अर्चा यथास्थित चालविली. त्यांनीं श्रीरामसेवेंत उत्तम प्रकारें काळ घालविला. त्यांचा स्वभाव फार तापट असे, परंतु श्रीरामसेवेंत त्यांचा काल गेल्यामुळें ते स्तुतीस पात्र आहेत. त्यांनीं एखादे वेळीं गंधाची पुजा चढवावी ती अशी कीं, ते वेळीं कपडे, अलंकार सर्व गंधाचे असून पाहाणारास ते खरोखरीचेच कपडे व अलंकार आहेत कीं काय असें वाटावें. त्यांनीं पूजा चढविली ह्मणजे श्रीरामदर्शनास भाविक मंडळीच्या झुंडीच्या झुंडी लोटून गंधाची पूजा बांधण्याबद्दल तारीफ करून त्यांची धन्यता गात असत. त्यांचे तापट स्वभावामुळें मोरो सखाराम उर्फ भाऊसाहेब पुरंदरे ह्यांनीं त्यांस दुसरीकडे सोय पाहण्यास सांगितलें. श्रीराम सेवेंत त्यांचे एक तप झाल्यामुळें मंदिरांतून प्रयाण झाल्यानंतर त्यांचें लक्ष

---

१ नामदार विश्वनाथ नारायण मंडलिक वकील हायकोर्ट मुंबई ह्यांचे हिंदुधर्मशास्त्र पृष्ठ २७४ पहा.

नवीन मंदीर बांधून श्रीरामाच्या मूर्ति स्थापन कराव्या इकडे लागलें, ह्मणून त्यांनीं खटपट सुरु केली. भाऊसाहेबांनींहि आपले थोर स्वभावास अनुसरून श्रीराममंदीर नवीन होत आहे ह्मणून संतोष मानून त्यास वर्गणीद्वारा मदत केली. उदार अंतःकरणाचे थोर लोकांस असें वाटणें साहजिक आहे. त्यांचे प्रयाणानंतर आमचे मंदीरांत कांहीं दिवस बापुचितारी ह्मणून एक पुजारी होता. तो चित्रकलेंत फार निष्णात असे, येथील श्री बालाजीचे रथाला रंग सदरच्या बापुचितान्यानेंच दिला आहे. हे लक्षांत घेतलें ह्मणजे त्याचे चित्रकलेबद्दल सहज अटकळ बांधितां येईल. ह्यानंतर लवकरच मोरो सखाराम कैलासवासी झाले. त्यांच्या सुशील पत्नी वेणूबाई पुरंदरे ह्या नाशिक येथें गेल्यावर तेथून त्यांनीं आग्रहानें आमचे चरित्रनायक नारायण बोवा यांना घेऊन येऊन त्यांचेवर पूजा अर्चादि मंदिराची सर्व व्यवस्था सोंपविली. नारायणबोवांनीं सदर राममंदिरांत श्रीरामसेवेंत तीन तपें घालविली. त्या दरम्यान त्यांनीं केलेली श्रीरामाची एकनिष्ठभक्ति, त्यास झालेला श्रीनृसिंव्ह सरस्वतीचा उपदेश, त्यांनीं वेळोवेळीं केलेला परोपकार आणि त्यांचे वेळीं घडलेले अमानुष चमत्कार, इत्यादिकांचें संकलित वृत्त यथामती चरित्ररूपानें रचून सूज्ञ वाचकांपुढें ठेवण्याची आमची इच्छा आहे. अशा साधुपुरुषाचें चरित्र लिहीण्याची योग्यता आह्मांस नाहीं, तथापि त्यांच्याच स्फूर्तीनें हा प्रयत्न करित आहों. वस्तुतः सत्पुरुषाचें चरित्र लिहून तें लोकांस मान्य होण्यास लिहिणाऱ्याचे अंगीं पात्रता लागते. तितकी पात्रता कोणत्याही दृष्टीनें आमच्यांत नाहीं, हें प्रांजलपणें आह्मी कबूल करतों. तथापि सत्पुरु-

याचे गुणानुवाद, हवे त्यानें गाण्यास प्रत्यवाय नाहीं या दृष्टीनें आह्मीं **श्रीनारायणबोवा महाराज** [पद्मनाभस्वामी] यांची ही चरित्रलेखनरुपसेवा करण्याचें धाडस करित आहों. प्रयत्न पहिलाच आहे. साध्यासाध्याचा विचार वाचकांचा. अशा सत्पुरुषचारित्राचा होईल तितका फैलाव होऊन, लोकांचे मनांत वाचनद्वारा श्रद्धा व भक्ति ज्यास्त वाढो! श्रीरामदास, श्रीतुकाराम श्रीज्ञानेश्वरमहाराज वगैरे विभूतिंचीं चरित्रें वांचून सर्वांचे मनांस जसा आल्हाद होतो तसाच **श्रीनारायणबोवा** उर्फ **पद्मनाभस्वामी**महाराज यांचे हें अल्प चरित्र वांचून होवो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

१ या ग्रंथलेखनाचे कामीं मला **जीवितकर्तव्य, केसरी** चे **निवडक निबंध, लक्ष्मी** आणि **सरस्वती** ह्या ग्रंथाचा उपयोग झाला, त्याप्रमाणें **मुमुक्षु** मधील धार्मिक लेख आणि खानदेशवैभवांत आलेली संक्षिप्त हकीगत यांचा हि उपयोग झाला त्या त्या ग्रंथाबद्दल व वृत्तपत्राबद्दल कृतज्ञता बुद्धी प्रगट करणें हें माझें पवित्र कर्तव्य आहे.

२ ग्रंथ समग्र लिहिल्यानंतर आमचे येथील सद्गृहस्थ रा. बाळकृष्ण माधव किल्लेदार पे. सबरजिष्ट्रार आणि रा. दत्तात्रय गोपाळ कुळकर्णी व्हेटरनरी आफिसर, व गुरुभक्तिपरायण वासुदेव बापाजी रुद्र यांस त्याची हस्तलिखीत प्रत समग्र वांचून दाखविली, ती त्यांनीं साग्र ऐकून घेऊन आह्मांस वेळोवेळीं ज्या कांहीं उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्याचप्रमाणें रा. सखाराम केशव जोगळेकर लो. ओव्हरसियर व रा. वासुदेव महादेव भावे या दोघांनीं पुस्तक तपासण्याचें कामीं साहाय दिले ह्मणून त्यांचा ही मी मित्रत्वाच्या नात्यानें फार आभारी आहे.

# उपोद्धात.

## देवास प्रिय कोण?

भक्त महिमा, हा अगम्य तसाच अतर्क्य ही आहे. ह्या भक्तांचा थाग लागणें हें सोपें काम नाहीं. प्रत्यक्ष परमेश्वर सुद्धां आपल्या भक्तांची प्राप्ति व्हावी ह्मणून वाट पाहत असतो. परमेश्वरास तरि शोभा भक्तापासूनच असणार. कायावाचामनें करून जे भक्त परमेश्वराच्या सगुणरूपाचें ध्यान करितात, त्याची अराधना करितात, चित्त स्थिर करून नित्य अत्यंत श्रद्धापूर्वक त्याला भजतात, तेच भक्त ईश्वरास प्रिय होतात. आपल्या महाराष्ट्रीय भरतभूमींत जे जे साधु संत होऊन गेले, त्यांनीं एक धार्मिक विषय हातीं घेऊन परमार्थ प्रतिपादन करण्याचा जो अनादिकालापासून चालत आलेला संप्रदाय, प्रासादिक व अमृतोपमवाणीनें कथन केला आहे, त्यामध्यें कर्ममार्गापेक्षां भक्तिमार्गालाच प्राधान्य दिलें आहे. ही जी त्या संतांनीं अलौकिक कामगिरी केली तिचा सूक्ष्म विचार केला असतां, ईश्वराच्या भक्तिचीच जास्त अवश्यकता आहे, कारण तिच्या योगानें भगवत्प्रसाद होतो व भगवत्प्रसाद झाल्या नंतर कोणत्याहि कार्याची सिद्धि होण्याला वेळ लागत नाहीं. परंतु ह्या गोष्टी घडण्यास भक्तांचें ठिकाणीं एकचित्त असून ईश्वराचें अखंड चिंतन, सद्भावयुक्त भजन, कर्मफलाचें समर्पण, नम्रबुद्धि, हीं असावीं लागतात. अनन्य भावानें सप्रेम अंतःकरणानें आणि

अत्यंत कळवळ्यानें जो परमेश्वरास भजतो तोच भक्त. भक्ति ह्मणजे भक्तांचे ठायीं असलेलें परमेश्वराचें निरंतर वास्तव्य. तिच्याच योगानें परमेश्वर भक्ताच्या स्वाधीन होतो. भाव व भक्ती ह्या दोहोंचें जोडपें जेव्हां संताजवळ निरंतर नांदतें तेव्हांच ते भक्त ह्मणविले जातात. भक्त ह्मणविणारे आहेत परंतु त्यांची परमेश्वराचें ठायीं श्रद्धा नाहीं तर ती भक्ती काय उपयोगाची. तसेंच भक्ति आहे पण भक्त अश्रद्धाळू आहे तरी हि तो भक्त काय कामाचा! श्रद्धा ठेऊन, द्वैतभाव माया आणि लोभ सोडून, एकत्व अगर अनेकत्व नवविधा भक्ति मार्गाचे ज्यानें खरे तत्व ओळखिलें, त्यानें देव आपलासाकरून तो आपल्या पवित्रपणानें तीर्थाला ही अश्रयभूत होऊन राहतो व मनाचे विकार दशदिशांस लावितो; आणि भक्ति न करणाऱ्या लोकांस जेव्हां तो भक्ति मार्ग आचरून लोकांसहि त्या मार्गास लावितो तेव्हांच त्याची परमेश्वरास प्रीति उत्पन्न होते. असा भक्त परमेश्वराचा निजध्यास व तोच त्याचे पंचप्राण होत. प्रभूचे ठिकाणीं भक्तांचें शुद्ध चित्त, एकाग्रता प्रेम, तन, मन, धन, असून त्या भक्तानें ईश्वरनामसंकीर्तनमंगलनामाचा सदां सर्वकाळ उच्चार करून भक्ति केली ह्मणजे त्यास श्रीगुरुकृपा होऊन भगवत्प्रसाद होण्यास वेळ लागत नाहीं. यावरून आपल्यास कळून येईल कीं एकाग्रमनानें व प्रेमभावानें भक्ति करणाराच भक्त देवाला प्रिय होतो. भगवान् श्रीकृष्ण ह्मणतात, मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते। श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः। ह्मणजे जे माझे ठिकाणीं चित्त स्थिर करून नित्य युक्त होत्साते अत्यंत श्रद्धा पूर्वक मला भजतात, त्यांनीं भक्तीयोग खरा

जाणिला असे मी समजतों. हें जें मोठ्या कळवळयानें भक्त-श्रेष्ठ अर्जून यांस सांगितलें आहे, त्याचा विचार केला ह्मणजे परमेश्वराला एक भक्ति प्रिय असून तिच्या पायीं तो भक्ताचा भक्त होतो; तेंहि सर्वांशीं खरें आहे. सूर्याजवळ रात्र आणि दिवस हा भेद मुळींच नसतो त्याप्रमाणें कोणी ज्ञानरूप होऊन ही माझ्या भजनांत जेव्हां आपला काळ घालवितो व सदासर्वदां माझे चिंतनीं निमग्न असतो तेव्हां ईश्वरार्पण बुद्धिनें आत्मचिंत-नाविषयीं लोलूप होऊन ऐहिक आणि पारमार्थिक सुखाचा अनुभव घेतां घेतां ज्ञानरूप होतो आणि वैराग्य ज्ञान प्राप्त झालें असतां आपल्या सामर्थ्यानें जो ईश्वरी अवतार बनतो तोच संत अगर भक्त. त्या भक्तासारखे परमेश्वरास दुसरे आवडतें दैवत नाहीं. यावरून नामसंकीर्तनाचा महिमा किती श्रेष्ठ, पवित्र व सुखकर आहे हें प्रत्येकाच्या सहजच लक्षांत येणार आहे.

धुळें,<br>
दत्तजयंती १८३०

यशवंत गणेश पुरंदरे.

## नारायणबुवा (श्री पद्मनाभस्वामी) धुळे.



॥ नाराणबुवा ॥ श्रीपद्मनाभस्वामी धुळे ॥

जन्म. श. १७४९. मृत्यु वैशाख शु. १२ श. १८२३

# नारायणबुवा (श्रीपद्मनाभस्वामी)

## यांचें चरित्र.

### नारायण बोवांची मूळ पीठिका.

सुखाची प्राप्ति आणि दुःखाचा परिहार व्हावा ह्मणून अखिल प्राणी सर्वदां यत्न करितात. मात्र त्यांत अविनाश सुखाकरितां यत्न करणारे फार विरळा; अविनाश सुख मिळविण्याचे मार्ग अनेक आहेत; त्यापैकीं भक्तिमार्ग हा एक आहे. आजपर्यंत ज्यांनीं ह्या मार्गाचें अवलंबन केलें त्यांना इष्ट सुखाचा लाभ झाला, व ते पुरुष जनसमूहास वंद्य झाले. अशा साधुपुरुषांचीं चरित्रें लोकांना वंद्य असतात ह्मणून आज आह्मी येथील ईशभक्तिपरायण नारायणबोवा ह्यांचे चरित्र सादर करितों.

ह्यांचें मूळ राहण्याचें ठिकाण **औरंगाबाद जिल्हा गाणगापुर** हे होय. ह्यांच्या तीर्थरुपाचें नांव रघुनाथपंत, मातोश्रीचें नांव भागीरथीबाई व उपनांव रुद्र. रघुनाथपंतास चार मुलें होतीं: मल्हारराव उर्फ बापाजी, शिवरामपंत उर्फ बाबाजी, नारायणराव व केशवराव. ह्यापैकीं चरित्रनायक नारायणराव ह्यांचा जन्म शके १७४९ त झाला. रघुनाथपंत गाणगापुरास जकातदार होते. त्यांना ह्यावेळीं काळ चांगला अनुकूल होता, ह्मणून त्यांचे पदरीं चाकरमाणसें असून ते खाऊनपिऊन सुखी होते. रघुनाथपंत पुढें लवकरच निवर्तल्यामुळें कुटुंब अगदीं

उघडें पडलें. नंतर भागीरथीबाई आपल्या मुलांसह नगर जिल्ह्यांतील वरखेडे गांवीं आपल्या बापाच्या घरीं आल्या. रघुनाथपंत मूळचे स्मार्त होते; परंतु भागिरथीबाईचे तीर्थरुप हे वैष्णव असल्यामुळें व त्यांचे येथें भागिरथीबाई कांहीं काळ राहिल्यामुळें त्यांची मुलें विष्णुउपासक झालीं. पुढें लौकरच मल्हारराव व शिवरामपंत ह्यांस नौकरी लागली; त्यावेळीं नारायणराव अल्पवयी होते आणि केशवराव तर लहान असतांच निवर्तले होते. नौकरी लागल्यामुळें सर्व कुटुंब नाशिक येथें आलें. तेव्हांपासून नारायणरावांचें चरित्रास आरंभ झाला. नारायणरावाचा आवाज बाळपणापासूनच मोहक होता. हे लहानपणीं लुटुपुटूचा विणा घेऊन कथेकऱ्याची नकल करीत; पुढें दिवसेंदिवस ह्यांना गाण्याचा नाद लागत चालला व शेवटीं मातोश्रीचे आज्ञेवरून ते प्रसिद्ध कीर्तनकार त्र्यंबक बोवा नाशिक्कर ह्यांचेजवळ राहिले. त्र्यंबकबोवाचे कीर्तनास श्रोतृसमूह हजार दीड हजार असे. कीर्तनप्रसंगीं नारायणरावाचें स्वतंत्र रीतीनें एखादें तरी पद व्हावयाचेंच. ह्यावेळेपासून नारायणरावास लोक नारायणबोवा ह्मणूं लागले. त्र्यंबकबोवाचे समागमास हे तीन वर्षं होते. ह्या भगवद्भक्ताचे समागमामुळें नारायणबोवाचे मन परमार्थांकडे विशेष लागत चाललें. पुढें त्र्यंबकबोवाचा समागम सुटल्यावर ते प्रसिद्ध गवई लखुनाना पटवर्धन ह्यांचेजवळ गायन शिकले. कर्णमधुर आवाज, शिकण्याची उपजत बुद्धि व उत्कट हौस आणि लखुनानासारखा गायनपटु शिक्षक ह्या तिन्हीची सांगड झाल्यामुळें नारायणबोवा हे चांगले गवई झाले; पुढें आप्तेष्टांचे आग्रहामुळें ह्यांना व्यापारांत पडावें

लागलें. कोणत्याही व्यापारांत दक्षता व पत हीं अवश्य पाहि- जेत. बोवाजवळ असावें तितकें द्रव्य नव्हतें, परंतु दक्षता व पत हें भांडवल विपुल होतें. त्यावेळीं पंचवटींत राहणारे नाना छत्रे व नाशिक येथील बारोट नांवाचा गुजराथी ब्राह्मण ह्या दोघा धनिकांनीं नारायणबोवास मदतीला घेऊन कापड व किरा- ण्याचा व्यापार सर्कतींत आरंभिला. बारोट गुजराथी बराच पैसेकरी होता, परंतु हिशेबी नव्हता. नारायणबोवा हे चांगले हिशेबी होते; परंतु त्यांचा सर्वकाळ स्नानसंध्यादि कर्मांत जात असे, ह्मणून व्यापारांत राहाणें त्यास बरें वाटेना, शेंवटीं ते निरपेक्षबुद्धीनें पंचवटींतील श्रीरामाच्या पुजाऱ्याचे अनुमतानें तेथील यथासांग पूजा करूं लागले. ह्या योगानें नारायणबोवा तेथील लोकांना प्रिय झाले. ही कीर्ति ऐकून वेणूबाई पुरंदरे ह्या स्वतः नाशिक येथें गेल्या व त्यांनीं नारायणबोवास आग्र- हानें धुळयास आणिलें. येथील रामाचे पूजेबद्दल दरमहा चार रुपये व देवापुढील धान्य वगैरे घेऊन त्यांनीं देवळांत रहावें असें वेणूबाई पुरंदरे यांनीं ठरविलें. नारायणबोवा ह्यांना इतर लोकव्यवसायापेक्षां हा व्यवसाय फार आवडला. साधुलोकांना व्यवहारांतल्या गोष्टींची अपेक्षा नसते. नारायणबोवास जरी वेतन देऊन पुजारी केलें होतें तरी तो काल गेला. उत्तरोत्तर नारायणबोवाचा भक्तिमार्ग वाढत गेल्यामुळें नियमाला अनुसरून व वेळेचें महत्व जाणून नारायणबोवा निरपेक्षबुद्धीनें श्रीरामसेवा करूं लागले.

## योग साधनाचा प्रयत्न

श्रीराममंदिरांत पुराण सांगणारे वे. शा. रंगशास्त्री पुराणीक हे जैताने, तालुके पिंपळनेर येथील रहणारे असून फार विद्वान होते. हे भाद्रपद महिन्यांत प्रोष्टपदीचा सप्ताह सांगत असत. ह्मणून ते वेळीं त्यांच्या मुखानें भागवतांतील योगाची माहिती बोवांनीं श्रवण केली. त्यायोगानें बुवांचें लक्ष योगाकडे लागलें; व तेव्हां पासून रंगशास्त्री यांनीं सांगितल्या-प्रमाणें ते योगाभ्यास करूं लागले; परंतु अनुभवाशिवाय व गुरुमुखाशिवाय नुसती शास्त्रांचीं पुस्तकें वांचून ज्ञान होत नाहीं. तशीच योगाची गोष्ट आहे. कोणतीही विद्या साध्य करून घेण्याला गुरु पाहिजे व तो त्या विद्येंत पूर्ण पाहिजे. श्रद्धावान् लोक श्रद्धेला अनुसरून, परिणामाकडे दृष्टी न देतां कार्य करितात. परंतु कधीं कधीं त्यांत त्यांस अपाय होतो. अशीच बोवांची स्थिती झाली. बुवा हे पद्मासन घालून सकाळीं ८ वाजेपासून तों ९॥ वाजे पर्यंत प्राणायाम करण्यास बसत, व रंगशास्त्री यांनीं सांगितल्याप्रमाणें कुंभक प्रत्यहीं जास्त वाढवीत. एके दिवशीं एकादशी होती, बारा वाजले तरी बोवा दार उघडून खोली बाहेर न आल्यामुळें त्यांचे मातोश्रीस फार काळजी लागली. बाहेरून दार उघडण्याचा कोणी प्रयास केल्यास कदाचित् बोवास अपाय होईल या भीतीनें दार उघडण्याचा प्रयत्न कोणीं केला नाहीं. शेवटीं दोन वाजतां बुवानी दार उघडले, बाहेर आले, परंतु ते वात झालेल्या मनुष्या-सारखें करूं लागले. प्रकृति बरीच बिघडली. यामुळें मातोश्री आदिकरून मंडळी घाबरून गेली. शेवटीं ईश्वरावर भरंवसा

ठेऊन स्वस्थ बसणें त्यांस भाग पडलें. पुढें श्रीनृसिंहसरस्वति यांचें धुळें शहरीं आगमन होऊन त्यांनी त्यांस योगाचा सुलभ मार्ग दाखवून दिला.

---

## धुळें शहरीं श्रीनृसिंहसरस्वतीचें प्रथमचें आगमन.

नारायणबोवा श्रीराममंदिरांत पूजाअर्चा करून असतां कांहीं थोड्या काळानें श्रीनृसिंहसरस्वतिस्वामि क्षेत्र आळंदी, हे नारायणबोवा यांजकडे, त्यांना योगाचा सुलभ मार्ग दाखवावा व त्यांची प्रकृति पूर्वीप्रमाणें ताळयावर आणावी, ह्या उद्देशानें आले. त्यांचे ह्या राममंदिरांत बरेंच दिवस वास्तव्य होतें. त्यांना कोणताहि उपसर्ग होऊं नये ह्मणून नगारखान्याचे दुसरे मजल्यावर जागा दिली होती. नित्यनेम, अष्टपद्या, ज्ञानेश्वरी, भजन वगैरे ऐकून त्यांची मर्जी बोवावर सुप्रसन्न होत असे. प्रथमचे वेळीं बोवांची स्नानसंध्यादि कर्मै सुरळीतपणें चालत असल्यामुळें त्यांना महाराजांनीं अनुग्रह देऊन योगाची सुलभ माहिती करून दिली. अशा रीतीनें त्यांजवर कृपादृष्टि करून त्यांना योगाचा राजमार्ग दाखविला. त्यामुळें लागलीच शरीरप्रकृति पूर्ववत झाली. नंतर बोवा दिवसेंदिवस स्नानसंध्यादि कर्मै व भक्तिमार्ग या योगानें परमेश्वरचिंतनाकडे सर्व काळ घालवूं लागले. हें पाहून श्रीनृसिंहसरस्वतीस फारच आनंद होत असे. नंतर फिरत फिरत ते आळंदीक्षेत्रीं जाऊन तेथें चक्रांगीत यांचे वाड्यांत वास्तव्य करून असत. बोवा त्यावेळेपासून फाल्गुन महिन्यांत आळंदीक्षेत्रीं जाऊन स्वामीमहाराजाबरोबर देहूस तुकाराम-

महाराज यांचे पुण्यातिथीस जात. ह्याच वेळीं मी केव्हां तरी निराळे प्रकारचे वेषांत येऊन भेटेन त्या वेळीं तुझी कसोटी घेऊन पूर्ण अनुग्रह होईल असें स्वामींनीं स्वमुखानें बोवास कळविलें होतें. महाराज समाधिस्थ झाल्यावर बोवासाहेब पौष महिन्यांत त्यांचे पुण्यतिथी करितां व वैशाखमासी चंदानाचें उटीचे पुजेकरीतां आळंदीस जात. महाराजांचे कृपेनें योगाची पूर्ण माहिती करून घेतल्यावर बोवांची कांति दिवसेंदिवस तेजःपुज होऊन त्यांचे भगवद्भजनास कधींच अडथळा आला नाहीं. अशा माहात्म्याची भेट व अनुग्रह घेतल्यावर बोवासाहेब सुखानें श्रीरामसेवा करून आनंदानें आपला काळ घालवीत तो तसाच पुढें कायम राहून त्यांचे अभ्युन्नतीस कारणीभूत झाला. यामुळें चरित्र लिहिणारास त्या वेळेस घडलेल्या हकिकती लिहिण्यास आनंद वाटतो.

---

## प्रापंचिक व्यवहार.

**आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थविवेका॥**

श्रीरामदास.

ह्या महात्म्यांचें वाक्याप्रमाणें नारायणबोवांनी प्रपंच करून परमार्थ साधला. बोवांचें लग्न झालें नव्हतें तरि त्यांचे संग्रहास मातोश्री ( ह्यांना माई ह्मणत ), दोन बंधू, त्यांचीं कुटुंबें, दोघे पुतणे, त्यांत एका पुतण्याचे कुटुंब, एवढें खटलें होतें. पैकीं वडीलबंधु बापाजी नाशीकक्षेत्रीं राहात. हे वयोवृद्ध झाल्यानें बोवाजवळच राहण्यास आले. त्यांचें वय सत्तर

वर्षांचेवर होतें तरि त्यांचे शरीर इतके सुदृढ होतें कीं त्यांनीं ह्या वयांत ओलें नारळ एका बुक्कीनें फोडावेत. असे मजबूत शरीराचे लोक हल्लींचे काळांत फार थोडे सांपडतील. मधले बाबाजी हे स्नानसंध्यादि कर्में करून असत. ही मंडळी मातुल गृहीं असल्यानें यांनीं वैष्णवमार्ग स्वीकारिला. हे पक्के वैष्णव असत, वैष्णवी तप्तमुद्रा बाबाजी ह्यांनीं घेतली होती. त्यांचे सोंवळें इतकें कडक होतें कीं विटाळाची नुसती सावली सुद्धां त्यांना खपत नसे. कांहीं हि करणें झालें तरि वैष्णवी बाण्यास शोभेल असेंच ते करीत असत. त्यांना माधव ह्मणून एक मुलगा होता. तो लहानपणीं बोवासाहेब यांचे जवळ अष्टपद्या वगैरे शिकून याज्ञिकी पढण्याकरितां नाशिक येथें बापाजी चुलते याजपाशीं राहून हुशार होऊन बोवाजवळ पुन्हां आला होता. धाकटे चरित्रनायक नारायणबोवा ह्यांचेंच चरित्र लिहिण्याचा मुख्य हेतू असून वाचणारांस त्यांचें कुटुंबांतील थोडीबहुत माहिती मिळावी ह्या हेतूनें थोडासा उल्लेख या ठिकाणीं केला आहे. त्यानीं कुटुंबांतील मंडळीकरितां सणवार, कुळधर्म, कुळाचार, सद्धर्मानें व व्यवहारदृष्ट्या यथास्थित चालविले. भक्तिमार्गाकडे लक्ष देऊन प्रपंचाकडे दुर्लक्ष केलें नाहीं. वर लिहिलेल्या कुटुंबापैकीं नारायणबोवांचे पुतणे वासुदेवराव हे बापाजी यांचे चिरंजीव होत. त्यांनीं आपला विद्याभ्यास बोवाचे समागमास राहून केला. बोवांचें सांगण्यावरून त्यांनीं जज्य कोर्टांत नोकरी धरिली. बोवा कांहीं कालानंतर डोळ्यांनीं आपंग झाल्यावर त्यांनीं वासुदेवरावांना परगांवीं बदली होत असतां कधींहि जाऊं दिलें नाहीं. त्यांनीं

पोटचें मुलाप्रमाणें त्यांचें पालन केलें. व हेच हल्लीं मठाच्या संस्थानची व्यवस्था पहात आहेत. त्यांना कुटुंब, एक लहान मुलगा पुरुषोत्तम व दोन मुली अशी प्रपंचांतील मंडळी असून प्रपंचाकडे लक्ष देऊन आपला परमार्थ साधण्याचा मार्ग ते स्वीकारीत आहेत. ह्याबद्दलची ओघाओघानें जशी हकिकत घडली त्या त्या प्रमाणें पुढें आलीच आहे.

**॥ यस्य जीवन्ति धर्मेण । पुत्रा मित्राणि बांधवाः ॥**
**॥ सफलं जीवितं तस्य । आत्मार्थे कोऽपि जीवति ॥**

हितोपदेश.

ज्याच्या धर्मानें पुत्र, मित्र, बांधव इत्यादिकांचे हित होतें त्याचेंच जीवित्व सफल होय. आपल्या हितांकरितांच जगणारे लोक थोडे आहेत काय ?

---

## भक्ति मार्गाचा नित्यनेम.

**भक्ति प्रेमें एक चित्तें मला जे ।**
**ध्याती गाती सेवती कोमलाजे ॥**
**त्या भक्तांचा भार माझ्या शिरींतो ।**
**योगक्षेमीं सर्वदां मी नमितो ॥**

भक्तिमार्ग स्वीकारिल्यावर नारायणबोवांना त्यांत कधींच आडथळा आला नाहीं. त्यांचा नित्याचा क्रम असा होता कीं, ते पाहाटेस तीन वाजतां उठून २ घंटे योगसाधन करीत. नंतर पांच वाजतां मातोश्रीची सेवा करून शौच्य मुखमार्जनादि-विधी होत असे. त्यांचा मुखमार्जनाविधी करण्याचा परिपाठ

असा होता कीं एक मोठा काकडा घेऊन नाकांतून तोंडाचे आंतिल घशामधून काढून दोन्ही बाजूंनी कांकड्याचा शेंवट धरून तोंड व नाक काकड्यानें घांशीत. नंतर सहा वाजतां गंगेवर रामानंद मारवाडी यांचे श्रीविठ्ठलनामाचे आवाजाचें धोरणानें स्नानास जात. स्नान करून आल्यावर ब्रह्मकर्म आटोपून श्रीरामाची काकडारति आपण स्वतः ब्रह्मवृंद भाविकमंडळी गोपाळराव गाडगीळ वगैरेचे साह्यानें झांज, टाळ, घंटा, नगारा ह्या वाद्यांच्या जयघोषांत करीत. आरति झाल्यावर गुरुचरित्राचा एक अध्याय वासुदेवराव यांजकडून श्रवण करीत. नंतर पंचपदीभजन पायांत चाळ बांधून करित. त्यांचे भजन, गायन, ताल, नृत्य, प्रेमयुक्त अनन्य भावानें देवाची करुणा भाकून, करुणानिधे, दीनबंधो, भक्तवछल, स्वामीमहाराज, इत्यादि संबोधनानें व करुणस्वरानें परमेश्वराची प्रार्थना करून आनंदानें होई. ह्यावेळीं त्यांचें मन परमेश्वर चिंतनीं एकाग्र होई; व भजन ऐकणाराचें हि मन तल्लीन होत असे. पुढें दहा वांजतां भोजन करून विष्णुसहस्रनामाचा पाठ ह्मणून बारा वाजण्याचे वेळीं वामकुक्षि होत असे. नंतर दोन वाजतां उठून खोलींतच योग साधन दोन तास करून पुन्हा चार वाजण्याचे सुमारास अष्टपद्या चोवीस राग रागिण्यामध्यें गात असत. अष्टपद्यापूर्वी महाराजांचा प्रसाद छाटी डोक्यावर धारण करीत. श्रीविठ्ठल नामाचें भजन ते फार वेळ करीत असत. ह्या वेळीं त्यांचें नृत्य इतके कांहिं अप्रतिम होत असें कीं खरोखरच वैकुंठभुवन प्रत्यक्ष आपण अवलोकन करीत आहों, असें श्रोतृमंडळीस वाटे. त्याच प्रमाणें श्रीवि-

ठलनामाचें भजनाचे वेळीं तबलजी कितीही हुषार, वाजविण्यांत वाकबगार, पटाईत असला तरी बोवाचें नृत्यकौशल्यापुढें दमून जाई. अष्टपद्या झाल्यानंतर श्रीमद्भागवत् दामु पुराणीक यांजकडून श्रवण करीत. नंतर अठरा अध्याय गीता स्वमुखानें पठण करून मातोश्रीस श्रवण करवीत. सायंकाळीं श्रीरामाची धुपारति वाद्याचे थाटांत होऊन अष्टकें व नारायणस्तोत्र झाल्यानंतर नऊ वाजण्याचे सुमारास फराळ वगैरे आन्हिक आटोपून रात्रीं दहा वाजतां ज्ञानेश्वरी व एकनाथीभागवत येथील माधवरावबाबा शिरवाळकर ( बाबासाहेब हे जज्य कोर्टांत हेड रायटर होते ) त्यांजकडून श्रवण करीत. श्रवणास बरीच भाविक मंडळी जमत असे. नंतर टाळमृदंगाचे कडाख्यांत भजन होऊन श्रीरामाची शेजारति झाल्यावर भजनी मंडळी बरोबर एक तास बोधपर गोष्टी होऊन मातोश्रीची सेवा करून बारा वाजल्यानंतर निद्रा घेत असत. याप्रमाणे नित्याचा परिपाठ असे या क्रमानें परमेश्वराचे ठिकाणीं बोवासाहेब यांची भक्ति दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली.

---

## डोळ्याची अपंगता.

भक्तिमार्गाचे नित्यनेमाप्रमाणें **नारायणबोवा** श्रीरामसेवा करून राहात. पुढें पांच सहा वर्षांनीं त्यांचे दृष्टीस अंधत्व प्राप्त झालें. परंतु दुसऱ्यास त्यांचे दृष्टीचे अंधत्वाबद्दल कधींच कल्पना येत नसे. कारण बोवांचे डोळ्यांत मोतिबिंदू होते. ह्मणजे दृष्टी नसून असल्यासारखी आहे असा पाहाणारे मंडळीस भास होई. याचें कारण असें कीं, त्यांचेकडे एकदां एक

पांथस्थ आला होता. तो चांगला शिकलेला व विद्वान असून त्याचे जवळ सिद्धीचें साधन होतें. तेव्हां तो बोवास विचारूं लागला कीं, आपल्यास सिद्धीचें साधन द्यावें असें मनांत आहे. त्यांनीं ती गोष्ट कबूल करून सिद्धि प्राप्ती करून घेण्याचे कबूल केलें व त्याप्रमाणें त्या द्रविड ब्राह्मणानें ह्यानां साध्य करून दिली; व सांगितलें कीं, तुला कोणत्याही प्रकारे कधींच अडचण येणार नाहीं. असें ह्मणून कांहीं दिवसांनीं त्यानें प्रयाण केलें. पुढें पांच सहा महिन्यांनीं बोवास दिसेनासें झालें. मंडळीस कळविलें कीं मजला दृष्टीनें दिसत नाहीं, मंडळीस खरें वाटेना, कारण दृष्टी तर शाबूत दिसते आणि बोवा असें कां ह्मणतात. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांची खात्री झाली व बोवांचे अंधत्वाबद्दल सर्वांना वाईट वाटलें. परंतु बोवांनी आपला नित्यनेम इतक्या बरोबर रीतिनें चालविला कीं डोळस मनुष्य सुद्धां एखादें वेळीं चुकेल, परंतु बोवास कधींच अवघड वाटलें नाहीं. आपणाला अंधत्व आलें ह्मणून ते कधींच उदास दिसले नाहींत. व त्यांनी मोतिबिंदु काढऊन घ्यावे ह्मणून कित्येक नामांकित वैद्य व डाक्टर यांनीं खटपटी केल्या परंतु बोवानीं साफ सांगितलें कीं डोळ्यावांचून कांहीं अडण्यासारखें नसून भक्तिमार्गांत अडथळा येण्याची भीति नाहीं. असो, पुढें त्यांनीं रामानंद मारवाडी यांस उपदेश करून त्याचा राग शांत केला. त्याबद्दलची हकिकत अशी आहे कीं सदर्हू मारवाडी याचा स्वभाव अति तापट व रागीट असल्यानें एकंदर व्यवहाराचीं कामें करून घरीं आल्यावर त्यानें सर्व संताप आपलें कुटुंबावर काढून तिजला खूप झोडावें. ती गोष्ट बोवाचे कानावर जाऊन त्यांनी रामानंद

यांस बोलावून आणून उपदेश केला कीं व्यवहारांतलीं कामें आपले प्रपंचाकरितांच आपण करीत असून त्याबद्दलचा विनाकारण राग कुटुंबांवर काढावा हें चांगले आहे काय ? तुह्मी बाहेरून आल्यावर मंदीरांत भजनास येत जावें व भोजनापुरतेंच घरीं असावें. असा उपदेश केल्यावरून रामानंद मारवाडी याचा दिवसेंदिवत राग कमी होत जाऊन कुटुंबास मार खाण्याची पाळी येईनाशी झाली. हा पुढें बोवांचे संग्रहास वीस बावीस वर्षें होता; व त्याचा नित्याचा क्रम असा असे कीं, बोवा नित्य गंगेवर स्नानास जात, ते वेळीं त्यांनीं पुढें होऊन श्रीविठ्ठल नामाचें भजन करीत जावें; आणि त्या आवाजाचे धोरणानें बोवा अचूक गंगेचें कांठीं नित्य स्नान करण्याचें ठिकाणीं जात. केवढा चमत्कार कीं दृष्टीस अंधत्व प्राप्त झालें तरी त्यांचे सर्व व्यवहार डोळस मनुष्याप्रमाणेंच होत असत. पुढें बोवाचे उपदेशाप्रमाणें रामानंद मारवाडी यांनीं मंदिरांत नित्य सकाळीं स्नान करून आल्यावर भजनाचा पाठ सुरू ठेविला. व त्याच प्रमाणें रात्रौ भजनी मंडळींत ही हा भजन करीत असे आणि पुढें त्याचें निजणें, बसणें सुद्धां सर्व मंदीरांतच होऊं लागलें.

**अकिंचनस्य दान्तस्य शान्तस्य समचेतसः ॥**
**सदा संतुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः ॥**

( सुभाषित )

आत्मसंयमी, शांतचित्त आणि संतुष्ट अशा साधु जवळ द्रव्य नसतांही त्यांना दिशा सर्व सुखमय होतात. अशा प्रकारें डोळ्याचे अपंगापासून होणारें नुकसान भरून काढण्याकरितांच जणू काय परमेश्वर अशा साधूस तरतरीत बुद्धि व आनंदी स्वभाव देत.

असतो बुवांची आनंदी वृत्ति, सौजन्य आणि सुस्वभाव असल्या मुळें त्यांना या न्यूनतेबद्दल अवघड असें कधींच वाटलें नाहीं. डोळ्याचे अपंगापासून होणारें नुकसान त्यांनीं परमेश्वराचें चिंतन करून भक्तियुक्तमार्गानें वागणें सुलभ करून घेतलें.

---

## श्री दत्ताची उपासना.

नारायणबोवाचें घराणें मुळचें स्मार्त असे परंतु मातुल-गृहीं असल्यानें त्यांनीं वैष्णव मार्ग स्विकारिला; याबद्दलची हकिकत पूर्वीं दिलीच आहे. पुढें श्रीनृसिंव्हसरस्वतीचा अनुग्रह घेतल्यापासून बोवा हे दत्ताची उपासना करूं लागलें; व तेव्हांपासून दत्तजंयतीचा उत्सव सुरूं झाला. आरंभी पारण्यास १००–१५० च ब्राह्मण भोजन होत असे, अशाबद्दल धुळेकर मंडळीचें पाहण्यांत आहे. ह्या संबंधी हकीकत अशी आहे कीं एकदां बोवा नित्यनेमाप्रमाणें श्रीक्षेत्रआळंदीस श्री नृसिंव्हसरस्वतीचें दर्शनास गेले असतां त्यांची आज्ञा झाली कीं पुढचे सालापासून श्रीदत्ताचे पारण्यास ब्राह्मणमंडळी रस्त्यांत भोजनास बसवीत जावी ह्मणजे मोठा थाट जमेल. अशी आज्ञा झाल्यावर बोवांनीं विनंति केली कीं महाराज पारण्यास ब्राह्मण मंडळी १००–१५० होत असून तितकीच मजला भिक्षा मिळते. याप्रमाणें बोवांचें भाषण महाराजांनीं ऐकून ते ह्मणाले नेहमीप्रमाणें भिक्षेस तुह्मी जाता तसें यंदाही जाऊन पाहा; भिक्षा अधिक न मिळाल्यास मग पाहातां येईल, नाहीं तर निदान दोन शेर दाणे चिमण्यास टाकूनच पारणें करतां येईल.

ज्यावर्षी महाराजांची श्रीदत्ताचे ब्राह्मणभोजन बाहेर बसविण्या-बद्दल अशी आज्ञा झाली त्याच सालीं बोवास भरपूर भिक्षा मिळून श्रीदत्तजयंतीचें टोलेजंग पारणें भर रस्त्यांत होऊं लागलें. ह्या वेळेपासून रस्त्यांत ब्राह्मणभोजनाचा परिपाठ सुरू झाला, तो अद्याप पावेतों तसाच चालू आहे. अशा प्रकारें भक्तिमार्ग नित्यनेम, श्रीदत्ताची उपासना, आल्या अतिथीस अन्नदान, असा परिपाठ बोवांनीं बरेंच वर्षें चालविल्यावर परमेश्वरचिंत-नाकडे त्यांचें लक्ष ज्यास्त लागू लागलें. लोकांची भक्ति हि त्यां-चे ठिकाणीं दृढ झाली व ते त्यांना भजूं लागले. यामुळें पार-ण्याचें ब्राह्मणभोजन १५० चे तीन हजारावर आलें. पहा काय चमत्कार कीं, प्रथमतः ज्या पारण्यास १००।१५० पान होत असें तें श्रीगुरुकृपेनें तीन हजारावर होऊं लागलें. येथें फक्त श्रीगुरुकृपेनें उच्छव मोठ्या प्रमाणांत होत आहे एवढेंच घेतले. ह्याबद्दल सविस्तर हकीकत पुढचे प्रसंगीं देण्यांत येईल. गुरुकृपेचा महिमा अगाध आहे. यांनींच पुढें वेषांतरानें येऊन बोवांची कसोटी घेऊन चमत्कार दाखविला त्याजबद्दलची हकिकत ओघाओघानें पुढें घेतली आहे. ह्यावेळेपासून बोवास बोवासाहेब ह्मणूं लागले.

---

## बोवासाहेबांची शांत वृत्ति.

एकदा बोवासाहेब नित्याप्रमाणें सायंसंध्येस बसले होते. संध्या झाली ह्मणजे संध्याकाळची धूपारति करीत. संधेचे वेळे-पासून धूपारतीस येणारे भाविक मंडळीची गर्दी होत असे. त्यांत हरिभाऊ खाडिलकर, गोपाळराव गाडगीळ, आणि नथु

वेडा हे नित्य येत असत. हरिभाऊ खाडिलकरांनीं येण्याचे सूचनार्थ नाकाची भेरी शंखाप्रमाणें लहान पोरास मजा वाटावी ह्मणून वाजवावी. त्यांचा लहान पोरावर फार दरारा असे. असो, हे आले ह्मणजे बोवासाहेबांनीं आरतिचे तयारींत असावे. या प्रमाणें त्यांचा परिपाठ होता. नथुवेडा हि नित्य नियमानें येत असे. नथु वेडा जरी नित्य सायंकाळचे आरतीस येई तरि त्यानें कोणास कधींच त्रास देऊं नये. त्यानें एकदां बोवासाहेबास ह्मटलें कीं तुमचे मानेवर सुरी देऊन मान कापावी असें मनांत आहे. सर्व मंडळीस ते वेळीं त्याचें बोलणें वेडेपणाचें आहे असें वाटलें, व आरतिस आरंभ करून आरति करण्यांत मग्न झाले. झांज, टाळ, घंटा, नगारा, ह्या वाद्यांनीं देऊळ अगदीं दुमदुमलें आहे. भक्तजनांची श्रीरामदर्शनास गर्दी झाली आहे, व एकसारखा टाळयांचा गजर चालला आहे. इतक्यांत नथुवेडा हातांत सुरी घेऊन देवळांत घुसला आणि बोवासाहेबास पुन्हां विचारूं लागला, सुरी आणिली आहे मान कापूं देताना. शांत वृत्तीनें बोवासाहेब ह्मणाले, तुझी इछा असल्यास ही मान खालीं करितो. असें ह्मणून मान खालीं करितांच नथु वेडा ह्यानें कोणास न जुमानिता दांडगाईनें लागलीच बोवाचे मानेवर सुरी ठेविली; व मान कापूं लागला. बोवासाहेबास ह्या गोष्टी बद्दल यत्किंचित् हि विषाद वाटला नाहीं. उलट ते ह्मणूं लागले कीं नथु वेडा नित्याचा येणारा असतां त्यांजकडून असें कधीं होऊं नये. वगैरे प्रकारांनीं त्यांनीं तें इतर भाविक मंडळीचें समाधान केलें व त्याजला पोलीसकडे धरून नेत असतां ह्मणूं लागले कीं " हे

त्याचें कर्म नाहीं तुह्मी त्याजला सोडून द्या." ही बोवासाहेबांची शांति पाहून मंडळीनें त्यांस सोडून दिलें. दुसरे दिवशीं रावसाहेब सोमण मामलेदार ह्यांचा नित्याचा क्रम कचेरीत जातानां श्रीरामदर्शन घेऊन जावें असा होता. त्यांनीं त्यावेळीं बोवासाहेबास विचारिलें " मानेस काय झाले " बोवासाहेबांनीं पूर्वींचे दिवसाची हकिकत निवेदन करून नथु वेड्याचे कृत्य सांगितलें. तेव्हां मामलेदार साहेबांनीं पोलीसकडे फिर्याद देण्याविषयीं कळवून त्याजवर खटला करण्याबद्दल बोवासाहेबास सुचविले, परंतु ते बोवांनीं नाकारिलें इतकेच नव्हे तर त्या वेड्यास सोडविण्या विषयीं मामलेदाराशीं रदबदली हि केली. हें पाहून बोवाचे शांति बद्दल लोकांस फार आश्चार्य वाटलें.

---

## चुकर जोडपें.

कोणी एक हरि भजन नांवाचा ब्राह्मण प्रपंचास कंटाळून त्रासानें कुटुंबास न विचारितां देशपर्यटन करीत करीत बोवासाहेबांची भगवद्भजनाबद्दल कीर्ति ऐकून त्यांचा समागम व्हावा ह्मणून येथें आला व त्यांचे आश्रयास स्नान संध्यादि कर्में करून व दोन्ही वेळां त्यांचे पंक्तीस भोजन करून राहिला. ह्याप्रमाणें तो बोवासाहेब यांजकडेस होता. बोवासाहेबांनीं त्यास घरची हकिकत विचारितां त्यानें सांगितलें कीं, मी पांच सहा वर्षे तीर्थयात्रा करून आपले जवळ कृपा व्हावी ह्मणून आलों मला बायको मूल कांहीं नाहीं. बोवासाहेबास ती गोष्ट खरी वाटेना तथापि कांहीं दिवस रहा पुढें पाहूं असें ते ह्मणाले. तो ही

तसाच काळ क्रमीत बोवासाहेबांचे आश्रयास राहिला. इकडे त्याची बायको तो घरांतून बाहेर पडल्यापासून पांच सहा वर्षें त्याचा तपास करीत फिरत होती. तिला हरिभजन धुळें येथें राममंदिरांत असल्याचें कोणा पांथस्थ ब्राह्मणाकडून कळलें. तेव्हां तिनें धुळ्याचा रस्ता धरिला. हरिभजन रोज सकाळीं नदीवर स्नानास जात असे. एके दिवशीं त्याची बायको नदीच्या बाजूनें येताना त्याला दिसली, परंतु तिनें मात्र हरिभजन स्नान करीत असतां त्याला पाहिलें नाहीं. कारण तो स्नानास रोज नदीवर येतो हें तिला माहित नव्हते; तेव्हां तिनें थेट मंदिराचा रस्ता धरिला आणि शोध करीत करीत मंदिरांत आली. तिनें बोवासाहेबांस नमस्कार करून विनंति केली कीं, माझे भ्रतार हरिभजन आपले समागमास आहेत, असें कळल्यावरून आपलेकडे धांव घेतली आहे, याउपर कृपा करणे ती करावी. बोवासाहेबांनीं विचारलें आपण त्याचे कुटूंब आहा काय? तिनें होय ह्मणून, आज पांच सहा वर्षांपासून मी त्यांचा तपास करीत फिरत आहे. परंतु शोध लागत नाहीं, आपले आश्रयास आहेत, असें कळल्यावरून आपल्याकडे धांव मारिली, असें सांगितलें. बोवासाहेब ह्मणाले ‘ बाई स्वस्थ असा तुमचा भ्रतार नदीवर स्नानास गेला आहे. येईल तेव्हां पाहूं.’ तिकडे हरिभजनानें आपलें कुटूंब आलें आपल्यास बोवासाहेब काय ह्मणतील ह्या भीतीस्तव नदीवरून परभारें पोबारा केला. इकडे बाईनें आतुर होऊन पुन्हां पुन्हां विचारावें कीं अद्याप स्नानाहून आले नाहींत? बाई स्वस्थ रहा तुझी त्याची भेट करावितों. असें बोवांनीं तिचें समाधान करावें, जेवण होई पावेतों वाट पाहिली, हरिभजन आला नाहीं.

कर्मधर्मसंयोगानें बोवासाहेबांचें वाक्यास हरकत येऊं नये ह्मणून श्रीगुरुकृपेनें कोणी एक कुळकर्णी दर्शनास आला होता त्यास बोवासाहेबांनीं सहज विचारलें, तुह्मी कोठचे राहणारे, ' आह्मी वरखेड्यास असतों '; तुह्मांस वाटेंत येतांना कोणी ब्राह्मण भेटला काय त्यांनीं सांगितलें, ' होय ' त्याचें नांव हरिभजन आहे वरखेड्याच्या रस्त्यानें तो जात होता व आह्मी धुळ्यास कामाकरितां येत होतों; असें ह्मणून तो जाण्यास निघाला इतक्यांत बोवाहेबांनीं विचारलें, तुह्मांस परत वरखेड्यास केव्हां जावयाचें आहे ? तो ह्मणाला आतां निघालोंच; आह्मी तुमचे बरोबर येतों, असें बोवासाहेबांनीं सांगितल्याबरोबर कुळकर्ण्यास मोठा आनंद झाला. त्यांनीं आपलें गाडींत त्यांना बसाविलें व विचारिलें कीं, ' महाराज ' आपण येण्याचें कारण कळवाल काय ? होय असें ह्मणून त्यांनीं घडलेली सर्व हकिकत त्यांस सांगितली. बोलतां बोलतां वरखेड्यानजीक एका झाडाखालीं हरिभजन बसला होता तेथें गाडी आली; बोवासाहेबांचें आकस्मीत् आगमन पाहून हरिभजनास फार आश्चर्य वाटलें साष्टांग नमस्कार घालून त्यानें प्रार्थना केली कीं, आपल्याशीं प्रतारणाकरून खोटें बोललों याबद्दल क्षमा करावी. बोवासाहेबांनीं सांगितलें कीं, तुझें कुटुंबास सांभाळ, अतःपर असें करूं नकोस, दोघेहि सुखानें राहा असा उपदेश करून सर्व मंडळीसह बोवासाहेब वरखेड्याहून परत आले. संतसंगतीचा केवढा माहिमा ! जो हरिभजन बोवासाहेबांशीं खोटें बोलून राहिला होता त्याजवर सुद्धां त्यांनीं सप्रेम अंतःकरणानें कृपाच केली व त्या गरीब बाईला पुन्हां तिचा भ्रतार परत दिला.

## दुष्काळ पीडित कुटुंबाचें संकट निवारण.

जगांत आपल्या सुखाकरितां झटणारे लोक फार आहेत. दुसऱ्याचें संकट निवारण करणारे लोक फार विरळा. कित्येक संकटांत पडलेल्या लोकांशीं फुकाचें गोड भाषणसुद्धां करीत नाहींत, तर मग स्वत: झीज सोसून त्यांचें संकट निवारण करण्याची गोष्ट मनांत सुद्धां आणावयास नको. अशी साधु लोकांची वृत्ति नसते. त्यांचे जवळ कसाही संकटांत पडलेला मनुष्य येवो ते त्याच्याशीं गोड शद्बांनीं भाषणकरून त्याचें संकटाचा परिहार करितात. इतकेंच नव्हें तर आपलें कडून होईल तितकी मदत करून त्यास आश्रयांस ठेऊन ते त्याचें कल्याण करितात.

खानदेशांत व इतरत्र सन १८७७ सालांत फार मोठा दुष्काळ पडला होता. त्यामुळें गरीब लोक अन्नाकरितां देशो-धडीस लागले होते. अशा दुष्काळ पीडित लोकांपैकीं एक ब्राह्मण सहकुटुंब धुळें शहरीं नारायण बोवांचा शोध करून मंदिरांत उतरला व बोवासाहेबांच्या चरणीं मस्तक ठेऊन त्यानें दुष्काळाची हकिकत त्यांस निवेदन करून आपला सर्व वृत्तांत कळविला. ती हकीकत ऐकून बोवासाहेबांस फार वाईट वाटलें. त्यांनीं त्यास आपल्याजवळ आश्रयास ठेवून घेतलें. सदरचें ब्राह्मणकुटुंब सोलापूर जिल्ह्यांत करमाळें ह्मणून गांव आहे तेथील राहणारें असून त्यांत यादवराव उर्फ भाऊराव, त्यांची पत्नी गंगाबाई व मुलगा माधव अशीं तीन मनुष्यें होतीं. भयंकर दुष्काळामुळें त्यांना दोन दोन चार चार दिवस उपास काढावा लागला होता, तीं ज्यावेळीं धुळयास आलीं त्यावेळीं

उपाशीपोटी असल्यानें माधवाचें पोट फार मोठें व हातापायाच्या काड्या अशी स्थिति झाली होती; त्यामुळें पाहणारास त्याजला जलोदर रोग आहे असें वाटे. अशा संकटसमयीं बोवासाहेबांनीं त्या दुष्काळ पीडित कुटुंबाचें संगोपन केलें. अन्नाचे अभावामुळें माधवाचे तर फारच हाल झाले होते. बोवासाहेबांनीं दोन्ही वेळां तृप्ती होईपर्यंत त्याला भोजन घालावें या प्रमाणें तो बोवासाहेबांचे समागमास फारदिवस होता. नंतर हळुहळु भूक कमी होऊन त्याचे भोजन ताळ्यावर आल्या नंतर पोटाचा डेरा कमी होत होत साफ नाहींसा झाला; व दुष्काळाची कळा दिसेनाशी झाली. एखाद्यास ज्वरादि बाधा झाल्यानें त्यांची अन्नावर वांछा नाहींशी होऊन तो रोड बनतो; तोच ज्वर हळुहळु कमी होत गेल्यावर भूक वाढून पोटांत अन्न जाऊं लागलें ह्मणजे पुर्ववत्स्थिति प्राप्त होते. तशीच वरील दुष्काळ पीडित कुटुंबाची स्थिति झाली होती. भाऊराव हे गाईची सेवाचाकरी व बाजारचीं कामें इमानेंइतबारें करून राहात. ह्यांचा स्वभाव फार शांत होता व त्यांत बोवासाहेबांचे उपकारांनीं आपले कुटुंबाचें प्राण रक्षण झालें, हें तो मनांत जाणून होता. पुढें जेव्हां मुलास आठवें वर्ष लागलें, तेव्हां मौंजीबद्दल भाऊरावास काळजी लागली. बोवासाहेबांजवळ गोष्ट काढण्यास धैर्य होईना. जवळ द्रव्य तर नव्हतेंच यामुळें तो नेहमीं फार चिंतेंत असे. त्याची ही स्थिति बोवासाहेबांचें लक्षांत येऊन त्यांनीं आपण होऊनच भाऊराव याजपाशीं माधवाचे मुंजीची गोष्ट काढिली. परंतु भर दुष्काळांत यांनीं आपणांस सर्वतोपरी आश्रय दिला असून पुन्हां

त्यांचेवरच मुंजीचा भार कसा टाकावा अशी भाऊरावास चिंता उत्पन्न झाली. परंतु परोपकार करणें हेंच ज्यांचें ब्रीद अशा बोवासाहेबांनीं ती गोष्ट स्मरणांत ठेविली. पुढें श्रीमंत माधवराव नारायण गद्रे वकील यांचे वडील मुलाच्या मौंजीचे कार्याची गोष्ट बोवासाहेबांचे कानावर गेली; त्यावेळीं भाऊरावाचे मुलाची मौंज आपण आपले मोठे कार्यांत करून द्यावी ह्मणून बोवांनीं गद्रे वकील यांजला सांगितलें. बोवांनीं सांगितलेली गोष्ट कोणी ऐकीली नाहीं असें कधींच झालें नाहीं. वकील साहेबांनीं लागलीच बोवांचे शब्दास रुकार दिला आणि गरीब ब्राह्मण पोराची मौंज आपले मोठे प्रथमचे कार्यांत करून दिली. ह्याप्रमाणें बोवासाहेबांचे समागमास राहून मुलाचें कार्य झालें. पुढें त्याचा विद्याभ्यास होण्याकरितां त्यास शाळेंत घातलें. मुलगा बुद्धीचा तरतरीत असल्यामुळें त्याचे अभ्यासाची व प्रपंचाची सोय चांगली लागावी ह्मणून बोवासाहेबांनीं भाऊरावास राहण्यास मंदिराचे माडीवर जागा दिली. व त्यांस कमेटींत कंदील इन्स्पेक्टरचे जागीं कारकून नेमून देण्याविषयीं कमेटीचे चेअरमन यांस कळविलें. नौकरी लावून दिल्यानंतर सदर कुटुंब मनांत बोवा साहेबांचे आभार मानून माडीवर सुखानें राहूं लागलें. शिक्षण इंग्रेजीपर्यंत आल्यावर भाऊराव हे बोवासाहेबांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून आपले देशांत जाण्याकरितां त्यांची आज्ञा मागूं लागले. बोवासाहेबांनींही आपणापाशीं आठ वर्षेंपर्यंत राहिलेल्या कुटुंबास त्यांचा ऊर्जित काळ आला असें पाहून मोठ्या आनंदानें व प्रेमानें निरोप दिला. आपले गांवीं गेल्यावर भाऊरावांनीं माधव यांस

पुणें येथें इंजिनीयरींग कॉलेजमध्यें ठेविलें. बोवासाहेब आळंदीस जात तेवेळीं माधव मुद्दाम जाऊन बोवासाहेबांचें दर्शन घेई. हल्लीं माधवराव ओव्हरसियरचे कामावर आहेत असें कळतें. याप्रमाणें एका दुष्काळपीडित ब्राह्मणाचें कुटुंबावर मोठें उपकार करून बोवासाहेबांनीं अनंत पुण्य संचय केला.

---

## रामा वेड्यावर बोवासाहेबांची कृपा.

नथुवेडा दांडगाईनें बोवांचे मानेवर सुरी ठेऊन मान कापूं लागला, त्यावेळीं शांतवृत्ति न ढळूं देतां उलट मामलेदारास सांगून त्यास सोडविलें. याबद्दलची हकीगत पूर्वीं आलीच आहे. पुढें कांहीं दिवसांनीं रामावेडा ह्मणून एक भ्रांतिष्ट मनुष्य होता. त्याजवर बुवांनीं कृपा करून त्यांस बरेंच शुद्धीवर आणिलें. याजबद्दलची हकिकत अशी आहे; रामा हा जातिचा सुतार असे. त्याचें वेड भाऊबंदकीचें होतें. त्याचें सर्व द्रव्य हरण झाल्यामुळें तो भ्रांतिष्ट झाला होता. त्यानें नित्य मंदीराबाहेरचे ओट्यावर बसावें व अंगांत संचार झाला ह्मणजे भिंतीस लाथा मारून बडबड करावी. असें होतां होतां तो जास्तच बेफाम होऊं लागला. बोवासाहेबांनीं रामावेड्यास बोलावून आणून सांगावें "राम्या" असा वेडेपणा करूं नकोस मजजवळ अष्टपद्या ऐकत जा. त्याप्रमाणें रामा वेड्यानें परिपाठ ठेविला. परंतु मंदिराबाहेरचें ओट्यावर गेला कीं लागलींच अंगांत संचार होऊन पूर्वींप्रमाणें भिंतीस लाथा मारून तो शिव्या देई. रामा वेड्यानें बरेंच दिवस अष्टपद्या ऐकल्यावर त्याला अष्टपद्या पाठ झाल्या. यामुळें आनंदांत आला ह्मणजे

त्यानें ही केव्हां केव्हां "कापिचपला" ही अष्टपदी राग रागीणीं फार सुंदर गावी. आवाज ही बेस्याचा फार गोड असून ऐकणारास तो वेडा आहे असें वाटत नसे. इतका जरीं तो वेडा होता तरी बोवासाहेबांचे समक्ष त्यानें कोणत्याहि प्रकारें वेडेपणा करूं नये. त्यांचें वेड बाहेरच्या ओट्या पुरतेंच असे. तेथें जरी तो अति बेफाम होई व सर्व मंडळी जरी त्यास दटाऊन परत जात तरी तो कोणाचें ऐकत नसे, परंतु बोवा साहेबांनीं मंदिरांतून एक हांक दिल्याबरोबर रामा वेडा गुपचिप होई. पहा, साधु लोकांचा असाच कांहीं विलक्षण चमत्कार असतो कीं, ज्यावर कृपा करावयाची ह्मणून त्यांचे मनांत येतें त्यावर कृपा केल्याशिवाय राहत नाहींत. ह्यांचेच कृपादृष्टीनें राम्यानें भिंतीस लाथा मारण्याचें बंद करून मुकाट्यानें राहावें. अगर लहरींत आलें कीं एखादि अष्टपदी ह्मणावी सदर अष्ट-पदीचा प्रसाद बोवासाहेबांचेच समागमानें त्यास झाला होता. तो जो बेफामपणानें वागत असे तोच पुढें साधु कृपेनें कोणास त्रास न देतां बाहेरचे ओट्यावर स्तब्ध बसूं लागला. यावरून साधु चरित्र अगाध आहे. ते करितील तर काय होणार नाहीं ? जो खरा योगी आहे व ज्याच्या ठिकाणीं समबुद्धि झाली आहे त्याला सर्व भूतांचे ठिकाणीं आपण व आपल्या ठिकाणीं सर्व भूतें आहेत असा प्रत्यय येतोच. कृतज्ञता बुद्धीनें दुसऱ्याचे हाल कमी होतील तेवढें करणें साधु लोकांचें कर्तव्यच बनून राहतें.

---

## श्रीनृसिंहसरस्वतींचें फकिराचे वेषांत दर्शन.

जगांत असें कित्येक महंत आहेत कीं, ज्यांचे योगानें

आपणांस विलक्षण चमत्कार दृष्टीस पडतात. त्यापैकीं श्रीनृसिंहसरस्वति हे एक होत. यांनींच बोवासाहेबांस आपला चमत्कार दाखवून त्यांजवर पूर्ण कृपा केली, नित्यनेम, अष्टपद्या, भगवद्भक्ति, हरिचिंतन व अन्नदान यामुळें बोवासाहेबांची कीर्ति आधींच सर्वत्र पसरली होती. लोकांवर उपकार करणें त्यांचें ब्रीदच झालें होतें व पुढें पुढें ते अनुग्रहही करूं लागले. यामुळें त्यांचा सत्कीर्तिपरिमल फारच दूरवर पसरूं लागला. श्रीनृसिंहसरस्वतीस तर यामुळें फारच आनंद झाला. बोवासाहेबांस प्रत्यक्ष दर्शन देण्यास फकीराचें वेषानें महाराज धुळें शहरीं आले. ते आले त्यावेळीं त्यांच्या मस्तकावर फकीर लोकांसारखेंच केंस असून मध्यें भांग होता, अंगावरील भगवी कफणी पायापर्यंत रुळत होती, कमरेस लंगोटी असून पायांत पुणेरी नवा करकरीत जोडा होता. अशा वेषांत मंदीराचे बाहेरील बाजूस फरशीवर ते उभे राहिले त्यावेळीं बोवासाहेबांचे जेवण होऊन त्यांनीं वामकुक्षी केली होती. फकीर महाराजांनीं येऊन प्रथम "नारायण किदर है ? भूकलगी" असें बोलले. बोवासाहेब निद्रीस्त असल्यामुळें त्यांचे मातोश्रीनेंच प्रार्थना केली कीं नारायण निजला आहे. आपल्यास भोजन पाहिजे असल्यास चलावे मी वाढितें. महाराजांनीं कळविलें "नही माई मेरेकु नारायण चाहिये" अशी फकीराची अति निकड पाहून बोवासाहेब लागलीच उठून व हात जोडून त्यांनीं विनंती केली कीं, यावें महाराज नारायण मीच आहे. मी आपणास भोजन घालितों "नारायण तुम है, मेरेकु भोजन खिलावोगे" असें साईजी ह्मणाल्यावर बुवांनीं उत्तर दिलें होय महाराज, यावे. "आछा नारायण हम तो हातसे भोजन करते नहीं तुम भोज-

नकू कैसें देयगे " असें विचारतां आपण सांगाल त्याप्रमाणें देईल असें बुवासाहेबांनीं उत्तर दिलें. " तुम तो अंधे हो और मेरेकू भोजन खिलाते, कैसी बात होगी " ह्याप्रमाणें भाषणें झाल्यावर बोवासाहेब मातोश्रीस ह्मणाले, " आई, हे फकीर नव्हत, महाराजांचीच स्वारी आहे तरी यांचेकरितां निराळा भात शिजवून जेवणाची तयारी झाल्यावर मला कळीव ह्मणजे मी त्यांना भोजनास घेऊन येतों. " बोवांची मातोश्री इतकी दयाळू होती कीं कोणीही अतिथी आला ह्मणजे आपलें पुढील वाढलेलें ताट ब्राह्मणास देऊन भोजनास घाली. नंतर नारायणबोवांनीं सांगित्याप्रमाणें भात शिजवून तयारी करून नारायणास हांक मारून कळविलें कीं, फकिरास बोलवा, भात होऊन तयारी झाली आहे. हें ऐकून बोवासाहेबांनीं लागलीच महाराजांकडे जाऊन विनंति केली कीं, " भोजनाची सिद्धता आहे चलावें. " बोवासाहेबांनीं बोलाविल्यावरून महाराज मंदिरांत आले. तुमकु मालूम है कीं हम हातसे भोजन नहीं करते, असें महाराज ह्मणालें असतां बुवासाहेबांनीं विनविलें, आज्ञा होईल त्याप्रमाणें व्यवस्था करवितों " तुमारे मंदीरमे बहोत अदमी है कीसीकु बुलाव; अशी आज्ञा झाल्याबरोबर मंदिराचे माडीवर माधवराव कुळकर्णी रहात असत त्यांना बोलावून बोवांनीं सांगितलें, माधवराव, तुह्मी आपल्या हातानें फकीर महाराजांस जेऊं घाला. त्याप्रमाणें माधवराव फकीरास जेऊं घालूं लागले. नंतर रितीप्रमाणें पाणी पिण्यास तांब्या पंचपात्र ठेवितां पंचपात्रानें पाणी प्यावयाचें नाहीं, असें फकिरानें खुणेनें कळविलें. बोवासाहेबांनीं विनंती केली कीं,

आज्ञा होईल त्याप्रमाणें पाणी पाजण्याची व्यवस्था करितों. " हमकू ताह्मनसे पाणी पिलाव " आज्ञेप्रमाणें माधवरावानें पाणी पाजण्या करितां ताह्मन घेतलें. याप्रमाणें भोजन होऊन नंतर फकीरमहाराज मंदीरांत पुराण अष्टपद्या वगैरे श्रवण करीत बसले. सायंकाळीं पुन्हां दोनप्रहर प्रमाणेंच भोजन झालें. फकीरमहाराजांचा मुक्काम सुमारें पंधरा दिवस होता तोंपर्यंत त्यांचा क्रम सुर्योदयापूर्वी व सायंकाळीं भोजनाचे वेळीं प्रथम आले त्यादिवशींचाच वेष ह्मणजे अंगांत कफनी कमरेस कौपिन आणि पायांत पुणेरी जोडा असा असे. ह्या प्रमाणें नित्य पहाटेंस अरुणोदयाचें वेळीं व सूर्यस्ताचे वेळीं भोजन करीत. शौच्यमुखमार्जनादिविधि महाराजांचें मर्जीवर अवलंबून असे. एखादेवेळीं दोन दोन तीन तीन दिवस शौच्य मुखमार्जनादिविधी होतच नसे. स्नानही मर्जीस येईल तर करावें अशा प्रकारें फकीरमहाराज होतें तोंपावेतों त्यांनीं सांगितल्याप्रमाणें व्यवस्था होत असे. त्यांना जो कोणी भोजननास घालण्यास बसे त्याजला एखादेवेळीं फकीरमाहाराजांचे मुखाचा केशर कस्तुरी सारखा वास येई. प्रत्येक दिवशीं त्यांचे मुखाचा वास निरनिराळे प्रकारचा येत असे. ते नित्य करमणुकीकरितां दशावतारी गंजिफा खेळत. त्यां खेळांत गोपळराव गाडगीळ, माधवराव, व स्वतः महाराज असे असत. त्यांचा खेळण्याचा क्रम मच्छ कच्छादि अनुक्रमानें नसे. उलट कलंकी बौध्य या अनुक्रमानें ते खेळत असत, खेळण्यांत गोपाळराव गाडगीळ याजवर शिव्याचा भडिमार फार होत असे. गोपाळराव हे शांत स्वभावाचे असल्यामुळें शिव्याचा प्रसाद अनुग्रह समजून ऐकून घेत. माधवराव फकीरमहाराजांना जेऊं

घालते वेळीं एखादेसमयीं त्यांचे मुखानें तल्लीन होत. परंतु वास निराळा येऊं लागला ह्मणजे जवळ बसण्याचा कंटाळा करीत. तथापि फकीरमहाराज त्यांचेशीं नेहमीं गोड बोलत त्याच-प्रमाणें बोवासाहेब अष्टपद्या ह्मणूं लागले म्हणजे फकीरमहाराजांनीं आपलेशींच बोलावें "नारायणा तूं फार नाचतोस नृत्यानें देव अद्यापही आपलासा होत नाहीं काय? तुझी दृष्टी श्रीरामसेवेनें गेली, व पुन्हां श्रीरामाकडे तोंड करून चांगलें केलेंस डोळस मनुष्य तुझे सेवेला नको आहे," असें ह्मणून बोवास शिव्याचा भडिमार करावा. परंतु महाराज आले तेंचवेळीं बोवासाहेबांनीं अत:करणानें जाणिलें कीं ही श्रीनृसिंहसरस्वतिमहाराजांची स्वारी आहे. त्यामुळें त्यांच्या शिव्या आपल्यास अनुग्रह प्रसाद आहे. फकीरमहाराज नित्य " लहाळल, लहाळल, " ह्या शद्बांनीं भजन करीत असत. हे शद्ब आह्मीं स्पष्ट ऐकिले आहेत. हे शद्ब कोणत्या भाषेंतील असावे याबद्दल येथें कोणासही तर्क झाला नाहीं. साईजीमहाराजांचे दर्शनास अनेक निरनिराळ्या भाषा जाणणारे लोक येऊन गेलें. परंतु हा शद्ब कोणासच उकलला नाहीं. वाचकवर्गापैकीं कोणास कांहीं कल्पना सुचून आह्मांस कळविल्यास त्याला महत्पुण्य लागेल. महाराज कधीं कधीं मराठींत व हिंदुस्थानींतही भाषण करीत. असो, महाराजांनीं ज्यांना शिव्या द्याव्या त्याजवर अनुग्रह होतो असें दृष्टोत्पतीस येई. याच वेळीं **माई मांडळकरीण** ह्मणून एक अति भाविक भोळी बाई होती तिचा नित्य नेम श्रीरामाचें काकड-आरती पूर्वी भजन करावें असा होता. सदहू भजनाचा फकीर-महाराजांचे भोजनाचे वेळीं त्यांना त्रास होत असल्यामुळें त्यांनीं

त्या बाईस खूप शिव्या द्याव्या, त्या शिव्या बाईस खपत नसत. परंतु बोवासाहेबांनीं त्यांस सांगितलें. तुमचे भजनास अडथळा आणू नका. शिव्यांचा भडिमार हाच तुमचेवर प्रसाद आहे. तिनें बोवासाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें भजनाचे नित्यनेमास अडथळा आणिला नाहीं. परंतु फकीरमहाराजांनीं बोवासाहेबांस विचारिलें "ही बाई कोण आहे? विनाकारण जेवणाचें वेळीं माझे कपाळ कां उठविते?" बोवासाहेबांनीं कळविलें, श्रीराम-सेवा करून भजन करीत असते. तेव्हांपासून बाईचें भजनाचा फकीरमहाराजास आनंद होई व तिजला शिव्या देण्याचें बंद झाले. फकीर मंदिरांत आले त्यावेळीं त्यानें सांगितलेल्या वेषा-शिवाय त्यांचेजवळ कांहिं एक नव्हतें. फक्त ते तमाखू ओढीत. ते चांगलें डोळस होते परंतु सायंकाळीं बहिर्दिशेस त्यांनीं वासुदेवबोवास बरोबर घेऊन जावें परंतु जर यांनां रातांधळें होतें ह्मणावें तर प्रयाणाचे दिवशीं माडीवरून खालीं आपण होऊन येऊन रस्त्यानें जातांना एकाएकीं ते अदृश्य झालें. याबद्दल अश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाहीं. त्यांनां कोणाचा उपसर्ग होऊं नये ह्मणून मंदिरापुढील नगारखान्याची जागा राहण्यास दिली होती. त्यांनीं येथून प्रयाण केलें, ते-वेळीं एकाएकीं कोणास जाण्याचा बेत न सांगतां रात्रौ नऊ वाजण्याचें सुमारास बोवासाहेबांस विचारिलें. "नारायण, येतों आतां" बोवासाहेब ह्मणालें महाराज आपण चालला काय? होय, तुझी भक्तीमार्गाची व्यवस्था पाहून फार संतोष पावलों. तुजवर पूर्ण कृपा झाली." तेव्हां बोवासाहेब ज्ञानेश्वरी श्रवणास बसले होतें व आवांतर मंडळीहि पुष्कळ श्रवणास होती.

त्या सर्वांचे समक्ष बोवासाहेबांनीं अत्यंत सद्गदीत अंतःकरणानें फकीरमहाराजांचे चरणीं मस्तक ठेविलें, त्यावेळीं उभयतांचे कंठ दाटून येऊन डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. फकीरमहाराजांचा वियोग होत आहे असें जाणून सर्व मंडळीं त्यांना पोंचविण्याकरितां मंदिराचे पुढील दरवाज्याचे सडकेवर येऊन कमिटीचें कंदिलाचे उजेडांत येताहेत तोंच ते एकाएकी दिसेनासे झालें. सदर्हू हकिकत त्यावेळीं असलेल्या सर्व मंडळीस माहित आहे. पुढें शोधाअंतीं, जे दिवशीं मंदिरांतून प्रयाण करून अदृश्य झाले तेच दिवशीं त्याच वेळेस अंमळनेरास सखाराममहाराज यांचे समाधीजवळ महाराज वाडींत होते; अशाबद्दल तेथील वासुदेवराव मुष्टे यांजकडून तपास लागला. प्रत्यक्ष ईश्वरीअवतारानेंच बोवासाहेब यांस दर्शन दिलें. ह्या वेळेपासून पुढें बोवासाहेबांस लोक महाराज ह्मणूं लागले.

---

## श्रीराम सेवा.

**अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव।प्रतिमा तो देव कैसा नव्हे?**

आपण महाराष्ट्रीयलोक किंबहुना सारे हिंदु लोक मूर्तिपूजक आहोंत. आमच्या शास्त्रांनीं व रूढीनें भगवत्‌उपासनेची पहिली पायरी ह्मणून मूर्तिपूजेचा स्वीकार केला आहे. आपल्या धर्मांत मूर्तिपूजा कां प्रतिपादिली आहे याचा विचार करावयाचा आहे. मूर्तिपूजेची यथासांग व यथाशास्त्र प्रक्रिया कोणास पहावयाची असेल तर त्यानें श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधांतील सत्ताविसावा अध्याय पहावा. भगवंताच्या पूजेची अधिष्ठानें किती आहेत; प्रतिमा किती प्रकारच्या आहेत;

पूजेस प्रारंभ कसा करावयाचा; पाद्यार्चनविधी कसे करावयाचे; आवाहन, आसन, स्नान, आलंकार, नैवेद्य कसें करावयाचें; वगैरे संबंधानें तेथें विवेचन केलेलें सांपडेल. असो, मूर्तिपूजेचे रहस्य काय आहे व महाराजांनीं श्रीराम सेवा कशी केली याबद्दलची थोडी हकिकत देणें जरूर आहे. श्रीराम-मूर्तीस नित्य स्नान वगैरे घालण्याचा परिपाठ नसून सकाळची काकडारति झाल्यावर देवपूजा ह्मणजे मुख्य मूर्तीस स्नान न घालितां फक्त प्रतिमा देवांची देवपूजा पुरुषसूक्तानें स्नान घालून मंत्रोपचारानें करावयाची. पर्वणीस, प्रत्येक एकादशीस, सर्व मूर्तीस उष्णोदकानें स्नान घालीत. विशेष तिथी पर्वणीस रामास पवमानसूक्ताचा अभिषेक येथील प्रसिद्ध धर्माधिकारी क्षीरे यांजकडून करवीत असत. श्रीरामाच्या पोषाकाची पूजा चांगली बांधीत व आरास हि उत्तम करीत. महाराज पोषाकांची पूजा व त्याचप्रमाणें पुष्पांची पूजा अप्रतिम बांधीत. ह्या वेळीं दर्शनास येणारी मंडळी श्रीराममूर्तीकडे सप्रेम दृष्टीनें पाहात असतां त्यांस तेथून हालूंच नये असें वाटे. परंतु संसाराच्या ओढ्यानें तेथून निघाले तरी पूजा बांधणीबद्दल धन्यवाद गातच ते बाहेर पडत. जगांत खऱ्या सुखाची उत्तम साधनें जीं आहेत, त्यांत देवाचे ठिकाणीं श्रद्धा असणें हें सर्वोत्कृष्ट साधन आहे. प्रत्येक एकादशीस मंत्र जागरणाचा थाट होई. व ब्रह्मवृंदास मोठ्या आदरानें प्रसाद व दक्षणा मिळत असे. शिवाय ह्या दिवशीं वे. शा. सं. दामू पुराणिक यांजकडून श्रीवाल्मिकीरामायणाचा पाठ श्रवण करीत. श्रावण महिन्यांत प्रत्येक सोमवारीं अष्टपद्या

दुपारीं बारा वाजतां होत व सायंकाळीं धूपारति पाच वाजण्याचे सुमारास करीत. गोकुळअष्टमीचे दिवशीं कृष्णजन्माचा मोठा उत्सव करीत. भाद्रपद महिन्यांत भागवत्सप्ताह वे. शा. स. रंगशास्त्री जैतानेकर यांचे कडून श्रवण करीत. त्यांचे हयाती नंतर त्यांचे चिरंजीव वे. शा. स. वासुदेव पुराणिक यांजकडेच वहिवाट कायम राखिली. दसऱ्यापासून कार्तिकी पौर्णिमे पर्यंत रोज दिपोत्सव करून नित्य महिनाभर मंत्रजागरणास भिक्षुक मंडळीस बोलावीत व त्यांचे आदरातिथ्य ठेवीत व सर्वांशीं सौजन्यानें वागत. त्यांची समजूत अशी असें कीं अशा वागण्यापासून आपलें कांहीं खर्च होत नाहीं पण आपल्यास सर्व गोष्टी प्राप्त होतात. ज्या गोष्टी निवळ द्रव्यानें प्राप्त होण्यासारख्या नाहींत त्या त्यांनीं केवळ सौजन्यानें प्राप्त करून घेतल्या. कोजागिरीचे दिवशीं अटीव दूध ब्राह्मणास पाजून तृप्त करीत. या प्रमाणें ब्राह्मणाचे ठिकाणीं त्यांची फार आदर बुद्धि असे. त्यांची दृष्टी गत झाल्या नंतर वासुदेवराव हे श्रीरामास पोषाक व दागदागिने चढवून पूजा बांधीत. ह्यांनीं महाराजाप्रमाणें उत्तम पुजा करावी. त्यांनीं कित्येक वेळीं केळीचे पानावर पुष्पपुजा केलेली आहे. एखादे वेळीं नुसत्या पुष्पांची, एखादे वेळीं केळीचे गाभ्याचे मखरांत, याप्रमाणें निरनिराळेंप्रकारे श्रीरामाचा थाट यांनीं करावा. केळीचे मखरांत पूजा करितांना कित्येकवेळीं पाहाणारांस हस्तिदंती मखर बसविलें आहे असा भास होई. कार्तिकी पौर्णिमेचे दिवशीं रंगाचा गालिचा काढावा व एखादे वेळीं श्रीराम, दोन्ही बाजूस जयविजय, मुरलीधर, गणपति वगैरे देवांचीं चित्रें निरनि-

राळया रंगांत चित्रकलेच्या कागदाचे प्रतिमेप्रमाणें हुबेहूब वठवावी. यामुळें पाहाणारास फार आनंद होई. कांहीं लोकांस रंगाचें सौंदर्याची परिक्षा नसते; परंतु या सौंदर्यापासून होणाऱ्या आनंदासारखा शुद्ध बिनखर्ची व सहज प्राप्त होणारा दुसरा कोणता आनंद आहे ! गालिच्यातील देखावे हिरवा, तांबडा, पांढरा, निळा, जांभळा वगैरे रंग चित्रांत योग्य ठिकाणीं बसविणें सामान्य काम नव्हे. बोवामहाराजांचे अमदानींत, हरदास, वैदिक, पारायणी, पुराणीक, शास्त्री कोणीही आल्यास त्याचे भोजनाची व्यवस्था मोठ्या आदरातिथ्यानें होत असे; व त्याचे जाण्याचे वेळीं त्याला योग्य बिदागी मिळत असें. रामनवमीचे दिवसांत रामाचा नऊ दिवस उत्सव फार थाटानें होत असें. रोज नऊ दिवस उंची पोषाखाची पूजा, रामायणाची आवृत्ति आणिं सायंकाळीं कीर्तन याप्रमाणें नऊ दिवस उत्सव होऊन रोज ब्राह्मणभोजन व नवमीचें पारणें यथास्थितपणें होत असें. महाराजांनीं श्रीरामजन्माचे दिवशीं पूजा चढवावी त्यावेळीं पहाणारास प्रत्यक्ष मूल जन्मास येऊन उभे केलें आहे असें वाटे. उत्तम पोषाक, अंगावर बाळलेणें, कपाळीं बिजवरा, डोक्यावर जावळ, गालावर गालबोट असून त्यांत गुलाबी रंगाची झांक, भोंवया, डोळयाच्या पापण्या वगैरे हुबेहूब दाखवीत. अशा रीतीचा जन्माचे दिवशीं बालपोषाक योग्य समयास अनुसरून घालीत असत. बोवांचे अमदानींत माहुलीकर, ब्रह्मनाळकर, नगरकर, पुणेकर, सातारकर वगैरे पुष्कळच प्रसिद्ध हरदास येऊन त्यांना कीर्तन श्रवण करवीत. उत्साहाचे दिवसांत वासुदेवबोवा व नारायणबोवा गोसावी

नाशिककर हेही येत असत. त्यांचा नित्याचा रामनवमीचे दिवसांत येण्याचा परिपाठ असे. हे नांवाजलेल्या हरदासांपैकीं असून त्यांची कथा प्रेमळ व रसाळ असें त्यांचे पाठांतर पुष्कळ असून त्यांचेपाशीं पद्यांचा संग्रह भरपूर असे व पूर्वींचे संभावित चालीप्रमाणें फार उत्तम कीर्तन करीत. हे महाराजांचे मित्रमंडळीपैकीं असून नाशिकचेच राहाणार असल्यामुळें व वयाचे मानानें बरोबरीचे असल्यामुळें यांचे परस्पर प्रेम जडून ह्यांचे वेळेपासून ते दरसाल श्रीरामनवमीचे उत्साहाचें दिवसांत येत असत. त्यांनीं महाराजांचे वेळेपासून मंदिरांत उत्साहाकरितां येण्याचा परिपाठ सतत पंचवीस वर्षे चालविला. असो, सगुणमूर्तिची गोष्ट सुलभ आहे व सुलक्षण आहे. तिचें दर्शन होतांच भूक, तहान हरपते व मन प्रेमयुक्त होऊन परम सुखी होतें. परमात्मा नित्य शुद्ध आहे, सच्चिदानंदरूप आहे, सगुण आहे, मनोहर आहे, इंद्रियांना वेध लावणारा आहे, आनंदाचा कंद आहे, लीलावतारी आहे, धैर्य, वीर्य, औदार्य, गुणगांभीर्य, शौर्य इत्यादि गुणांना तो आधार आहे. तो सगुण व साकार असल्यामुळें हे गुण त्याच्या आश्रयानें राहतात, व मानवांना त्याच्या सगुणमूर्तिमुळें या गुणांची ओळख होते, मूर्तिचें दर्शन झाल्यावर योगयागादिकांची अटाटी करण्याचें, गिरिकंदरें हुडकण्याचें किंवा नाना संकटांत पडण्याचें बिलकूल कारण नाहीं. एक दीप हातीं घेतल्यावर साऱ्या घरभर प्रकाश पसरतो. त्याप्रमाणें त्यांच्या सगुण मूर्तिचें ध्यान करूं लागलें ह्मणजे अवघे ब्रह्मस्वरूप प्राप्त होतें. सगुण निर्गुण दोन्ही एक आहेत. सगुणोपासनेनें ब्रह्मप्राप्ति होऊन

भगवंताच्या गुणाची ओळख होऊन त्याविषयीं अनिवार प्रेम उत्पन्न होतें.

---

## साधुमंडळ.

**गिरयो गुरवस्तेभ्यो गुर्वी गुर्वीततोपि जगदंडम् ॥**
**तस्मा दप्यति गुरवः प्रलये त्यचला महात्मानः ॥**

( जगन्नाथराय ).

पर्वत मोठे आहेत, त्यापेक्षांही पृथ्वी मोठी आहे, तिच्यापेक्षां ब्रह्मांड मोठें आहे, परंतु जे महात्मे निरंतर भक्तिमार्गांत असून परमेश्वराकडे सदोदित लक्ष ठेवितात, ते साधुसंत सर्वांपेक्षांही मोठें असतात. शांत चित्त, उदार अंतःकरण, विवेक, बुद्धि असणें हें सामान्य काम नव्हे. जगन्नाथरायांनीं वर्णिल्याप्रमाणें आमळनेरकर, मुल्हेरकर, बेलापूरकर, चोपडेकर वगैरे प्रसिद्ध साधुसंत महाराजाकडे मोठ्या अगत्यानें येऊन परस्पर भेटी घेऊन आगत स्वागत करीत; आणि श्रीरामदास, तुकोबाराय, ज्ञानोबा, नामदेव, एकनाथ वगैरे पूर्वकालीन प्रसिद्ध योगीलोकांनीं केलेले चमत्कार मुखांनीं वर्णन करून धन्यता गात. याप्रमाणें परस्परांचे आगत स्वागत झाल्यावर महाराज आलेल्या संतमंडळीस टोलेजंग मेजवानी देऊन त्यांचे पंक्तिभो जनाचा प्रसाद आनंदानें ग्रहण करीत. रात्रौ श्रीज्ञानेश्वरी

श्रीएकनाथी भागवत झाल्यानंतर आलेली संतमंडळीं हरिभजन, तुकोबारायाचे, ज्ञानोबारायाचे, रामदासाचे अभंग टाळ मृदंगाचे कडाक्यांत भक्तियुक्त प्रेमानें निरूपण करून, भाविक लोकांचीं मनें तल्लीन करून सोडीत.

अशाप्रकारें संतमंडळीचें भजन श्रवण करून महाराजांस फारच आनंद होत असे. आमचे येथें जुनें गांवांत श्रीविठ्ठल-मंदीर आहे तेथें दरसाल आषाढमासीं सात दिवस मोठा उत्सव होऊन नामसप्ताह असतो. त्या उत्साहांत रोज भाविक व भजनींमंडळीच्या मुखांतून बोधपर अभंग ऐकून महाराजास आनंद वाटे. चातुर्मासांत परान्न न घेण्याचा नेम असल्यामुळें मंदीराचे मालक दशमीचे दिवशीं त्यांस शिष्य मंडळीसुद्धां आमंत्रण देत; व त्या दिवशीं श्रीविठ्ठलाचा प्रसाद मोठ्या प्रेमानें ग्रहण करीत. याप्रमाणें महाराज आपले आगमनानें त्या उत्सवांतील मंडळीस कृतार्थ करीत. एकदां पंढरपुरास गोविंदमहाराजांचे अर्चेच्यावेळीं महाराजास पाचारण झाल्यामुळें उत्सवाकरितां ते भाविक व शिष्य मंडळीचा समुदाय बरोबर घेऊन तेथें गेले होते. सदरहू अर्चा प्रल्हाद महाराजाचे हस्तें झाली; त्यावेळीं यात्रेचा समुदाय फारच मोठा होता चंद्रभागेंत गोविंदमहाराजांचे समाधीपुढें विस्तीर्ण मंडप दिला होता. आलेल्या साधुसंत व भाविकमंडळीस शिधा व भोजनाचे वेळचा प्रसाद देऊन अन्नशांति व ब्राह्मणभोजनाचें पात्र टोलेजंग झालें होतें. पंढरीनाथाचे विस्तीर्ण सभामंडपांत महाराजांच्या अष्टपद्यास भाविकमंडळींचा समुदाय हजार दीड हजारावर जमे. ह्यांची अष्टपद्याची कीर्ति भाविकमंडळीस ऐकून माहित होतीच त्यांत त्यांचे स्वमुखानेंच त्या ऐकण्यास सांपडल्यावर काय विचारावें? सर्व लोक महाराजांचे धन्यवाद गाऊं लागले. ह्यांचा अमळनेरास सखाराममहाराजांचे पुण्यतिथीस जाण्याचा नित्याचा परिपाठ असे. साधुसंत बोवा-

महाराजास अगत्यानें पाचारण करून त्यांचे आगत स्वागत मोठ्या प्रेमानें करीत. अमळनेरास तुकाराममहाराज ह्यांचे हस्ते बाळकृष्णमहाराजांचे समाधीची आर्चा झाली तेवेळीं समाधी पुढें विस्तीर्ण मंडप देऊन साधुसंत याजकरितां निरनिराळें तंबु डेरे, राहुट्या वगैरे यात्रेकरूंच्या शक्य त्या सोई करून देऊन अन्नशांति व आलेल्या संत मंडळीस देणग्या, कोणास शालजोडी कित्येकांस धोतरजोडे, कांहींस नक्त देणग्या देऊन तृप्त केले. ब्राह्मणास व अठरा पगड जातीस अन्नदानानें संतुष्ट केलें. अशाप्रकारें फार मोठा समारंभ झाला. त्याचप्रमाणें बेलापूरास फार मोठा समारंभ झाला; तेवेळीं महाराजांस ह. भ. प. भानुदासबोवाकडून अगत्याचें पाचारण होतेंच. साधुसंताचा मेळा ज्यांनीं एकेठिकाणीं मोठ्या समुदायांत अवलोकन केला असेल त्यांनाच त्या परस्पर भेटी व भाषणें, एकमेकांचे परस्पर चरणावर मस्तक ठेऊन भेटी घेऊन कृतार्थ होणें वगैरे बद्दल कांहीं तरी कल्पना येईल. भाविक जनांना तर असले प्रसंग फारच उल्हासाचे होत, अशा संतमेळ्यांतून अगदीं नास्तिक मताचा मनुष्यही सत्पक्षाचा संस्कार झाल्या वांचून निघत नाहीं. श्रीतुकाराम, ज्ञानोबाराय, रामदास वगैरे संतमंडळींचे मुखांतून निघालेले तें हरिभजन, अभंग, ते टाळ मृदंगादिकांचे सुस्वर ध्वनी, सच्चिदानंदस्वरूपाची ती रमणीय मूर्ति व तिजपुढें चाललेलें संतांचे तें भक्तिप्रेम, प्रेमयुक्त नृत्य इत्यादि तो ब्रह्मानंदाचा थाट पाहून अगदीं पाषाण-हृदयीं मनुष्य सुद्धां आनंदानें डुलु लागतो, मग भाविक जनांची स्थिति असले सत्पुरुषाचे मेळे पाहिल्यावर काय होत असेल त्याची कल्पना भाविक अंतःकरणानेंच करावी.

## भोजनादिप्रकार

## श्री. आप्पासाहेब सांगलीकर

महाराज यांचे नेहमीचें भोजन फार नेमस्त असून त्यांच्या भोजनाची दहाची वेळ कधींच चुकली नाहीं. रोजचे भोजनाचा प्रकार साधा पण उत्तम होत असे. नित्य कमोदि तांदळाचा भात, उत्तम तुरीचें डाळीचें वरण, नित्य निरनिराळ्या प्रकारच्या भाज्या, कोशिंबिरी, चटण्या, चांगल्या गव्हाच्या चपात्या, लोणकढें तूप, वगैरे उत्तम प्रकारचा बेत भोजनाचा नित्य असे. जेवणाचे पूर्वी अतिथी अभ्यागत यांचा शोध करून कोणी असल्यास त्यास पंक्तीस घेऊन भोजन करीत. ह्यांचे अमदानींत सणवार, कुळधर्म, कुळाचार, आला ह्मणजे त्यांनीं कधींच साधा बेत करूं नये. नेहमीं थाटाचा बेत होत असे. महाराजांची भोजनाविषयीं अशी समजूत असें कीं, अति भोजन आरोग्यकारक नाहीं व उत्कर्षात अडथळा आणणारें आहे. भोजनांत नेहमीं मर्यादा असावी; भोजनाचे मर्यादेनें ज्ञानाची व बलाची किंमत दसपट वाढते. यायोगानें बलास सौम्यता येऊन उत्साहाचा अतिरेक होत नाहीं. भोजनाचा प्रकार मर्यादित असला ह्मणजे आत्मनिग्रह करण्यास फार सुलभ जातें. त्यांना चातुर्मासापूर्वी आणि नंतर धुळेकर भाविकमंडळीं भोजनास बोलावीत. त्या पुण्यप्राण्यास ह्या दिवसांत आमंत्रणाची फार गर्दी होई. प्रत्येकास वाटे कीं, महाराजांनीं प्रथम आपलेकडे यावें, यामुळें लागोपाठ अमंत्रणें येऊन पूर्वीच सुचना करून महाराजांचा भोजनाचा दिवस

नक्की करावा लागे. त्यांनीं ही कोणास नाराज करूं नये. भोजनाचा दिवस ज्याकडे ठरे ते अशा माहात्म्याचे आगमनाचा व प्रसादाचा लाभ आपणांस मिळणार ह्या समजुतीनें स्वतःस फार धन्य मानून घेत. उघड आहे, अशा साधुचे आपल्या घरीं पाय लागून आपले गृह पवित्र होते; आणि त्यांना मेजवानी देऊन त्यांचे पंक्तीचा प्रसाद ग्रहण करण्यास सांपडतो. याबद्दल धन्यता वाटणें साहाजिकच आहे. साधुचे अंगीं जे गुण असावेत असें आपण वाचतों अगर ऐकितों ते सर्व महाराजांत पूर्णपणें होतें. ते सर्वदा आत्मानात्म विचारांत मग्न असत, त्यांची वृत्ती नेहमीं शांत आणि सौजन्यानें परिपूर्ण भरलेली असें. कामक्रोधादि षड्रिपू त्यांचे वाऱ्यासही राहत नसत. त्यांची सत्कीर्ति चोहोंकडे वहात जाऊन देशांतरीं झाली होती. त्यांचेकडे कसाही गृहस्थ येवो ते त्याजपाशीं प्रेमपूर्वक संभाषण करून त्याची चित्तवृत्ति आनंदित करीत. महाराज दरसाल आळंदिक्षेत्रीं श्रीनृसिंहसरस्वतीचे पुण्यतिथीस जात, तेव्हां त्यांचेकडे मोठ मोठे लोक दर्शनास येत. आणि त्या प्रत्येकास श्रीदत्ताचें पारण्यास महाराज धुळ्यास येण्याबद्दल आमंत्रण देत. त्या प्रमाणें कित्येक संभावित गृहस्थ जयंतीचे पारण्यास येत असत. एकदां श्रीमंत आप्पासाहेब सांगलीकर हे महाराजांचे आमंत्रणावरून जयंतीचे उत्सवास आले होते. ह्यांचे आगमनाचे दिवशीं पारण्याचे मंडळीचा थाट भररत्यांत बसला होता. तेव्हां आपासाहेब येऊन पोंचले. यामुळें त्यांस महाराजाकडे येण्यास सवड झाली नाहीं. तो थाट सर्व त्यांनीं टांग्यातून अवलोकन केला. पहिलीं पंगत उठल्यावर श्रीमंत आपासाहेब

महाराजांचे दर्शनास आले; आणि त्यांचे चरणीं मस्तक ठेऊन सांगितलें कीं आपण पाचारण केल्याप्रमाणें वेळेवर येऊन पहिले पंक्तीचा थाट आवलोकन केला. महाराजांना त्यांचे आगमनाबद्दल आनंद वाटला नंतर श्रीमंतांस खुद्द आपले पंक्तीस बसवून त्यांना श्रीदत्तप्रसादाचा लाभ करून दिला. श्रीमंत अप्पासाहेब यांनीं आळंदीस महाराजांचे मुखानें अष्ट-पद्या श्रवण केल्या होत्या व त्या ऐकून त्यांतील भक्तिरसाचे योगानें ते अगदीं तल्लीन झाले होते ह्मणून धुळ्यास येतेवेळीं त्यांनीं बरोबर भेट ह्मणून महाराजाकरितां गळ्यांतील लहान तंबोरी व मोठा उत्तम तंबुरा अशी सुस्वर वाद्यें बरोबर आणिलीं होतीं; तीं भोजनोत्तर महाराजांचें चरणीं अर्पण केलीं. दत्त-जयंतीचा थाट अवलोकन केल्यानंतर पांचसहा दिवस महाराजांचे समागमास राहून व प्रसाद घेऊन श्रीमंतानीं आपले घरीं संस्था-नास जाण्याची तयारी केली, व महाराजांचे चरणीं मस्तक ठेऊन प्रसाद घेऊन विनंति केली कीं, आणखी एखादे वेळीं येऊन आपले समागमास दहा पंधरा दिवस राहून आपल्या पंक्तीचा लाभ घेण्याचा हेतु आहे. त्याप्रमाणें सुमारें दोन वर्षांनीं श्री. आपासाहेब पुन्हां एक वेळ येऊन बोवामहाराजांचे समागमास होते. यावेळीं त्यांचे बरोबर एक ब्राह्मण होता. श्री. आपा-साहेब प्रेमळ, शांत स्वभावाचे व शुद्ध अंतःकरणाचे होते. ह्यावेळीं त्यांचें वास्तव्य पंधरा दिवस झालें. महाराज नित्य गंगेवर स्नानास जात ते वेळीं श्री. आपासाहेबांनीं ब्राह्मणाकरवीं आसनांत मुकटा गुंडाळून आपणही त्यांचे बरोबर स्नानास जावें, तेव्हां महाराजांनीं त्यांना ह्मणावें कीं आपासाहेब

नदीवर स्नान करणें तुमच्या सारख्याचें काम नव्हें. आह्मीं संसारी नसल्यामुळें परमेश्वरानें तें आह्मासारख्याकडेच दिलें आहे. तुह्मीं घरीं उष्णोदकानें स्नान करावे महाराजांची ही आज्ञा ऐकून श्रीमंतांनीं हळूंच सुचविलें कीं उष्णोदकानें नेहमींचे आहेच परंतु आपल्याबरोबर गंगेच्या स्नानाचा लाभ घडून आपलें चरणतीर्थ आह्मांस कसें मिळावें; पुढें महाराजांनीं त्यांना बोध करून त्यांचें नदीवर स्नानास येण्याचें तहकुब केलें. श्री. आपासाहेबांची भोजनाची व्यवस्था त्यांचे नेहमीचे वहिवाटीप्रमाणें करण्यास महाराजांनीं घरांत मंडळीस सुचविलें, परंतु ह्यांचे सारखे प्रेमळ शांत व साधुचे ठिकाणीं शुद्ध अंतःकरण अशा गृहस्थास निराळे व्यवस्थेनें एकट्यास भोजनास बसणें कसें आवडावें? त्यांनीं महाराजांची प्रार्थना केली कीं आपले येथील भोजन उत्तम थाटाचें असतें आणि मजकरितां निराळें कशास पाहिजे? मी आपल्याच पंक्तीस भोजनाचा प्रसाद घेत जाईन. पहा श्रीमंत आपासाहेब ह्यांच्या सारख्यांची महाराजांचे ठिकाणीं केवढी निःसीम भक्ति. ज्यांना कधीं बाहेरले वारे सुद्धां माहित नाहीं; ज्यांचे तयनातीत दहापांच मंडळी हरहमेश असावयाची, ज्यांचे चांदीचे ताटवाटींत सुग्रास भोजन व्हावयाचे, त्यांनीं यत्किंचित ही मीपणा न धरितां महाराजाकरितां मुद्दाम येऊन त्यांचे पंक्तीचा लाभ घ्यावा; ह्यांच्या सारखी श्रीमंत थाटाची व थोर घराण्यांतली मंडळी पुष्कळ आहेत, तथापि श्रीमंतासारखे प्रेमळ अंतःकरण व संताचे ठिकाणीं शुद्ध प्रेम ह्या गोष्टी पूर्वपुण्याई खेरीज प्राप्त होत नाहींत.

## महाराजांचे मंदिरांतून गमन.

साधु पवित्र पुण्यशील । अंतःशुद्ध धर्मात्मा केवळ ।
कर्मनिष्ठ स्वधर्मे निर्मळ । निर्लोभ अनुतापी ॥
( श्रीरामदास )

ह्या रामदास महात्म्याचे वाक्याप्रमाणें महाराज स्वतः फार निरीच्छ असत. त्यांना कोणत्याहि गोष्टीची अपेक्षा नसे. निरपेक्ष साधुजवळ निरनिराळे स्वभावाचे लोक असावयाचेच. अमुक चांगला आणि अमुक वाईट अशी आवडानिवड साधु-लोकांचे स्वप्नीही नसते. तथापि ते मनांत जाणून असतातच. शंका हा तत्वज्ञानाचा पाया आहे, असें ह्मटलें तरी चालेल. आह्मांस किड्यामुंगीचें तत्वज्ञानाचीही ओळख नाहीं, हें खरें; तथापि **नारायणबोवांची** ओळख सर्व जगांस असल्यामुळें त्यांतच आह्मीही आहोंत. जी गोष्ट निरंतर चालण्यासारखी आहे, त्याबद्दलचे ज्ञान त्यांनीं घालून दिलेल्या सन्मार्गानें कसें प्राप्त करून घ्यावें हेंही थोडे थोडे समजतें. केल्याशिवाय क्रिया घडत नाहीं. करणारे आणि करविणारे ह्या दोहोंची सांगड जेव्हां एकाच वेळीं घडून येते तेव्हांच कोणतीही गोष्ट घडते. तरि ह्या दोहोंचा महाराजांचें ठिकाणीं कांहीं संबंध नव्हता. ह्यांचे अमदानींत रावसाहेब सोमण मामलेदार ह्यांनीं योग्य तो सल्ला घेऊन मंदिरचे माडिची नवीन बांधणी केली. अशा भान-गडीचे प्रसंगी सुद्धां त्यांच्या नित्यक्रमांत कोणत्याही प्रकारे कमीपणा आला नाहीं. ते वेळच्या वेळीं जेथल्या तेथें व्यवस्थि-तपणें चाललेंच होतें. महाराजांनीं सुमारें तीन तपें आमचे ( पुरंदऱ्यांचे ) मंदिरांत घालविलीं; इतक्या मुदतींत सर्व मंदिर

त्यांच्याच ताब्यांत असल्यामुळें मंदीरची सर्व पडझड दुरस्ती वगैरे त्यांनीं आमचे सल्यानें अनेक वेळां केलेली आहे. आह्मी ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत. परंतु यावेळीं मंदिराचे मागिल बाजूची दुरस्ती व एक नवीन इमारत बांधण्याचे बाबतींत कांहीं भानगड उत्पन्न होऊन महाराजांजवळ असलेल्या एका गृहस्थानें त्यांचें मनांत विकल्प भरवून दिला. साधुसंत जरी झाले तरी त्यांचेपाशीं सुद्धां पूर्वसंस्कारानुरूप कांहीं वाईट लोक असावयाचेच. संतसमागमानें ते हळु हळु त्यांच्या पूर्वजन्मीच्या पापसंस्कारापासून मुक्त होतात हें खरें; तथापि त्यांना साधुत्व अंगीं येण्यास स्वतः उत्तम कर्मं केल्याशिवाय गत्यंतर नसतें. अशा लोकांच्या समागमानें प्रत्यक्ष साधूंचे कांहींच नुकसान होत नाहीं. परंतु ज्या इतर लोकांस पूर्वपुण्याईनें साधुंचा सहवास घडलेला असतो त्यांना मात्र ह्यांच्या दुष्टाचरणानें त्या सुखास मुकावें लागतें. असो वर सांगितलेले गृहस्थ हे याच प्रकारचे होते. महाराजांचे मनांत वरील गृहस्थानें अशी चलबिचल केली आहे, असें येथील चार संभावित मंडळीचे कानीं गेल्यावर त्यांनीं महाराजापाशीं येऊन विनवण्या केल्या. रा. अण्णासाहेब बर्वे पे. मामलेदार यांनीं प्रार्थना करून सांगितलें कीं जागा नवीन बांधण्याबद्दल आपण काळजी करूं नका. सर्व कांहीं व्यवस्थित होईल. परंतु आपण मनांत आणिलेली गोष्ट काढून टाका. ह्या वेळीं कोणाचेच सांगण्याचा उपयोग न होता शेवटीं दत्तजयंतीचें पारणें झाल्यावर महाराजांनीं नक्की विचार कोणास न सांगतां पौष महिन्यांत आळंदी क्षेत्रीं श्रीनृसिंहसरस्वतीचे पुण्यतिथीस प्रयाण केलें व तेथून वासुदेवबोवास दुसरी जागा पाहून राहण्याबद्दल पत्र आलें. असें झालें

तेव्हां महाराजांचे वियोगानें आह्मांस अत्यंत दुःख झालें. प्रत्यक्ष आकाश कोसळ्यासारखें वाटलें. उजेड असून अंधकार भासूं लागला. चिंतेनें मन व्याकुळ झालें, एका मागून एक सर्व काळज्या डोळ्यासमोर दिसूं लागल्या, मन उदास झालें, कंठ दाटून आला आणि आपली दिशा कोणत्या बाजूनें चुकली या बद्दल विचार करूं लागलों. नंतर आमचे येथील सुप्रसिद्ध रावसाहेब गरुड आणि आबासाहेब पे. मामलेदार यांचा योग्य सल्ला घेऊन मातोश्री भिकुबाई पुरंदरे ह्या महाराजास आग्रहानें आणण्याकरितां आळंदीस गेल्या तेथें चरणीं मस्तक ठेऊन अंतःकरण पूर्वक प्रार्थना केली कीं माझें अंतःकरणांत आपल्या भक्तीची ज्वाला प्रदीप्त आहे. पहिल्यप्रमाणें आपण मंदिरांत येऊन सन्मार्ग चालवावा, माझे जिवांत जीव आहे तोंपावेतों केव्हां ही आपलें चरणतीर्थ मिळण्यास मंदिरांत राहा वगैरे प्रकारें मातोश्रीनें पुष्कळ प्रार्थना केली. ह्यावेळीं त्यांचे शिष्या-पैकीं शंकरभट सोनगीरकर हे आळंदीस होतेच. ह्यांनीं महाराजास आमचे तर्फे अंतःकरणपूर्वक पूर्ववत्प्रमाणें मंदिरांत येण्याबद्दल प्रार्थना केली. हे जर प्रथमपासूनच असते तर गोष्ट एवढ्या विकोपास जातीना. संग्रहास सल्लागार लोक चांगलें असले तर त्याबद्दल वेळींच परिणाम चांगला घडतो. वेळ निघून गेल्यावर पुन्हां पुर्ववत् गोष्ट घडत नाहीं. आह्मीं महाराजांचे ठिकाणीं श्रद्धा व भक्ति कायम ठेऊन त्यांचे भक्तिमार्गांकडे लक्ष देऊन त्यांचे किर्तीचा परिमल मंदिरांत सतत ठेऊन घेऊन दिगंतरीं त्यांची कीर्ति होत आहे, याबद्दल सर्वांसच आनंद वाटल्या खेरीज राहणार नाहीं, असो. नंतर महाराजांनीं मातोश्रीस

उपदेश करून व बोधाच्या गोष्टी सांगून समाधान केलें. नंतर श्रीनृसिंहसरस्वती यांजवर मातोश्रीनीं स्वतः अभंग रचून तो महाराजांचे चरणीं मस्तक ठेऊन अर्पण केला. नंतर त्यांच्या आज्ञेनें त्या धुळयास परत आल्या. ह्यावेळीं श्रीनृसिंहसरस्वतीचे समाधीजवळ स्वतः अभंग केला तो येणें प्रमाणें आहे.

## अभंग.

**॥ महाराज परब्रह्ममूर्ती । त्यांची दिगंतरी किर्ती ॥**
**॥ सद्गुरु ज्ञानाचा सागर । दत्ताचाही तो अवतार ॥**
**॥ मोठे मोठे जन हे येती । स्वामिचीही जाणूनी किर्ती ॥**
**॥ नांव नृसिंहसरस्वति । दर्शन घेता मनोरथ पुरती ॥**
**॥ क्षेत्र आळंदी हे जाणा । भक्त घाली लोटांगणा ॥**

भिकुबाई—पुरंदरे.

## श्रीनृसिंहसरस्वतीचा मठ.

आळंदी हा गांव इंद्रायणीचें तिरीं असून त्यांस अलंकापुरी असें नांव आहे. हें पुराण प्रसिद्ध क्षेत्र असून तेथें सिद्धेश्वर ह्मणून एक अनादि स्थान आहे. त्याठिकाणीं कृष्णेंद्रस्वामिचें मठाजवळ एक पार आहे. त्या जागीं कृष्णाची पावले अद्याप दृष्टीस पडतात. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, ह्या सर्वांचा जन्म येथेंच झाला. हें पवित्र क्षेत्र जाणून श्रीज्ञानेश्वर यांनीं तेथेंच समाधि घेतली. दरसाल कार्तिक वद्य एकादशीस हजारों लोक त्या सत्पुरुषाचें दर्शनास जातात. येथें बरींच विष्णुमंदिरें असून मूर्ति फार सुंदर आहेत. इंद्रायणीचे तीरीं मोठमोठे घाट असून त्यायोगानें पाहाणारांस मोठी मौज व आनंद वाटतो. अशा पवित्र स्थळीं श्रीनृसिंहसरस्वतीचे वास्तव्य आळंदी-

क्षेत्रीं चक्रांकित यांच्या वाड्यांत असे. त्यांचा चेहरा मोठा भव्य असून गौरवर्ण व आरक्त असे. त्यांची कांति तेजःपुंज होती. हे परमहंस दिक्षेपैकीं असून फार विरक्त होते. भोजन झाल्या-नंतर हे तांबूल हि भक्षण करीत असत. ह्यांची व अक्कलकोट चे स्वामींची पुष्कळ वेळां गांठ पडली असून उभयतांचे कडाक्याचे वाद झालेले आहेत. दोघे हि बरोबरीचे सत्पुरुष होते. श्रीनृसिंहसरस्वतीनें गोपाळपुऱ्याचे रस्त्यावर सोंवळ्यानीं बंगला बांधिला व त्याच बाजूस इंद्रायणीच्या तिरी पुष्कळ झाडी लाविली आहे. त्यावेळीं तसें करण्याचें कारण मंडळीनें विचारितां सांगावें कीं हें ठिकाण कधींकाळीं ब्राह्मणभोजनाचे उपयोगास पडेल. ह्याप्रमाणें त्यांनीं प्रथमपासून आत्मज्ञानानें योजना करून ठेविली. स्वामी फार ज्ञानी असून त्यांचेकडे द्वैत अगर अद्वैतवादी आला असतां त्या त्या मताचें खंडण ते यथायोग्य करीत. त्यांच्याकडे ज्ञानेश्वरीचा कठीण अर्थ विचा-रण्याकरितां कोणीही आला असतां ते तावडतोब त्यांचे समाधान होण्यासारख्या सरळ व सोप्या शब्दानें त्याला अर्थ समजाऊन देत. योग साधनाचा सुलभ मार्ग दाखवून महाराजांस त्यांनीं उपदेश दिला ह्याबद्दलची हकिकत मागें दिलीच आहे. एकदां असें झालें कीं, स्वामीस हिवताप आला होता तेव्हां त्यांच्याकडे मोठमोठे नामांकित वैद्य येऊन त्यांनीं औषध घेण्याबद्दल त्यांना आग्रह केला; परंतु त्यांनीं तें घण्याचें प्रथम नाकारिलें पुढें त्यांना मंडळीनें फारच आग्रह केला; त्यामुळें ते फार संतापून त्यांनीं मंडळीस सांगितलें कीं, आणा पाहूं तुमचा नामांकित वैद्य कोणता आहे तो ह्मणजे मी त्याला आपली

नाडी दाखवितो. पुढें वैद्य आल्यावर स्वामींनीं शरिरांतील सर्व रक्तवाहिन्या आपण होऊन बंद केल्या आणि ह्मणालें कीं, वैद्यबोवा, तुह्मी आमची नाडी पाहाताना; पहा बरें आह्मांला काय होतें तें? तेव्हां स्वामी आपल्याशीं प्रत्यक्ष बोलत असून इकडे नाडीचा तर पत्ता नाहीं. त्याबद्दल वैद्यबोवांस फार आश्चर्य वाटून त्यांनीं लागलींच चरणीं मस्तक ठेऊन ते ह्मणाले, महाराज आपण अविनाश, अनंत, आपली नाडी म्यां मूढानें पाहिली याबद्दल मला आपण क्षमा करावी. तेव्हां स्वामींनीं त्यांना बोधाच्या गोष्टी सांगून त्यांचें समाधान केलें. असे हजारों चमत्कार त्यांनीं केले आहेत. ते समाधिस्त झाले त्या वेळची हकिगत अशी सांगतात कीं योग, साधन करीत असतां आरक्तनेत्र करून सर्वां समक्ष त्यांनीं आत्मा ब्रह्मांडीं नेला, त्या मुळें त्यांचे मस्तकावर शंख देण्याचें कारणच पडलें नाहीं. टाळूस भोंक पडून पौष महिन्यांत त्यांचे देहावसान झालें; व ते सत्य लोकीं गेलें. स्वामी पूर्ण योगसिद्धपुरुष होते. त्यांच्या चमत्काराचें वर्णन केलें तितकें थोडेंच होणार आहे. असो, पुढें त्यांच्याच योजनेनुरूप इंद्रायणीचे तीरीं त्यांनीं सोंवळ्यानें बांधिलेल्या बंगल्याचे ठिकाणीं महाराजांचीं मोठी भव्य समाध झाली आहे व तिच्या मागें श्रीविठ्ठलाच्या मूर्ती स्थापन केल्या आहेत. समाधीपुढें उत्तम व भव्य सभामंडप बांधिला असून बाजूस चांगल्या ओवऱ्या आहेत. यामुळें यात्रेकरूंस उतरण्या-करितां उत्तम सोय झाली आहे. सभामंडपाचे पुढील दरवा-ज्यावर उत्तम प्रकारचा नगारखाना बांधिला आहे. नजिकच पाकशाळा असून त्याजवळच सुंदर बगीचा आहे. त्यांत मोठी विहीर बांधलेली असून तेथें निरनिराळया प्रकारची उत्तम फळें

व पुष्पें व तऱ्हतऱ्हेची शाकभाजी होते. समाधीचे मागील बाजूस स्वामींचें नांवचा घाट बांधिला असून त्या ठिकाणीं स्नानाची उत्तम सोय झाली आहे. शिवाय मठांत आलेले पांथस्थब्राह्मण अन्नदानानें तृप्त होतात. ह्या सर्वांवर देखरेख स्वामींचे शिष्य दत्तबोवा हे ठेवीत आहेत. स्वामींचें पुण्यतिथीस हजारों ब्राह्मणांस अन्नसंतर्पण होतें. मोठमोठे जहागीरदार आणि भाविक मंडळी पौष महिन्यांत पुण्यतिथीस जातात. यामुळें त्या महात्म्याचे पुण्यप्रददिवशीं मनास आल्हाद वाटून एक प्रकारचा पुज्य भावही मनांत सहज उत्पन्न होतो. स्वतः स्वामींनीं आपली व्यवस्था आपल्या हातानें ज्या ठिकाणीं करून ठेविली होती त्याचे बाजूस गर्द झाडी लाविली आहे. तेथेंच पुण्यतिथीस ब्राह्मण भोजनाचा थाट होत असतो. महाराजावर स्वामींची पूर्ण कृपा असल्यामुळें आपले प्रमाणेंच त्यांनीं महाराजांची कीर्ति विस्तृत केली आहे.

---

## बोवासाहेबांचे धुळेंशहरीं कायमचे आगमन.

प्रत्येक मनुष्य आपआपलें कर्मानें बांधला गेला आहे. मन, बुद्धि, इंद्रियें हीं रात्रंदिवस त्यास चैन पडूं देत नाहींत. तीं बाह्य विषयांत निमग्न असल्यामुळें त्यांना सद्विचार करण्यास मुळीं वेळच मिळत नाहीं. यामुळें बुद्धि काम करिते किंवा जीव ह्मणतो मी बुद्धिवंत आहे. मी आपल्या डोळयांनीं पाहतों, मी खातों, मी सुखी होतों. इंद्रियाकडून घडणाऱ्या सर्व क्रिया मी करितों असा अभिमान जिवाला उत्पन्न होतो आणि त्याच भरांत कोणतेंही कार्यांत तो यशस्वी झाला तर त्याला हर्ष होतो व अयशस्वी झाला तर लागलीच त्यास विषाद होतो.

हर्ष विषादाच्या परस्पर आदळणाऱ्या लाटांनीं चित्त नेहमीं चंचल असतें. व त्यामुळें संसारचक्रांतून जीवाची सुटका कधींच होत नाहीं. ह्मणून कर्तृत्वाचा अहंकार तर नसावा व देहेंद्रियाचीं कर्में तर यथास्थित चालावी ह्मणून जीवानें नेहमीं सर्वकर्मांपासून अलिप्त असावें ह्मणजे त्यानें असे नित्य भाविलें पाहिजे कीं देहेंद्रियांचास्वामी परमात्मा निराळाच आहे हें सारें विश्व तो चालवितो. मग माझी कर्तृत्वशक्ति किती अल्प आहे हिच्या बलावर मी रजभर सुध्धां कांहीं करूं शकणार नाहीं, ह्मणून तो ब्रह्मांडचालकपरमात्मा त्यालाच मी आपली बुद्धि, इंद्रियें, प्राण, मन, प्रणतीपूर्वक अर्पण केलीं पाहिजेत. अशी मनांत खात्री ठेऊन जेव्हां तो अनन्यत्वानें जो श्रीदाशरथेराम त्यालाच वंदन करितो तेव्हांच त्याच्या कृपेनें त्याच्या कर्तृत्वाचा अहंकार नाहींसा होऊन अंतीं तो पुरुष सद्गतीला जातो. असो, महाराजांनीं मंदिरांतून प्रस्थान उठविल्यावर आळंदीक्षेत्रीं श्रीनृसिंहसरस्वती यांचे मठांत ते राहण्यास गेले. तेवेळीं पुष्कळ थोर संभावित मंडळीनें त्यांना येथें परत येण्यासंबंधीं आग्रहपूर्वक विनंत्या केल्या. मातोश्री भिकूबाई पुरंदरे ह्याही त्यांना आग्रहानें धुळयास आणण्या करितां गेल्या; परंतु त्यावेळीं त्यांचा योग नव्हता ह्मणून त्या परत आल्या; हें मागें आलेंच आहे. शेवटीं येथील गणपुले पे. मामलेदार यांचे मनांत प्रेरणा होऊन ते त्यांना आणण्याकरितां आळंदीस गेले. महाराजांचें वास्तव्य पौष शु॥ ११ पासून फाल्गुन शुद्ध १५ पर्यंत सुमारे अडीच महिनें स्वामींचे मठांत होतें. भाऊसाहेब गणपुले ह्यांची त्यांचे ठिकाणीं दृढ श्रद्धा व भक्ति होती. ते भक्तिमार्गांतले असून ज्ञानेश्वरीचे ज्ञाते होते. पेनशन घेतल्यापासून श्रीराममंदिरांत येऊन ज्ञानेश्वरी

श्रवण करीत. त्यांचा येथें एक वाडा असून त्या वाड्यांत छोटीशी श्रीदत्ताची मूर्ति त्यांनीं स्थापन केली आहे. हे नृसिंहसरस्वतीचे अनुग्रहीत असल्यामुळें पेनशन घेतल्यापासून ते आपला काळ आनंदानें ईश्वरभजनांत घालवीत. त्याचप्रमाणें फावले वेळांत नामांकित औषधी, रसायनेंहि परोपकारार्थ तयार करीत. व तद्वत पुष्कळावर उपकार करीत. याप्रमाणें त्यांची हकिकत आहे. असो, भाऊसाहेब आळंदीस गेले, पुण्याहून आळंदी साहा कोस आहे तेथून स्वतंत्र टांगा करून ताबडतोब ते आळंदीस जाऊन गोपाळपुऱ्याचें रस्त्यानें श्रीनृसिंहसरस्वतीचे मठांत ते आले आणि स्वामींचेच अंशधारी महाराज आहेत अशी भावना मनांत आणून त्यांनीं हातजोडून विनंती केली कीं, आपणांस महाराजांची आज्ञा आहे कीं आपले वास्तव्य धुळें शहरीं असावें असें असून आपण आळंदीस राहाण्याचा विचार केला हें कसें काय ? त्यांनीं कळविलें माझी इच्छा महाराजांची सेवा घडून येथेंच वास्तव्य करावें अशी आहे, तेव्हां ह्यांनीं विनंति केली कीं, आपणांस स्वामींचे सेवेची इच्छा आहे तशीच आपल्या सेवेची इच्छा धुळेकरास आहे ती आपण घडू द्यावी. ह्याप्रमाणें परस्पर संभाषणें होऊन भाऊसाहेब ह्यांनीं विनंति केली कीं,

**नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितीभाव। मी भक्त तूं देव ऐसें करी॥**

त्यावेळीं त्यांची वृत्ति इतकी तदाकार झाली होती कीं धुळ्यांतील आपले सर्व वाड्यावर तुळशीपत्र ठेवण्यास ते तयार होते. असा शुद्ध भाव पाहून महाराजांस त्यांच्या विनंतीस मान देऊन धुळयास येण्याचे कबुल करावें लागले. ज्याप्रमाणें भाऊसाहेब

गणपुले वाड्यावर तुळशीपत्र ठेवण्यास तयार झाले त्याप्रमाणें महाराजही केवळ निर्लोभ वृत्तीनें त्यांचा वाडा तुळशीपत्र जाणून व गुर्वाज्ञा प्रमाण मानून आळंदिक्षेत्राहून भाऊसाहेबाबरोबर फाल्गुन शुद्ध १५ रोजी धुळें शहरवासीजनाचें पाप दग्ध करण्यासाठींच जणुं पुन्हां धुळयास आले. ते गावांत आले तेव्हां असा चमत्कार झाला कीं, खोलगल्लीतून श्रीराममंदीराजवळ त्यांचे तांग्याचे घोडे अडले व त्या घोड्यांस चापकाचे तडाखे मारले असतां हि ते हलेनांत यावरून. श्रीरामचंद्रासहि त्यांच्या भेटीची उत्कंठा लागलीसे वाटलें. असो, महाराजांनीं श्री रामाचें दर्शन घेतलें व नंतर तांग्याचे घोडेही न अडतां अचूक भाऊसाहेबांचे वाड्यासमोर जाऊन उभे राहिले. नंतर बोवासाहेब यांच्या वाड्यांत गेले. वाचक हो, ही गोष्ट तुह्मांस अतिशयोक्तिची वाटेल; परंतु आह्मीं जशी घडली तशीच येथें नमूद केली आहे. ज्या माहत्म्यानें श्रीराममंदिरांत ३५।३६ वर्षे तपश्चर्याकरून हरिभजनांत घालविलीं त्याभक्तास पुन्हां केव्हां पाहीन असें होणें हे त्या भक्तवत्छल प्रभूचे ब्रीदच जर आहे तर घोडे अडले यांत नवल कोणतें? शिवाय ईश्वर सर्वत्र ठिकाणीं जरी परिपूर्ण भरला आहे तरि स्थानमाहात्म फार वेगळें आहे श्रीदाशरथीरामाचें माहात्म्य सर्व ठिकाणीं आहेच त्यांत अयोध्या नगरीं श्रेष्ठ कां धरली, पंढरीनाथाचें माहात्म व मंदिरें गांवोगांवीं आहेत त्यांत पंढरी श्रेष्ठ कां असावी, मथुरेस श्रीकृष्णाचा जन्म झाला व आवांतर ठिकाणीं उत्सव होत आहे तर मथुरेचें महात्म्य जास्त काय ह्मणून असावें. तसे महाराज दुसरीकडे जरी वास्तव्य करण्यास गेले तरि तपश्चर्या झालेल्या ठिकाणींच त्यांचे माहत्म्य जास्त होईल हें वर लिहिलेल्या उदाह-

रणावरून कळून येईल. असो. भाऊसाहेब महाराजास घेऊन आले याबद्दल आह्मांस फारच संतोष वाटतो व आह्मांकडून जरी कांहीं अपराध घडले असले तरि ते मनांत न ठेवितां आह्मांवर पूर्वीप्रमाणेंच महाराजांनीं लोभ ठेविला. कारण अजाणत्याकडून साधूस किती जरी त्रास झाला तरि ते त्याबद्दल मनांत आणीत नाहींत.

**॥ छिन्नोपि चंदन तरुर्न जाहाति गंधम् ॥**
**॥ वृद्धोपि वारण पतिर्न जहाति लीलाम् ॥**
**॥ यंत्रार्पितो मधुरता न जहाति चेक्षुः ॥**
**॥ क्षीणोपि नत्यजति शील गुणान कुलीनः ॥**

चंदन वृक्षाला कुऱ्हाडीनें त्रास देऊन त्याचे तुकडे केले तरि चंदन कुऱ्हाडीला काय शिक्षा देतो! लोखंडानें परिसाला फार त्रास दिला तर परिस त्याला काय शिक्षा देणार बरे! त्याचे लोहत्व घालवून त्याला उत्तम सुवर्णच करील नव्हे काय? दुर्गंधयुक्त नाल्यानें गंगेवर स्वारी करून तिला फार त्रास दिला परंतु गंगेनें त्याला शिक्षा अशी दिली कीं गंगारूप करून सोडिलें. ही सर्व साधूंचीं लक्षणें आहेत. सत्पुरुषांचा अधिकार फार मोठा आहे तो कसा ह्मणाल तर न्यायाधिशाचे मनांत क्षमा करण्याचे आले तर त्यांना कायद्याचे धोरणानें करावी लागते तसे संतांचें नाहीं. त्यांचे मनांत दया उत्पन्न होतांच ती करण्यास ते तात्काल समर्थ असतात. असो, भाऊसाहेब गणपुले यांनीं महाराजांची सर्व प्रकारची व्यवस्था यथास्थित करून दिली व महाराज आपला काळ भक्तीमार्गांत काळ घालवूं लागले. महाराजांची कायमची व्यवस्था रहावी ह्मणून भाऊसाहेब यांनीं व्यवस्थित प्रकारे दस्तैवज करून

ठेविले होतें असें ह्मणतात. याबद्दलची बरीच पुष्कळ हकिगत आहे पण ती येथें विस्तारभयास्तव लिहीत नाहीं. भाऊसाहेबां कडे महाराज सुमारें सहावर्षे होते. असो, ब्रह्मदेवापासून तो मुंगीपर्यंत साऱ्याच जीवजंतूंना तूं सत्व, रज, तम, या त्रिगुणरूपदोऱ्यानें कडकडून बांधितोस व अहंकाराची मेढी मध्यभागीं रोंवून तिच्या भोंवतीं संसाररूप शेतांत चक्राकार फिरवितोस. उदय व अस्त, संपत्ति आपत्ति, ऐश्वर्य, अनैश्वर्य, यांचे स्वकर्मानुसार हे जीव फेरे घालीत असतांनां जो खांदा चूकवितो त्याला तूं चोपतोस; तर देवा, जगचालका, आह्मी फार चोप खाल्ला, चोपखाऊन थकून भागून गेलों, आतां येवढीच प्रार्थना आहे कीं, आह्मी अहंकाराचे अधिष्ठान जें धरलें आहे तेवढा खुंटा उपटून टाक व सर्वांचें खरें अधिष्ठान जें तुझें चरण त्यावर आह्मीं आपली बुद्धि, इंद्रियें, प्राण व वाणी हीं सुमनें वाहतों त्याचा स्वीकार करून आह्मांला आपल्या दयेला प्राप्त करून घे. आह्मां सर्वांवर तूं करुणादृष्टींने पहा. तुझा चरण आमच्या हातात दृढ आला ह्मणजे मग आह्मीं अहंकाराला व त्रिगुणरूप दोऱ्याला बिलकूल भीत नाहीं. देवा तूं प्रकृतिपुरुषाचा शास्ता आहेस त्यांचा वरिष्ठ आहेस. हे परमेश्वरा तूं प्रत्यक्ष कालरूप आहेस तर तूं आमचे कल्याण कर, आमच्या कल्याणाची अभिवृद्धि कर, आह्मांला उत्तम प्रकारे आयुरारोग्य, संपत, यश, दे; आह्मांला यशस्वी कर, आमच्या सर्व कल्याणाचें कल्याण, मंगलाचें मंगल जे तुझें चरण त्यास आह्मी शरण आहों. महाराजांचे ठिकाणीं नित्य भक्त असूं दे, ते येथें आल्यानें चरण तीर्थाचा अक्षय लाभ

होत आहे, या पेक्षां ज्यास्त अपेक्षा ती कोणती असावयाची?

## अष्टपदीचा थाट.

॥ सुस्वरं सुरसं चैव सुरागम् मधुराक्षरम् ॥
॥ सालंकारं प्रमाणश्चषड्विधं गीतलक्षणम् ॥

महाराज आळंदिक्षेत्राहून येथें आल्यावर सर्व धुळेकर मंडळीस फार आनंद झाला व भाऊसाहेब गणपुले ह्यांना त्यांचें आगमनाबद्दल श्रेय मिळालें तें वाजवीच झालें. त्यांनीं त्यांची राहण्याची व्यवस्था उत्तम प्रकारें करून श्रीदत्ताचे मूर्तीची स्थापना करून तिच्या पुजाअर्चेची व्यवस्था धोंडभट तारे यांचेकडे सोंपविली. त्यामुळे महाराजांना त्याबद्दल कांहिं पाहावें लागत नसे. व आपला व्यासंग जो भक्तिचा नित्य नेम आहे त्यांस अनुसरून आपला आमोलिक वेळ स्नानसंध्येंत, योगसाधनांत, पुराणश्रवण करण्यांत, भजनांत आणि अष्टपदींत घालवित. नित्य अष्टपदीचें पठण हाच मुख्यत्वें त्यांचा प्राधान्य व्यवसाय होता. भगवंताची प्राप्ति करून घेणें सामान्य काम नव्हें. ते संताखेरिज इतरांस घडत नाहीं. लोखंडाचे चणे खाल्याशिवाय ब्रह्मपदावर नाचतां येत नाहीं असें श्रीनाथमहाजांचें वचन आहे. हरिभक्ति ह्मणजे केवळ सुळावरली पोळी आहे. परमेश्वराचे ठिकाणचें प्रेम शेतांत पिकत नाहीं किंवा बाजारांत विकत नाहीं, तें तर आपल्या जवळ हृदयांत भक्तिनें उत्पन्न करावें लागतें. परमेश्वरहि पूर्ण कसोटी घेतल्याशिवाय कोणालाच प्रसन्न होत नाहीं. भगवंतास प्रसन्न करून घेणें सामान्य जनाचें काम नव्हे. तें ज्याच्या नशिबीं असतें त्यालाच घडतें. देहबुद्धि

सर्वथा सोडून दे असें करशील तर तुला प्रेमाची खुण मिळेल व देहाविषयीं असें निर्ममत्व असण्याची तुझी तयारि असेल तर तूं मजकडे ये, असें तुळशीदास ह्मणतात. देहगेहाविषयीं अशा प्रकारची उदासीनता ज्यांच्या ठिकाणीं बाणली त्या भगवद्भक्तांत अग्रस्थान गोपींनां दिलेलें आहे. गोपींच्यासारखें शुद्ध प्रेम कोणाचेंच नव्हतें, ह्मणून महाराज गीतगोविंदकाव्याचें प्रेमानें पठण करीत असत. श्रीमद्भागवतांत राधाप्रभृतिगोपींचें व्हावें तसें वर्णन झालें नाहीं ह्मणून, शुकाचार्यांनीं जयदेवस्वामींचा अवतार घेऊन तशा वर्णनानें परिपूर्ण असें गीतगोविंदनामककाव्य रचिलें. त्या काव्यांत अष्टपद्या चोविस श्लोकासह आहेत. त्या राधाकृष्णाचे वर्णनानें परिपूर्ण आहेत. त्रिविधजनाचा उद्धार व्हावा असा हेतु मनांत धरून जयदेवस्वामींनीं राधाकृष्णाचा विलास त्यांत वर्णन केला आहे ; हाच हेतु मनांत धारण करून महाराज नित्य पायांत चाळ बांधून प्रेमानें नृत्य करीत करीत या अष्टपद्यांचें द्वारें श्रीराधाकृष्णास आळवीत असत. असा क्रम चालला होता तरि, त्या वेदप्रणीत धर्ममार्गाबद्दल कधींही उदासीनता दाखविली नाहीं. असो, अष्टपद्याचें पठण ते रोज तिसरे प्रहरीं चार वाजतां करीत. परंतु एकादशीचे दिवशीं मात्र नित्याचे आन्हिक आटोपून रात्रौ अकरा वाजता प्रारंभ करीत. ते वेळेस पुष्कळ रसीक, मर्मज्ञ व भाविक लोक प्रेमांतःकरणानें श्रवणास येत. महाराजांची सेवा करणारे पट्ट शिष्य गंगाधर ऊर्फ महंत ह्यांचेकडे चाळ, चिपळ्या, तंबुरी, दोन्ही बाजूस दोन मोठाले सुस्वर तंबोरे, पखवाज, प्रसादछाटी वगैरे अष्टपद्यांचे वेळीं लागणारीं सर्व उपकरणें चांगल्या

व्यवस्थेनें मांडून ठेवण्याचें काम असे. त्या प्रमाणें सर्व सिद्धता झाल्यावर, महाराज पायांत चाळ बांधून गुरुमहाराजांची प्रसादछाटी मस्तकावर धारण केल्यावर पांडुरंगाचें स्तवनकरून अष्टपद्यांस उभे राहात. श्रीविठ्ठलाचें भजन करतेवेळीं खरें भासणारे कमलपुष्पवत् नयन, शेषाप्रमाणें आनंदानें डुलणें, सतेज कांति व सुव्यक्त भक्ति, यांनीं युक्त ती प्रसन्न मूर्ति पायांतील चाळीचा छन् छन् मंजुळ अवाज, गळ्यातील तंबोरी-तील एकतारेचा मंजुळध्वनी, मोठ्या तंबुऱ्याचे घुमघुमणारे सुस्वरध्वनी, पखवाजवाल्याचा सुरेख ठेका इतक्यांचे बरोबर रीतीनें धोरण ठेऊन होणारें आल्हाद जनक नृत्य व परमेश्वरास परोपरीनें आळवणें हीं पाहून व ऐकून, ऐकणारास वाटे कीं आपण प्रत्यक्ष जयदेवस्वामींचेच तोंडातील अष्टपद्या ऐकत आहोंत. अष्टपद्याचे वेळीं चिंतामणराव उर्फ आबासाहेब जुमडे, वासुदेवराव, पांडोबा गवई, शंकरराव सालकडे, दत्तोपंत डाक्टर, केशवराव गाडगीळ, नरहरपंत देव, सदाशिवराव वगैरे गाणारे शिष्य अष्टपद्यांची साथ करीत असत. यमन, भूप, कल्याण, बिहाग, बागेसरी, भैरवी वगैरे अनेक रागांनीं ह्मणजे एकानें यमन ह्मटला ह्मणजे दुसऱ्यानें भूपाची ताण मारावी तिसऱ्यानें कल्याण राग ह्मणण्यास आरंभ करावा, कोणी बिहागा-चा सुस्वर अवाज छेडावा, कांहीं जण बागेसरीची ताण ओढीत आणि कित्येक भैरवी गात. याप्रमाणें आपआपल्या गायन निपुणतेनें जे ते राग फार अलापदारींत व बहारीत ह्मणत असत. याप्रमाणें चोविस अष्टपद्या निरनिराळ्या रागरागिण्यामध्यें ताणा, आलाप, ठेका, सम यांनीं युक्त असें पद चार चार वेळां ह्मणून, ऐक

आत्मज्ञानाची थोडी तरी साक्ष पटते. असो, त्यांच्या अष्टपद्या श्रवण केल्यानें दुःखिताचें दुःख, श्रमिताचे श्रम, व उदासिनाची उदासीनता नाहींशी होत असें. सर्वांस अत्यानंद होत असें. प्रत्येक अष्टपदीचे षट्काचे वेळीं श्रीराधाकृष्णाचें कडाक्याचें भजन करीत असतां व तद्द्वारें तदाकार चित्तवृत्ति झाली असतां होणाऱ्या श्रमानें थंडीचे दिवसांत सुद्धां महाराजांच्या आंगातून एकसारख्या घामाच्या धारा वाहात असतांना आह्मीं प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. यावरून ते भगवंताचें स्तवन कायावाचामनानें झटून आणि अंतःकरणाचे कळवळ्यानें करीत असत हें स्पष्ट होतें. हा वृत्तांत येथील पुष्कळ लोकांस माहित आहे. आपल्या प्रेमळ व मनोहर आवाजांत कालानुसार निरनिराळ्या रागांत अष्टपद्या ह्मणण्याची महाराजांची ती पद्धत, तो शांत व गंभीर समय, साथीदारांचीं ती सांथ व वाद्याचें कर्णमधुर आवाज यांचें वर्णन किती हि केलें तरीं त्यास प्रत्यक्षतेचें श्रेय देण्यास आमची लेखणी असमर्थ आहे. व त्याबद्दल आह्मी फार दिलगीर आहों तथापि अष्टपद्यांबद्दल अगदींच उदासीन न राहतां जितकें वर्णन आमचेकडून देतां आलें तितकें दिलें आहे. यांतच रसीक वाचकांस त्यावेळची कल्पना होऊन त्यांचे मनाला थोडा बहुत संतोष वाटेल अशी आशा आहे. असो, जयदेवस्वामींनीं जगाचा उद्धार व्हावा ह्या हेतूनें ज्या अष्टपद्या रचिल्या त्यांचा अशा रीतीनें खरा उपयोग महाराजांनीं केला असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. याची प्रत्यक्ष साक्ष अशी कीं, पुढें लोक जयदेवस्वामींच्या अष्टपद्या ह्मणण्याचे ऐवजीं **नारायणबोवांच्या** अष्टपद्या असेंच ह्मणूं

लागले. ज्यामध्यें शृंगारकरुणादि रसिकपणा आहे आणि ज्यांचे मनोभावानें केलेल्या पठणांत सहज समाधि उत्पन्न होते. त्या जयदेवस्वामीकृत गीतगोविंदकाव्याचें निरनिराळया व श्रवण मनोहर रागांत केलेलें पठण महाराजांच्या मुखानें ज्यांनीं श्रवण केले असेल ते लोक भाग्यवान् होत व त्यानांच पूर्णानंदाचा लाभ मिळाला आणि तेंच या जगतांत धन्य होत, असें आह्मांस वाटतें.

## आर्यमाता अथवा नाराणयबोवांच्या मातोश्री.

ज्या भगवान् श्रीविष्णूचे नाभीकमलापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला ज्याचे चरणारावेंदाची सेवा श्रीमहालक्ष्मी करण्यांत निमग्न झाली. ज्याचे संन्निध गरुडासारखा सेवक नेहमीं हात जोडून तत्पर कीं, ज्याला नुसती आज्ञा होण्याचा उशीर ह्मणजे जो आपल्या उज्वल कीर्तिनें त्रैलोक्यांत भराऱ्या मारतों, ज्यानें सहस्त्र फडांनीं पृथ्वी मस्तकावर धारण केली आहे, अशा शेषावर ज्याचें शयन त्याच्या नारायणऋषीनामकआवतारांचें हें आमचें आर्यावर्त. भगवंताचे बहुतेक सर्व प्रसिद्ध आवतार या आर्यभुमींतच झाले अशी समजूत आहे. ती ही आपली आर्यभूमी पृथ्वीमातेची सर्वांत लाडकी कन्या आहे. तिनें आपला सर्वोत्कृष्ट बहुमोल अलंकार जो हिमनग तो तिचे वेणींत गुंफील्यामुळें तिला आवर्णनीय शोभा आली आहे. तिनें आपले उज्वल मुक्ताहार जे गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी इत्यादि पवित्र महानद्या ते हिच्याच गळयांत घातले आहेत.

पृथ्वीवरील सर्व प्रकारची धान्यें व फळें हीच माता प्रसवते. अम्रवृक्षासारखी फळझाडें, चंदनासारखे सुवासिक वृक्ष, चंपक पारिजातक, मालती, केतकी, मोगरा, जाईजुई वगैरे उत्कृष्ट पुष्पवृक्ष व लता या आर्यभूबाहेर क्वचितच दृष्टीस पडतील. अगदीं आतां पर्यंत शूर व शाहाणें राजे, स्वदेशाभिमानी पुरुष, थोर मुत्सद्दी, विद्वन्मणी, शास्त्र विशारद, गणिती, दानशूर, परम भक्त साधु आमच्या ह्या आर्यभूमीतच उत्पन्न झाले, होत आहेत व पुढेही होतील. आमच्यांत वंदेमातरम् अगर माता पितृभ्यांनमः असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. माता हें आद्य दैवत आहे यांत संशय नाहीं. अशा आर्यमातेचे पोटीं ती लाडकी कन्या भागीरथीबाई या येऊन त्यांचे पोटीं **नारायणबोवा रघुनाथ रुद्र** ह्यांचा आवतार झाल्यामुळें त्या मातोश्रीची धन्यता काय वर्णावी ! भागीरथीबाई ह्यांचा सुस्व-भाव असून त्यांचे ठिकाणीं आत्मनिग्रह, शांति, दया, संतोष, सद्वर्तन हे गुण परिपूर्ण भरले होते. त्यांना श्रीमत् भागवत, रामायण, जैमिनीअश्वमेध, पांडवप्रताप, यांतील कथाभाग माहित होता. बाई, महाराजांना नारायण ह्मणून प्रेमानें ह्मणत. महाराज मातृपितृभक्त असे होते कीं जर त्यांचे तीर्थरूप हयात असते तर त्यांनीं कावडीमध्यें दोघानांही घालून काशियात्रा घडविली असती. ज्याप्रमाणें मातापित्यास कावडींत घालून काशियात्रेस जाण्याची तयारी करून श्रावण यात्रेस जाण्यास निघाला, परंतु मध्यें त्याला दशरथाचा चुकून बाण लागल्यामुळें घोटाळा झाला; त्याप्रमाणें बोवासाहेब यांचे तीर्थरूप त्यांचे लहानपणीं सत्यलोकास गेल्यामुळें त्यांना पितृ-

सेवा घडली नाहीं. नाहींतर ते पुंडलिकासारखे मातृपितृभक्त झाले असते. परंतु मातापित्यास कावडींत घालून जें पुण्य केलें असतें त्याचे सहस्त्रपटीनें त्यांनीं आपल्या सत्कीर्तीनें त्या दोघांस काशियात्रेचें पुण्य घडविलें आहे. ही गोष्ट विद्यमानकिर्तीरूपानें प्रगट होत आहे. त्यांतलेत्यांत आपल्या उज्वल प्रेमानें त्यांनीं जी उत्तम मातृसेवा केली; तिचें वर्णन किती ह्मणून करावें ? श्रीरामदासमहाराज ह्यांचे मातोश्रीचें प्रेम त्यांचेवर कसें होतें हें सर्व जगास माहित आहे. त्यांनीं रामदासमहाराजांना प्रपंचांत घेण्याबद्दल त्यांच्या लग्नाचा विचार केला, परंतु रामदास कबूल होईनात; तेव्हां मातोश्रीनें नुसतें ‘ सावधान ’ होईपर्यंत उभा रहा मग तुझे कांहीं काम नाहीं. अशा अर्थी त्यांच्याशीं भाषण केलें व त्यांनीं हि कबूल केलें व सावधान शब्द ऐकेपर्यंत उभे राहून सावधान ह्मणतांच सावध झाल्यासारखें दाखवून आरण्याचा रस्ता धरला. व गोसाव्यासारखें उगीच स्त्रीविरहित न राहतां आपल्या पवित्र आर्यमातेचे पोटीं आल्याचें सार्थक करून आर्यमातेस धन्य केलें. त्याचप्रमाणें भागिरथीबाई ह्यांनीं नारायणरावांना प्रपंचांत घेण्यासंबंधीं फार तगादा लाविला होता, परंतु त्यामाहात्म्यांनीं सांगितलें कीं माझा विवाह तुकारामबोवाचे अभंगाप्रमाणें लावा

**आईबाप दोन्ही जिवेंसी मारावें ।**
**चरण वंदावे बायकोचे ॥**
**बहिणीचें तें लग्न भावाशीं लावावें ।**
**तरिच पावावे मोक्षपद ॥**

काम आणि क्रोध किंवा माया आणि लोभ ह्याचा मला

बिलकूल स्पर्श होऊं नये आणि एका भगवंताचे चरणा शिवाय मला कशाचीही अपेक्षा नसावी अशी मनेच्छा आहे, तेव्हां तुमची मर्जी असल्यास परमेश्वराचे चरणीं माझा नित्य भाव असूं द्या ह्मणजे मी माझा संसार उत्तम झालासें समजेन. त्यांनीं वरील अभंगाप्रमाणें वागण्याचा निश्चय करून मातोश्रीला विनंति केली कीं, संसारीक होण्याची मला अपेक्षा नाहीं; माझी एवढी इच्छा आपण पुरी होऊं द्यावी; याकामीं आडथळा आणूं नये. याप्रमाणें महाराज उदासीनतेनें राहूं लागलें.

भागिरथीबाई ह्यांचा नित्य नेम पहाटेस उठून रामाच्या भूपाळ्या, अष्टकें वगैरे ह्मणून नंतर सूर्योदय झाल्यावर स्नानकरून देवधर्म करावा; भोजनाचे पूर्वी श्रीविष्णूस नैवेद्य समर्पून श्रीविष्णूचें तीर्थ घेऊन अतीतअभ्यागताची पूसतपास करून मग सर्वांना भोजन घालावें व सर्वांचें भोजन झाल्यावर आपण स्वतः भोजन करावें असा होता. दुपारचेवेळीं पौराणिककथा श्रवण करून व फावलें वेळांत स्वमुखानें विष्णुसहस्रनाम व गीता ह्मणून, रात्रौ ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत श्रवण झाल्यावर व भजन ऐकिल्यानंतर महाराजांनीं सेवा केल्यावर त्या निद्रा करित. हा नित्यक्रम अबाधितपणे वृद्धपणांत सुद्धां चालू होता. मनुष्यांचे परमेश्वराकडे लक्ष असण्यास नियम हा पाहिजेच. नियमानें भगवत्चिंतनास कधींच व्यत्यय येत नसून उलट मनुष्याची कांति तेजःपुंज राहाते. त्याप्रमाणेंच मातोश्री भागीरथीबाईची कांति सतेज होती. त्यांच्या सेवेला आवांतर साध्वीस्त्रिया येत असत, पैकीं कित्येक भाविक स्त्रिया त्यांच्या समागमास नित्य असत. यशोदाबाई व सकुबाई ह्यांनीं सदासर्वकाळ त्यांचेजवळ

असून मातोश्रीस स्नान घालावें व देवपूजेची व्यवस्था ठेवावी. सर्व कामें अंतःकरणपूर्वक करून साळुबाई व दगुबाई ह्या त्यांच्या जेवणाची व्यवस्था उत्तम ठेवीत; त्या त्यांना निरनिराळे पदार्थ आपल्या कळवळ्यानें करून घालित असत. सौ. यमाबाई व लक्ष्मीबाई सेवाचाकरी व नित्य चरणतीर्थ ग्रहण करीत. जानकीबाई व सरस्वतिबाई ह्या पौराणिक कथेंतील एखादा भाग सांगून त्यांचें चित्त सदोदित प्रसन्न करीत. बनुबाई, जानकीबाई देवादिकांची उत्कृष्ट गाणीं ह्मणून त्यांचे चित्त सदोदित रंजवीत. व अवांतर साध्वीस्त्रियांनीं त्यांचें दर्शन घेतल्याखेरीज राहूं नये. यामुळें त्या मातोश्रीजवळ सदोदित माणसें असत. ह्याप्रमाणें त्यांच्या वेळच्या साध्वीस्त्रियांचा पाठ अद्यापही बोवामहाराजांचे पुण्यक्षेत्रीं होत आहे. मातोश्री भागीरथीबाई ह्यांचे वेळेपासून गयाताई असून त्या साध्वीचें गंगाजलाप्रमाणें निर्मल अंतःकरण, पवित्रता, शुचिर्भूतपणा, जपजाप्यादि व्यासंग, मधुर भाषण, शुद्धाचरण पाहून फार अल्हाद व हर्ष वाटतो. ह्या पुण्यशील स्त्रीचें आचरण पाहून पूर्वकालीन मुक्ताबाई, जनाबाई, गोणाबाई ह्यांची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. गयाताई ह्या हल्लींही शुभ्र वस्त्र परिधान करून भगवत्चिंतनाकडे सदां सर्वकाळ वेळ घालवीत असतात. त्यांचें नित्य सेवन ह्मटलें ह्मणजे रोज निंबाचापाला व दूध हें आहे, अन्नाचा लेश नाहीं, असें त्यांचे तीव्र व्रत सुरूं आहे. त्यांची थोरवी जितकी वर्णन करावी तेवढी थोडीच होणार आहे. या व्रतामुळें व परमेश्वराकडे सदोदित काळ घालवीत असल्यामुळें त्यांची कांती फार तेजस्वी आहे. असो, आतां महाराजांनीं मातृसेवा कशी केली याबद्दल

थोडेसें वर्णन करूं. महाराज हे मातोश्रीचे आज्ञेंत नेहमीं तत्पर असून त्यांची सेवाचाकरी करून दानधर्म त्यांचेकडून करवीत होते, कोणत्याही गोष्टींत त्यांची सल्ला घेतल्याशिवाय काम करीत नसून त्यांचें मर्जीप्रमाणें वागून त्यांना कधी ही बो-लून दुखवीत नव्हतें.

**तुका ह्मणे मायबापें । अवघी देवाचीं स्वरूपें ॥**

तुकोबारायाचे अभंगाप्रमाणें मातोश्रीचे ठिकाणीं परमेश्वराप्रमाणें ते श्रद्धा ठेवीत होते. प्रत्येकाला जन्म देणारी आई असते पण तिचें ऋण फेडणारा सुपुत्र दुर्मिळच असतो. आणि शुद्ध भावनेने मातोश्रीची सेवा करणारा सत्पुत्र नारायणबोवासारखा होणारा फारच विरळा.

वाचकहो, तुह्मांस असें वाटेल कीं महाराजांनीं मातोश्री भागिरथीबाई ह्यांची सेवा चाकरी करून मातृभक्त झाले व त्या बद्दल वर लिहीलेल्या हकिकतीवरून आज्ञेत वागणें, सेवा चाकरी करणें, दानधर्म, सल्ला मसलत व मर्जीप्रमाणें वागून कधीही न दुखविणें एवढ्यावरून मातृभक्त होतील काय ? होतील, ज्या ठिकाणीं सर्व विचार समतोल आहेत, त्या ठिकाणीं मातृभक्त होण्यास काय हरकत आहे. परंतु तशा समतोल विचारानें आपले कडून सेवा घडत नाहीं ह्मणून मातृभक्त आपल्यास ह्मणतां येणार नाहीं. कित्येक पुत्र मातोश्रीची सेवा तर कित्येक तिला दानधर्मास द्रव्य देणारे आहेत, कित्येक अडचणीचे वेळीं आईची सल्ला घेत असतील तर कित्येक नुसतें तिचें मन दुखवूं नये ह्मणून गोड बोलत असतील. यापैकीं प्रत्येक गोष्ट चांगली आहे. परंतु सर्व गोष्टी समतोल असून धर्मभाव वगैरे गोष्टींचा

विचार जसा नारायणबोवांचे ठिकाणीं परिपूर्ण भरला होता तसा ह्लीं पुत्रांचे ठिकाणीं कोठेंच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. प्रेम आहे तर लक्ष नाहीं, लक्ष आहे तर भाव नाहीं, भक्ति आहे तर धर्म नाहीं. कोठें कांहीं तर कोठें कांहीं हीच स्थिती दृष्टीस पडते. एकंदरींत मातोश्रीचे ठिकाणीं श्रद्धाच जर नाहीं तर तेथें वर लिहिल्याप्रमाणें कसें घडून यावें? व ह्यांना मातृभक्त कसें ह्मणावें? परंतु आमच्या ह्या नारायणबोवांचे ठिकाणीं सर्व गोष्टी समतोल असून मातोश्रीचे ठिकाणीं त्यांची पूर्ण श्रद्धा होती व ह्मणूनच ते पूर्ण मातृभक्त होते. व भक्तियुक्तअंतःकरणानें ते मातोश्रीची यथास्थित सेवा करीत.

धर्म व भाव ह्या दोन्ही वस्तु सर्वत्र असून हि कोठे नाहींत अशा पैकीं आहेत. चंद्रभागेमध्ये बुचकळी मारली तर सप्त जन्माचीं पातकें भस्म होतात. परंतु आभाविकाला त्या चंद्रभागेचें पाणी गलिच्छ नाल्यासारखें वाटतें. धर्म हा भावनेचा पुत्र आहे. भाव तोच देव, भाव तोच धर्म, भाव तोच मोक्ष, भाव नाहीं तर देव नाहीं व मोक्षही नाहीं. भाव धर्माचें सर्वस्व आहे. जेथें भाव नाहीं तेथें कांहीं नाहीं. तो एक अमोलिक पदार्थ आहे. भाविकासारखा भाग्यवंत कोणी नाहीं. भाविकाचें प्रेमजन निराळे दृष्टीनें पाहतात. भाविकाजवळ आनंद, प्रेम, हीं सांठवलेलीं दिसतात. भावानें ज्ञान मिळतें, भावानें धर्मगुह्य कळतें, भावानें पाप जळतें. भावानें अंतःकरणांत ज्ञानसूर्याचा प्रकाश पडूं लागला ह्मणजे अज्ञानतिमिराचा नाश होतो. अज्ञानपटलें नाहींशीं झालीं ह्मणजे मनांत उत्तम विचाराचें जनन होऊन त्यांस सुवासना व

सदसत्‌विचार या जलाचें सिंचन होऊन विवेकाचे अंकूर फुटतात मग सदसद्विचाराचा विस्तार मोठ्या झपाट्यानें होऊं लागतो. सद्वर्तनाच्या रमणीय पुष्पांचा परिमल सुटून तो कीर्तिरूप वाऱ्यानें सर्व जगांत पसरतो; व नंतर सुखाची अमृततुल्य गोड फळें यथेच्छ प्राप्त होतात. असें झालें ह्मणजे मनुष्य आनंदाचे शिखरावर बसून संसारसागरांतील मोठमोठ्या वादळांस भीत नाहीं. दुर्दैवाच्या कितीही प्रचंड लाटा असल्या तरी त्यांस न जुमानितां संसारसागराचे पैलतीरास जाऊन ईश्वरस्वरूपीं तादात्म्य पावतात. महाराजासारखे सत्पुत्र विरळा, तेच आपल्या आर्यमातेस धन्य करितात.

---

## यात्रागमन.

भागीरथीबाई वयोवृद्ध झाल्या नंतर त्यांचे वृद्धपणांत वडील मुलगा शिवरामपंत व मध्यम पुत्र बाबाजी आणि नातु माधव या तिघांस देवाज्ञा झाली; ह्यामुळें त्यांचे चित्तास समाधान वाटत नव्हतें तथापि त्यांनीं पुष्कळ विवेकानें आपल्या अंतःकरणाचें समाधान करून घेतलें. इकडे महाराजांचे मनास थोडी उद्विग्नता प्राप्त झाली तथापि मातोश्रींनीं त्यांचें ही 'आत्मा अविनाशी आहे, या नश्वर देहाचा कांहीं भरंवसा नाहीं, तो केव्हां तरि पिकल्या पानासारखा गळणारच' इत्यादि बोध करून समाधान केलें. तथापि महाराजांस त्यावेळीं थोडी चिंता वाटली असावीसें दिसतें कारण ते नेहमीं ह्मणत कीं मातोश्रीचें कर्म आपल्या हातून घडले ह्मणजे झालें मग कांहीं मला कोणतीही काळजी नाहीं. हा त्यांचा हेतु सफल ही

झाला, कारण पुढें थोडेच दिवसांनीं मातोश्री भागीरथी बाईनीं आपल्या वयाच्या १०२ वर्षीं देह ठेविला व महाराजांनीं त्यांचें उत्तरकार्य करून मातृगया करण्याचा विचार केला. ज्याप्रमाणें बहुतेक लोक आपल्या आईचा उद्धार व्हावा ह्मणून मातृगया करितात, त्याचप्रमाणें इच्छा धरून महाराजांनीं गया केली, असें ह्मणण्यापेक्षां लोकाचार पाळल्यानें जनांस वळण लागावें व अशा संताचे संगतीनें गया पवित्र व्हावी ह्मणूनच कीं काय महाराजांस गया करण्याची बुद्धि झाली; असें ह्मणणें बरें, कारण त्यांच्या मातोश्री भागीरथीबाईनीं आपल्या स्वतःचे आचरणानें व नामस्मरणानें आपला उद्धार आधींच करून घेतला होता. गया हें पवित्र क्षेत्र असून मातृक्षेत्र व पितृक्षेत्र यादोन्हीं स्थानाला गया हें एक नांव आहे. त्या त्या क्षेत्रीं जाऊन पिंड दिला असतां मातापित्यांचा उद्धार होऊन बेचाळीस कुळांचे उद्धार होतात. पापीलोक गेलें असतां सप्त जन्माचीं पातकें भस्म होतात, व साधुलोक गयाक्षेत्रीं गेले असतां संत-समागमानें गयाक्षेत्राचा उद्धार होतो.

तीर्थें व क्षेत्रें हीं शास्त्रोक्त नियमानें पुण्यप्राप्ति आणि चित्तशुद्धिद्वारें फलप्रद व्हावीं ह्मणून आपण करीत असतों. देह आणि चित्त यांच्या शुद्धयर्थ ह्मणून यात्रा करावी असें शास्त्रांत सांगितलें आहे. तथापि वरील गोष्ट प्रापंचिक लोकांस लागू पडते. जे स्वतः सिद्ध आहेत त्यांचा देह सदा सर्वकाळ पवित्रच आहे आणि ते नेहमीं शुद्ध अंतःकरणाचेच असतात. त्यांचें चित्त सदा सच्चिदानंद परब्रह्मस्वरूपीं मग्न असतें व त्यांस दुसरी कशाचीही अपेक्षा नसते असो. महाराजांची मातोश्रीचे

ठिकाणीं निस्सीम भक्ति असल्यामुळें त्या स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांचें कर्म यथासांग घडावें ह्मणून मातृगया-सिद्धपूर येथें जाण्याचा त्यांनीं विचार केला. आणि वाटेंतील प्रसिद्ध पुण्य-क्षेत्रें ही पाहण्याचें त्यांचे मनांत आलें. भाविक मंडळींनीं त्यांचे बरोबर यात्रेस जाण्याची तयारी केली. दिवस नक्की ठर-ल्यावर जाण्यास निघाले. प्रथम धुळ्याहून मुंबईस प्रसिद्ध गवई परशरामपंत बरवे यांचे बिऱ्हाडीं जाऊन उतरले. सर्व मंडळीसह समुद्रस्नान होऊन घरीं आल्यावर व नित्यनेम झाल्यावर परशरामपंतांनीं त्या सर्वांना मोठ्या थाटानें मेजवानी करून त्यांचे पंक्तिचा प्रसाद ग्रहण केला. सायंकाळीं अष्टपद्यास भाविकजन आणि परशरामपंतासारखें बरेंच गायनपटु श्रवणास असल्यामुळें तेदिवशीं अष्टपद्यास अपूर्व रंग आला होता. बरोबरीचे कित्येक यात्रेकरूं लोकांनीं मुंबई शहराचा अपूर्व देखावा अवलोकन केला. महाराजांची कीर्ति ऐकून झुंडिच्या झुंडी दर्शनास येत होत्या. याप्रमाणें मुंबईचा मुक्काम करून पुढें सर्व मंडळीसह ते बडोद्यास गेलें. येथें राव-बहादुर बापुसाहेब गाडगीळ बडोदे संस्थानचे नायब दिवाण ह्यांचे घरीं त्या सर्वांना मेजवानी झाली. बापुसाहेबांनीं त्यांची बरदास्त योग्य रीतीनें ठेविली होती. बापूसाहेब हे नृसिंह सरस्वतीकडे सालाबाद पुण्यतिथीस येत असल्यामुळें महा-राजांचे ठिकाणीं त्यांची पूर्ण भक्ति असे. आवांतर यात्रेकरू मंडळीनें मोठमोठीं स्थलें व प्रसिद्ध देवस्थानें अवलोकन केल्यावर त्यांना फार संतोष वाटला. तेथून सिद्धपुर उर्फ मातृगया ह्या ठिकाणीं तीन दिवस वास्तव्य करून महाराजांनीं तेथें ब्राह्मण भोजन केले. भिक्षुक व दुसरे गरीब याचक यांस

दक्षिणादिकांनीं संतुष्ट केलें. क्षेत्राचे लोक आलेल्या यात्रेकरूं पासून द्रव्य घेण्याचे खटपटींत असतात यामुळें महाराजांनीं कोणासही नाखुष न करितां यथेच्छ दान धर्म केला. नंतर पोरबंदरास सुदामपुरी ह्मणतात. श्रीकृष्णपरमात्म्यानें त्याचें दरिद्य निरसनार्थ द्वारकेप्रमाणें जी सोन्याची नगरी केली तेंच हे पोरबंदर. ह्या देशाचे रीतीरिवाज आपल्या देशाहून फार भिन्न आहेत. तेथील स्थलमाहात्म्याप्रमाणें विधि यथासांग झाल्यावर महाराज द्वारकेस आले. ह्या पवित्र स्थलीं श्रीकृष्णाची भव्य मंदिरें असून नगरांत ठिकठिकाणीं अन्नछत्रें, धर्मशाळा व मठ उत्तम प्रकारच्या व्यवस्थेत असून मंदिरांत प्रातःसमयापासून सायंकाळ पर्यंत पुराणें सांगण्याची विद्वज्जनांची योजना आहे. याकारणानें आलेल्या भाविक यात्रेकरूस या स्थलाची एक प्रकारची रमणीय व अपूर्व शोभा भासते. द्वारकानगरींतील श्रीकृष्णस्वरूप पाहिलें ह्मणजे असें वाटतें कीं जगावर अनेक ठिकाणीं ऐश्वर्य भरलेलें असेल; परंतु ज्या ऐश्वर्याला श्रीकृष्णाचा नित्यसमागम घडून जें धन्य झालें असें एक द्वारकेचेंच ऐश्वर्य आहे. महाराजांनीं श्रीकृष्णाची षोडशोपचारें पूजा करून व प्रत्यक्ष भेट घेऊन नंतर श्रीकृष्णास नैवेद्य समर्पून आलेल्या ब्राह्मणांचा सत्कार करून त्यांस संतुष्ट केलें. द्वारकेचा देखावा सुंदर व रमणीय आहे. शहरांत सर्व प्रकारचा व्यापार असून तेथील लोक नानाप्रकारें दुधाचे पदार्थ करितात. द्वारकायात्रा यथासांग झाल्यावर समुद्रांतून तीन कोस द्वारकाभेट ह्मणून प्रसिद्ध ठिकाण आहे तेथें गेले. येथें ही श्रीकृष्णपरमात्म्याचें मंदिर असून देवाची पूजा वगैरे ब्राह्मणाकडेसच सोंपविली आहे. याठिकाणींसुद्धां श्रीकृष्ण-

परमात्म्याचें वास्तव्य होतें असें ह्मणतात. सायंकाळचे आरतीस मोठा समारंभ असतो. यास्थलीं पाहण्यासारखे चमत्कार व देवस्थानें बहुत आहेत. तेथेंही महाराजांनीं पूजाअर्चा करून नैवेद्य समर्पून ब्राह्मण संतर्पण केलें. ह्या ठिंकाणची यात्रा झाल्यावर सोरटीसोमनाथ ह्या ठिकाणीं प्रसिद्ध ज्योतीर्लींग आहे तेथें गेले. या ही लिंगाचें स्थलमाहात्म्याप्रमाणें महाराजांनीं लघुरुद्र करून ब्राह्मणभोजनादि प्रकार होऊन फिरत फिरत सर्व मंडळीसह ते धुळयास सुखरूप आले.

---

## वैकुंठवास.

आह्मांस महाराजांचे निर्याणाची हकिकत लिहिण्याचा प्रसंग येत आहे याबद्दल फार वाईट वाटतें. असें वाटणें मनुष्य-कोटीस सहाजिकच आहे; व हें एक सहवासाचें फळ आहे. ज्यांचा समागम सर्व आबालवृद्धांस होता त्यांचा आत्मा भूलोक सोडून गेला ह्मणून प्रत्येकांस वाईट वाटणें हे सांगावयास नकोच. त्यांचा आत्मा आपल्यास सोडून गेला येवढ्याबद्दलच वाईट वाटतें. बाकी पंचप्राण कुडीतून गेल्यावर दृश्यात्मकदेह आपले समोर पडला असतोच पण त्याबद्दल आपल्यास कांहीं वाटत नाहीं. अर्थात पंचप्राणात्मक देहाचीच आपण निरंतर अपेक्षा करितो. हे कशामुळें तर आह्मांस तितकी ज्ञानप्राप्ती नसल्यामुळें; व असें वाटणें मनुष्यस्वभावास अनुसरून आहे. पण ज्यांनीं ज्ञानापासून भक्तिमार्ग संपादन केला त्यांना ह्या-बद्दल कांहीं वाटत नसते. तरि अज्ञान जनांस सुद्धां त्यावेळे-पुरते वैराग्य बाणते; परंतु ते निरंतर बाणण्याचें आपल्या आंगीं

सामर्थ्य नसतें; तशी पूर्ण ज्ञानीलोकांची गोष्ट नसते; ते मृत्युला भित नाहींत इतकेंच नव्हें तर पंचप्राणात्मकदेह जरी गेला तरी दृश्यात्मक देहाची किंमत त्यांचे मागें होत असते. भूलोकीं आपण जशी ज्ञानी लोकांची किंमत जाणतो त्याचप्रमाणें सत्य लोकासही त्यांची किंमत असते ह्मणून जर सत्याचे ठिकाणीं सत्यभासतें तर मृत्युलोकीं असत्य कसें भासणार? सत्यच भासलें पाहिजे आणि जें सत्य तेंच निरंतर कीर्तिरूपानें अमर ह्मणून आपण ह्मणतों.

नारायणबोवा रघुनाथ रुद्र हे सर्वप्रकारें ज्ञानवान होते व भक्तिमार्गांत तर त्यांना अग्रस्थानच दिलें पाहिजे. ज्ञानाशिवाय खरी भक्ति नाहीं हें उघडच आहे; व ज्यांना ज्ञान, वैराग्य आहे तें मृत्युला भित नाहींत असा साधारण नियम आहे. नारायणबोवास वैशाख शुद्ध ३ शके १८२३ पासून साधारण ताप येत होता, ताप दोन चार दिवसांनीं ज्यास्त भडकला तरि त्यांचा नित्य व्यासंग स्नानसंध्यादिकर्में हीं चालतच होतीं ज्यावेळीं ज्वराचा अतिरेक झाला तेव्हां शंकरभट सोनगीरकर, दत्तोपंत डाक्तर, केशवराव गाडगीळ वगैरे शिष्यांनीं त्यांना एकंदर मोघमांत पुढील तजवीजी बद्दल विचारिलें. परंतु त्यांनीं सांगितले कीं, मजला ईश्वराचें नामस्मरण व महाराजांचें नांव याखेरीज कशाचीही अपेक्षा नाहीं. कित्येक शिष्यांनीं स्नान न करण्याबद्दल सुचविलें, त्यावर त्यांनीं चोख उत्तर दिलें कीं, देहात्मा शुद्धअवस्थेंत जावा, त्यास मलिनता बिलकुल उपयोगीं नाहीं. तुह्मांस दोन तीन दिवसांत कळेल, असें ह्मणून वैशाख शुद्ध १२ चा दिवस उजा-

डता महाराजांनीं प्रातःकाळीं स्नान करून शिष्य गंगाधर उर्फ महंत यांस विष्णुसहस्त्रनामाचा पाठ करण्यास सांगितला व इतर शिष्यांना श्रीदत्तासमोर भजन करण्यास आज्ञा केली आणि आपण स्वतः पद्मासन घालून संन्यास दिक्षा घेतली व आज्ञा केली कीं, कोणी दुःख न करणें आह्मी आज आनंदसागरांत आहोंत. पुढें नऊ वाजण्याचे सुमारास महाराजांनीं प्राण आकर्षण करून या लोकांचा त्याग करून सत्यलोकी गमन केलें. चतुर्थाश्रम दिल्यावर महाराजांचें नांव पद्मनाभस्वामीमहाराज असें भाऊसाहेब गणपुले ह्यांनीं ठेविलें; कारण समाधिस्त झाले तेवेळीं त्यांची बैठक पद्मासनाची होती ह्मणून हें नांव ठेविलें असावेसें वाटतें. समाधिस्त झाल्यावर त्यांच्या पुढें भजन सुरु होतें. गावांत हाकिकत कळल्यावर मंडळीच्या झुंडीच्या झुंडी येऊन त्यांचें दर्शन घेऊं लागले. कित्येक विमान शृंगारण्याच्या खटपटीस लागले. त्यांस केळीचे खांब व पुष्पांच्या माळा बांधून तें तयार केलें. नंतर त्यांत त्यांना घालून पुष्पाचें हार तुरे त्यांच्या गळयांत घातले. त्यांच्या तीर्थाचें सर्वांवर सिंचन केलें. विमानांत स्वामिमाहाराजांची स्वारी ठेवल्यावर सुमारें १००० १५०० लोक त्यांचे बरोबर होते, शंख, टाळ, घंटा, वाजंत्रीचे थाटांत मिरवणूक निघाली. लोकांनी गुलाल बुका आणि पुष्पें उधळलीं. ह्या दिवशीं पेढें बरफीवाल्याचे दुकानीं अती गर्दी झाली होती. मिरवत मिरवत विस्तीर्ण पटांगणांत पुण्यभूमीवर त्यांना ठेविले. ज्ञानाशिवाय भक्ती नाहीं. खरी भक्ति ह्मणजे ज्ञानात्मक भक्ति होय अशी सत्पुरुषांचीं वचनें आहेत. ज्याप्रमाणें साखरेची गोडी वेगळी काढतां येणार नाहीं त्याप्रमाणें ज्ञानापासून भक्ति वेगळी काढता येणार नाहीं. सत्यवस्तुचें ज्ञान

झाल्याबरोबर स्वाभाविक भक्ति व असत्यवस्तुचा त्याग उर्फ वैराग्य हीं सहज प्राप्त होतात. ह्या देशांत व्यास वाल्मीकी, याज्ञवल्क्य इत्यादि महामुनी झाले. कालिदास, भवभूतिसारखे कवीश्वर, धर्म, नल ह्यासारखे पुण्यश्लोक राजे झाले. भीष्म, द्रोण अर्जुन ह्या सारखे वीरशिरोमणी निपजले. श्रीज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, एकनाथ, ह्यासारखे संत निर्माण झाले. असें ज्ञानी पुरुष होऊन गेल्याला फार काळ गेला तथापि ते कीर्तिरूपानें अमर आहेत; व त्यांचे लोकांस विस्मरण पडणार नाहीं. याच कोटीतिल नारायणबोवा उर्फ पद्मनाभस्वामीमहाराज हे एक होत. महाराजांचे पुतणे वासुदेवबोवा व इतर कुटुंबातील मंडळी यांचे आलेल्या मंडळींनें शांतवन केलें तें असें:—

ज्ञानाच्या योगानें मनुष्यास मृत्युचें भय नाहिसें होतें. अज्ञान जनास प्रत्येक बाह्य वस्तु अविनाशी वाटत असून तिजवर त्याचें उत्कट प्रेम जडलेलें असतें. तिचा आणि त्याचा वियोग झाला असतां त्याला पराकाष्ठेचें दुःख होतें. कोणत्याही वस्तुचे वियोगापासून होणारें दुःख तिचेवर असलेल्या प्रेमाचे मानानें होतें. धनलोभ्यास पैसा बुडाला असतां, भार्यारतास भार्येचा वियोग झाला असतां, पुत्रवत्सलास पुत्राचा वियोग झाला असतां अत्यंत दुःख होतें. पण ज्याला या सर्व वस्तू विनाशी आहेत असें ज्ञान झालें आहे; त्याला त्याचे वियोगापासून तिळमात्रसुद्धां खेद होत नाहीं. ज्याला आरंभ व वृद्धि आहे त्याचा केव्हां तरि ऱ्हास झालाच पाहिजे. हें तत्व ज्याचे मनांत पूर्णपणें बिंबलें आहे त्याला आताचे मरणाचेंच काय पण स्वतःचे मरणाचेंसुद्धां भय वाटत नाहीं. फुटणारें तें फुटणार, जळणारें

तें जळणार, मरणारें तें मरणारच. मृत्तिकेचा घट फुटला ह्मणजे ज्याप्रमाणें शोक करीत बसणें नीट नाहीं, त्याप्रमाणें पंचभूतापासून निर्माण झालेला देह फिरून पंचतत्वास मिळाला ह्मणून शोक करण्यांत अर्थ नाहीं. ज्याप्रमाणें तेल सरलें कीं दिवा विझलाच पाहिजे, त्याप्रमाणें ज्या कारणाचे संयोगानें जीवित्वास आरंभ होऊन त्याचें वर्धन होत असतें त्याचा वियोग झाला कीं देहावसान झालेंच पाहिजे. ज्याच्या अंतःकरणांत कार्यकारणाचा अन्योन्य संबंध नीट बिंबून गेला त्याला मृत्यूची फारशी भीति वाटावयाची नाहीं. हा संबंध समजण्यास ज्ञानाशिवाय दुसरें साधन नाहीं इत्यादि बोध करून त्यावेळीं पुतणे वासुदेव बोवा व कुटुंबांतील मंडळी आणि सेवा करणारे गंगाधर उर्फ महंत वगैरे भाविक शिष्यमंडळींचे आलेल्या मंडळीनें समाधान केलें.

पंच प्राणात्मक देह ह्मणजे देहात्मा; देह आणि आत्मा एकत्र असला ह्मणजे त्यास आपण सजीव ह्मणतो परंतु देहापासून आत्मा निराळा झाला ह्मणजे त्यास आपण स्थूल देहाची उपमा देतो अर्थात देहात्मा ह्मणजे आपले शरीरापासून आत्मा निराळा नाहीं असें ह्मणतो. तो अविनाशी आहे त्याचा भरंवसा नाहीं असला तर तो देहापासून कधींही भिन्न राहात नाहीं. नुसतां देहात्मा असून धकत नाहीं तर ज्ञान हें प्रत्येकास लागत असतें. तो एकत्र असून मनुष्याचे ठिकाणीं मुख्य जो ज्ञानतंतु त्यामुळें ज्ञान होतें. मनुष्यें सजीव असली ह्मणजे आत्मा हा त्याचे ठिकाणीं असतोच परंतु तो समजण्यास ज्ञान लागतें. जर प्रत्येकांस आत्मा सारखा आहे तर सर्व सारखे कां नाहीं?

प्रकृति भिन्न कां असावी? तर प्रत्येकाचें श्रेष्ठत्व जाणण्यास ज्ञानाशिवाय दुसरा मार्ग नाहीं. ज्ञानाची योजना निरनिराळे प्रकारें असल्यानें आपआपल्या पुर्वसंचिताप्रमाणें श्रेष्ठत्वास अनुसरून त्यांचेकडून मोठमोठीं कामें होत असतात. हा ज्ञानाचा विषय मोठा गहन आहे, तो आह्मांला फार उलगडत नाहीं, तथापि थोडा विचार करून हा भाग आटोपता करूं ह्मणजे झालें.

ज्यांचे ठिकाणीं ज्ञानभक्ति पूर्ण बाणली त्यांचा आत्मा भिन्न झाला तरि फक्त स्थुलदेहाची व्यवस्था आपण मोठ्या आस्थेनें करितो व त्याबद्दल कीर्तीरूपानें नांव राहील अशी इच्छा आपणांस होते. हे कशामुळें तर त्यांचे वैराग्यशील भक्तियुक्त प्रेमाचे ज्ञानामुळें. त्यांची ह्या लोकीं सुद्धां वाऱ्याप्रमाणें चोहोंकडे कीर्ति पसरत असते. आपणासही त्यांचे ठिकाणीं उत्कट प्रेम व भाव हीं उत्पन्न होतात. प्रेम व भाव उत्पन्न होण्यास तरि हेंच कारण कीं प्रवृत्तिपासून निवृत्ति पर्यंत कमी अधिक प्रमाणानें ज्ञानाची प्रवृत्ति होतेच, ती झाली ह्मणजे निवृत्तिपर्यंत वैराग्य, ज्ञान सतत चालत असतें. ज्ञानरूप वाऱ्याची झुळुक आपणास होऊन जो वैराग्यज्ञानी झाला आहे त्याबद्दल आपल्यास आस्था उत्पन्न होते व आपण, प्राणात्मक देह अदृश्य झाला तरि त्याबद्दल किर्तीरूपानें नांव राहील अशी तजवीज करण्याबद्दल आपल्यास साहाजिक बुद्धि होते. व निवृत्ति ह्मणजे वैराग्य संसारापासून वृत्तीची पराङमुखता ही निवृत्ति प्राप्त झाली ह्मणजे अहमात्मा ह्या ज्ञानाचा देव होतो. तसें पद्मनाभस्वामि महाराज ईश्वररूप झाले.

———

# श्रीदत्तजयंति.

## सात दिवसांचा उत्सव.

### पुण्यतिथीचें प्रयोजन.

हा वेळ पावेतों महाराजांनीं केलेले चमत्कार, त्यांची भगवद्भक्ति व साधुसंताचे ठिकाणीं श्रद्धा याबद्दलचें विवेचन केलें. आतां जयंतीचें यथामती वर्णन करून ब्राह्मणभोजनाचे ठिकाणीं त्यांची कशी आस्था होती हें थोडक्यांत लिहिणें जरूर आहे. **अधिकाधिक सत्कृत्यें करणें हीच खरी प्रगति समजली पाहिजे,** जसजसें पाऊल पुढें टाकावें तसतसी मानसिक प्रगती होऊं लागतें. कोणत्याहि साधूचा सर्वांत उच्च मनोरथ ह्मणजे आपलें कर्तव्य यथासांग करणें हाच असतो. त्याप्रमाणें महाराजांनीं हळूं हळूं आपली धारणाशक्ति वाढवून ते फार मोठ्या उच्चपदास पोंचलें होते ज्यांच्या प्रथमचे अमदानींत १००-१५० पर्यंतच अन्नसंतर्पण होत असें तेथें हल्लीं हजारों ब्राह्मणास अन्नदान मिळतें. अशी स्थिति होण्यास परमेश्वराचे ठिकाणीं त्यांची निःसीम भक्ति व श्रीनृसिंहसरस्वति ह्यांची पूर्ण कृपा हेंच होय. त्यांना कोणतेही उत्पन्न अगर जाहागीर नव्हती. परंतु मोठे जहागीरदार व श्रीमान लोक सुद्धां जयंतीचे पारण्याचा थाट अवलोकन करून आश्चर्यचकित होत! शिवाय त्यांचा एक निःसीम बाणा हा होता कीं कोणाचें ही, ह्यासंबंधीं देणें असूं नये. तसेंच कोणाकडून द्रव्य आणूनहि

ते प्रयोजन करीत नसत. कारण अशामुळें कोणतेंही मनोरथ सिद्धीस न जातां उलट अडथळा येतो अशी त्यांची समजूत असे. ह्मणून ह्या विषयीं ते अगदीं अलिप्त असत. यावरून त्यांना ऋद्धिसिद्धि साध्य होत्या असेंच ह्मटलें पाहिजे. महाराज दत्तजयंतीचे भिक्षेस कार्तिक शु. १५ ला जाऊन कार्तिक वद्य ३० ते परत येत. या दरम्यान जी त्यांना भिक्षा मिळे त्यावर ते जयंतीचें पारणें करीत. त्यांना भाविक सद्गृहस्थाकडून अगाऊ भिक्षेस येण्याबद्दल आमंत्रणें येत व त्यांच्या इच्छेप्रमाणें जाऊन आपल्या आगमनानें त्यांना ते कृतार्थ हि करीत. प्रवासांत असतांना रोज सायंकाळीं श्रीनृसिंहसरस्वतीचे उपदेशाप्रमाणें ते एक अष्टपदीचें षष्टक ह्मणत असत. त्यांची वागणूक प्रापंचिकासारखी नव्हती. साधूस सर्व दिशा शुभ असतात. नाहींतर कार्तिक वद्य ३० मुद्दाम घरीं कोण येतो; यावरून त्यांची समजूत अशी असें कीं, साखर हा पदार्थ कधीं तरि कडू लागला आहे काय ? कीं तो प्रतिपदेस खाल्ला तर गोड व आमावस्येस खाल्ला तर कडू, ज्याप्रमाणें साखर हा पदार्थ कोणत्याहि दिवशीं ग्रहण केला असतां तो आपली गोडी कायम ठेवितो, त्याच प्रमाणें संतांचें करणें नेहमीं शुभच असतें. भिक्षेचेवेळीं सेवा करणारे पट्टशिष्य गंगाधर उर्फ महंत, शंकर भटजी, सदाशिवराव, अष्टपद्यास साथ करणारी मंडळी हरहमेश प्रवासांत बरोबर असत. भिक्षेहून परत आल्यावर प्रयोजनाचे व्यवस्थेंत शंकरभट सोनगीरकर हे असून ते योग्य रीतिनें व्यवस्था ठेवित व हल्लींही ठेविताहेत. हल्लीसुद्धां मार्गशीर्ष शु॥ ८ पासून गुरुचरित्राचे सप्ताहास आरंभ करून मार्गशीर्ष शु॥ १४ चे दिवशीं समाप्ति करितात. पूर्वी

या दिवसांत गुरुचरित्र रावजीबोवा बेटावदकर वांचीत असत, कित्येक भाविकशिष्य प्रातःस्नान, देवपुजा, पोथी वगैरे आटोपून हातात पळीपंचपात्र घेऊन लगबगीनें महाराजाकडे अगर पोथी श्रवणास येत. कित्येक भाविक बाया आपले घरचें सडासंमार्जन वगैरे गृहकृत्यें आटोपल्यावर स्नान करून आणि तुळशीची पुजा वगैरे करून घाईनें पुजेच्चे साहित्यानिशीं पोथी श्रवणास आणि दर्शन घेण्याकरितां येताहेत. उत्छाहाकरितां मोठमोठे गवई परशरामपंत, शंकरबोवा, पांडोबा आणि पुणेकर हे येत असून गुरु चरित्राची पोथी झाल्यावर प्रत्येक गवयाचे निरनिराळे रागरागिण्यामध्यें दत्ताचीं पदें, टुंबऱ्या, धृपद, अष्टपदी, भक्तिपुरःसर गाऊन करुणा भाकून गात आहेत. त्याचप्रमाणें तबलजीवाले गाणाऱ्या बरोबर ठेका धरून प्रेमांत आल्यानें गवईबोवाकडे पाहून त्यांच्या गाण्याबद्दल आनंद वाटून आनंदानें बोवांचें पद, टुंबरी, धृपद चांगले होत आहे ह्मणून तबला मोठ्या रंगांत वाजवित आहेत. त्यांच्यांतील मार्मिक मंडळी शाबास, भले शाबास वगैरे शद्वांनीं त्यांना गौरवित आहेत. हरदास मंडळी आपल्या हजेरीची केव्हां पाळी येतें असे विचार करून रात्रौ वेळ नक्की ठरल्यावर आपले साथिदार बरोबर घेऊन समयास अनुसरून भाविक व गृहस्थ मंडळींचा समुदाय ज्यास्त आवलोकन केल्यावर उत्तम प्रकारें अनुसंधान लाऊन ऐकणारांचीं मनें भक्तिप्रेमानें आनंदित करीत आहेत. भजनीमंडळी कीर्तन केव्हां आटोपतें आणि आपलें भजनाचें कसब मंडळीस केव्हां पाहण्यास मिळते अशाप्रकारें विचारांत असतां भजनीमेळा ऊभा राहून धुमधडाक्याचे भजनानें लोकांचीं मनें आक-

षिंत करून घेत आहेत; पखवाजी भजनीमंडळीचें कसब टाळ झांजाचे कडाख्यांत रंगांत आलेलें पाहून तो कडाख्यानें पखवाज वाजवून घामोघाम झाल्यानें आलेल्या मंडळीस आपले श्रम दाखवीत आहे. या प्रमाणें जो तो आपली वेळ साधून अनंदाने उत्छाह करीत आहेत.

एकादशी पासून पक्वानाची सुरवात होऊन विश्वनाथ आप्याचे हाताखालीं दुसरी भाविक मंडळी पक्वान्न करण्यांत मग्न आहेत; कोणी साखर मोजून देऊन पाक करण्यांत गुंग झाले आहेत. पक्वानाकरितां मार्तंडराव वरशीकर तूप मोजतो आहे, कांहिजण कढई जवळ ठेवीत आहेत. कित्येक तोंडपाटीलकी करून अहो! पुरे, इतके कशाला, हें जणूं काय आपले घरचेंच कार्य आहेसें समजून जो तो काळजीपूर्वक काम करीत आहे. पक्वान्न तयार झाल्यावर त्यांत खलीव केशर व मसाला घालून भाविक बाया आणि कांहीं विद्यार्थी लाडू वळण्याचे गडबडींत, कोणी, दिनकरराव गाडगिळासारखे ( हे गोडाचे इतके भक्त आहेत कीं पुढें महाराजांनीं यांना लाडूबोवा ह्मणावे व कित्येक मंडळी हल्लीही ह्मणत आहेत. ) लाडू तयार झाल्यावर कोठीवर राहून व्यवस्थने ठेवण्याचे गडबडींत आहेत. कोणी मोगलाईत जाऊन समक्ष दुध काढून आणून गवळ्याजवळून मोजून घेऊन कोठीवाल्यास कळवीत आहेत. याप्रमाणें कोणी बासुंदी आटविण्यांत, कित्येक त्यांत साखर मोजून घालण्यांत; कोणी बासुंदी कितपत झाली हे पाहण्यांत, कांहिं ती व्यवस्थेनें ठेवण्यांत, आणि कित्येक बासुंदि करितां जायफळ उगाळून देण्यांत मग्न आहेत. दुसरी मंडळी स्वयंपाकास लागणारी भांडी आणून,

ठेवण्याचे खटपटींत आहेत. याप्रमाणें प्रत्येकजण आपआपलीं कामें आंगमेहनतीनें व प्रेमानें झटून करीत आहेत. केळा-कमळाच्या गाड्या, केळींचीं पानें, मेथी, वांगी बटाटे ह्यांच्या गाड्या आल्यावर कोणी मोठ्या आढ्यतेनें त्यांस दटाऊन कोण, कोठला, गाड्या कोणी पाठविल्या वगैरे बद्दल विचार पुस करीत आहेत. भिक्षुकमंडळी आणि गृहस्थ केळींचीं पानें चिरण्यांत व तीं व्यवस्थेनें लावण्यांत, कांहीं कढीचे व तुपाचे द्रोण करून ते व्यवस्थेनें ठेवण्यांत दक्ष आहेत व आपआपल्या आनंदानें गप्पा गोष्टींनीं मनोरंजन करून सेवा यथास्थितपणें करीत आहेत. ह्याप्रमाणें मोठ्या आनंदाने प्रेमाची गडबड होत आहे.

खेड्यापाड्यावरिल शिष्यमंडळी एकादशीपासून आपल्यास बहुत मोल प्राप्त व्हावें ह्या हेतुनें सर्व रात्र मार्गक्रमण करून प्रातः-समयीं कोणी बिऱ्हाडाची सोय पाहात आहेत. कांहीं बैल बांधण्याचे गडबडींत आहेत. कित्येक गाडी कोणी घेऊन जाऊं नये ह्मणून चाक काढून ठेवण्याचे धांदलींत आहेत व कित्येक सर्व व्यव-स्थेनें सोय जुळल्यावर महाराजांचे चरणीं मस्तक ठेवण्याकरितां येत आहेत. ह्याप्रमाणें प्रसादाकरितां धुम गर्दी होत आहे.

सौ. लक्ष्मीबाईचे अनुमतानें भाविक बाया आणि लहान मुलीं भाज्या चिरण्याच्या गडबडींत, कोणी विळ्यांचे शोधांत, कांहीं कोशिंबिरी चिरण्यांत, कित्येक नुसती तोंडपाटीलकी करण्यांत तर कोणी धमकाविण्यांत अशा थाटानें तंटे न करितां जो तो सुरळीतपणें काम करित आहे.

श्रीगुरुचरित्राचे सप्ताहाचे दरम्यान रोज पुष्कळ ब्राह्मण-भोजन होत असतेंच.

श्रीगुरुचरित्राचे समाप्तीचे दिवशीं संभावित लोक घोड्याचे तांगे उडवीत पारण्यास कोणी आदले दिवसांपासून तर कोणी अगदीं वेळेवर येऊन जयंतीचा उत्छाह साजरा करित आहेत. गुरुचरित्राची समाप्ति मार्गशिर्ष शुद्ध १४ स होत असते. समाप्ति टाळ, मृदंग, झांजा, घंटा, नगारा, यांचे गजरांत होऊन आलेल्या मंडळीस तीर्थप्रसाद देऊन कित्येक मंडळी फराळाचे गडबडींत आणि कांहीं जण पारण्याचे व्यवस्थेत आहेत. या दिवशीं येथील सुप्रसिद्ध घराणें रावसाहेब गरुड यांचे घरीं प्रथम आमंत्रण देऊन आल्यानंतर गणपतराव अवघड जोशी ( पूर्वाश्रमीचे नांव ) हे महाराजांची आज्ञा घेऊन घरोघर आमंत्रण देण्यांस जात असत. आमंत्रण यथासांग आग्रहपूर्वक करीत. दुपारचे वेळीं भाऊसाहेब किल्लेदार यांचे घरीं राहोबा वाखारकर आणि भाविक मंडळी येऊन रामटेकची विड्याचीपानें मागऊन त्रयोदश विडा करण्यांत मग्न आहेत. विड्याचें सामान फार थाटाचें असें, महाराज जें करणें तें यथासांग करीत होतें. विड्याकरितां सामान केशर मिश्रित चुना, सुवासीक काथ, उत्तम वेलदोडे, लवंगा, जायफळ, जायपत्री, सुपारी, बदाम, खोबरें, कंकोळ याप्रमाणें असून त्यांनीं युक्त असें विडे तयार करीत. सखारामबापु कोतवाल व कित्येक भावीक, सडकेवर पाण्याचे सिंचन करवीत आहेत. कित्येक सडकेचे बाजूवर पंक्तीतून येण्याजाण्याचा वापर होऊं नये ह्मणून बाजूचें रस्त्यावर तट्टे, गाड्या लाऊन ठेवण्याचे गडबडीत आहेत. अशाप्रकारें व्यवस्था आपले इच्छेस येईल त्याप्रमाणें जो तो करीत आहे. कोणी रात्रौ प्रयोजनाचें सामान आणि भाज्या,

कोशिंबीरी व्यवस्थेनें पाकशाळेंत नेऊन ठेवित आहेत. अशा तऱ्हेनें परोपरीची सेवा करून दमलेलीं, थकलेलीं मंडळी घरीं जाऊन विश्रांती घेत आहेत.

पहांटेस तीन वाजतां मोठमोठीं चुलाणीं व भट्या धगधगीत पेटवून स्वयंपाकास आरंभ होऊन पाकसिद्धता सूर्योदईं होत असते. प्रातःकाळीं मोठमोठें संभावितहि प्रसाद घेण्याकरितां झुंडीनें येत आहेत. पुरुष मंडळी स्नानसंध्यादि कर्में आटोपून लगबगीनें येऊन कोणी गुलाल, रांगोळी बरोबर व्यवस्थित याव्या ह्मणून दोरीधरून जागा रेखून हारीनें रांगोळी वठवित आहेत. कित्येक मंडळी पान, द्रोण ठेवण्याचे गडबडींत आहेत. जात-जातिच्या ब्राह्मणस्त्रिया व मुली अलंकारमंडित होऊन प्रातःस्नान करून सेवा घडावी ह्मणून मीठ, चटण्या, कोशिंबीर, भाज्या, बोंडे, पापड, भात, वरण इत्यादि वाढण्यांत निमग्न झाल्या आहेत. याप्रमाणें सर्व पदार्थ पक्वानें व तूप वाढणें झाल्यावर थोडावेळ विसावा घेत आहेत.

तिकडे महाराज परमेश्वराचे सच्चिदानंदस्वरूप मनांत आणून ध्यानस्थ आहेत. आणि सुहास्यवदनानें गुरुमहाराजांस केशर मिश्रीत गंध लाऊन नैवेद्य समर्पून आरति कडाख्यांत करून मोठमोठें भिक्षुक मंडळीचे मुखानें मंत्रपुष्पांजळीचा घोष होऊन वेदपठण सुरू आहे. सर्व प्रकारें व्यवस्थेशीर वाढणें झाल्यावर पंक्तीमध्यें गंगाधराकडून कापुराची आरति फिरून दत्ताचे नावानें वासुदेवबोवानें संकल्प केल्यावर श्रीगुरुदेवदत्त या नांवाची मोठ्यानें गर्जना होऊन पहिली पंगत सकाळीं नऊ वाजण्याचे सुमारास भोजनास बसते. मंडळी भोजनास बसल्या-

वर दुहेरि चौघडे सुरू आहेत. त्याचे अवाजानें मंडळिचीं मनें आनंदित होत आहेत. कित्येक लोक हौसेनें बंदुकाचे अवाज करीत आहेत. कोणी पंक्तिचे फोटो घेत आहेत. याप्रमाणें थाटांत पंगत होत असून दक्षणा व त्रयोदशगुणी विडे देणें झाल्यावर पंक्तित समाचार घेण्याकरितां येथील प्रमुख मंडळी पंक्तिमध्यें कोणास कांहिं कमतरता पडूं नये ह्मणून आग्रहानें मेजवानीचे थाटाप्रमाणें आग्रह करून वाढवीत आहेत. याच-वेळीं बसलेल्या पंक्तीस शेकडों लोक झुंडिच्या झुंडी पुरुष आणि बाया प्रदक्षणा करून महाराजांचें नांवानें गर्जना करून धांवत आहेत. ह्याप्रमाणें अठरापगड जातीस अन्नदान मिळतें. हल्लीं ही महाराजांच्या वेळीं जसा उत्सव होत असे तसाच मोठ्या थाटांत होत असतो; त्यांत आणखी महाराजांच्या पुण्यतिथीची भर पडली आहे.

---

## पालखीची मिरवणूक.

आजच्या दिवसाला आपणांस देववेळा ह्मणण्यास काय हरकत आहे ? पूर्वदिशा आरक्त झाली, पक्षीं किलबिल करूं लागून या झाडावरून त्या झाडावर उडूं लागण्याचे बेतात आहेत. कोकिळा आम्र मोहरावर बसून मंजुळ शब्दानें शब्द करीत आहेत. सकाळचे वेळी मंद, शीतल आणि सुगंधित वायू सर्वांस आपला लाभ याचवेळीं देत असल्यामुळें सर्व प्राणि-मात्र प्रसन्न चित्त झाले आहेत. आज पालखीची मिरवणूक असल्यानें जिकडे तिकडे आनंदी आनंद दिसत आहे.

सात दिवस मोठा नाम सप्ताह होऊन वैशाख शुद्ध १३ रोजीं पालखीची मिरवणूक होत असते. गांवचे व पुणें उमरावती वगैरे दूरदूरचे लोक श्रीपद्मनाभस्वामींचे पुण्यतिथीस मोठ्या उत्साहानें येत असतात. पुण्यतिथी वैशाख शुद्ध १२ रोजीं असते त्रयोदशीस पालखी फिरते. नामसप्तहास सखारामबोवा नगरकर हे येत असून त्यांचें भजन फारच प्रेमळ असतें. भजनश्रवणानें मंडळीचीं मनें तल्लीन होऊन जातात. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम आणि सद्गुरुनाथस्वामिमहाराज या संतांचें नामस्मरणाच्या जयघोषानें चारीदिशा दुमदुमून जातात. त्यांची सत्ता कर्तबगारी वगैरे गुणांची वाखाणणी क्षुद्र मानवानें काय करावयाची? ते लोक सारेच अवतारी, धर्मरक्षणासाठीं अटाटी करणारे माहात्मे त्या सर्वांनीं आपआपल्या भक्तासह एकत्र महाराजांचे चरणी नमावयाचा प्रघात पाडल्यामुळें लाखो जीवांचा उद्धार होण्याचा मार्ग सुगम झाला आहे. ज्ञानोबामाऊली तुकाराम या प्रमाणें या लोक नायकांचे नामाचा घोष करून जीव कृतार्थ होतात. पुण्यांतील सुशिक्षीत लोकांचे समुदाय येथील पालखीस सामोरा येतात. धर्म, रहस्य आणि धर्म माहात्म्य यांचे पोवाडे गात असतात.

कचेरी, कोर्ट, शाळा, पांचवांजतां बंद होऊन लोक घरीं आल्यावर श्रीपद्मनाभस्वामीमहाराजांचे पालखीस येतात. भजनाचा नामघोष सुरु असतोच. गोपाळकाला झाल्यावर पालखीस जरतारी गोंडे मश्रूच्या गाद्या, गिरद्या वगैरे लावून सुशोभित करून त्यांत महाराजांची मूर्ति ठेविल्यावर

श्रीपद्मनाभस्वामि महाराजकी जय, पुंडलीकवरदे हारिविठ्ठल वगैरे नामस्मरणाचा जयघोष सारखा चालू असतो. पुण्यांतील सुप्रसिद्ध अण्णासाहेब पटवर्धन ह्यांनीं पालखी उचलल्यावर सर्व मंडळी पालखीस हात लावितात. नामसंकीर्तनाचे जयघोषांत ती उचलतात, हजारों मंडळीचा समुदाय जमलेला असतोच, पालखीपुढें रस्त्यानें सखारामबोवा नगरकर यांचे भजनाचा तडाखा सुरु असतोच. महाराजांचें भगवें निशाण घोड्याजवळचे इसमाजवळ असते. आणि डंका वाजविणारा घोड्यावर सज्ज असतो. हा सर्वांचे पुढें असून त्यामागें वाजंत्र्याचा चौघडा केळीचे खांबानें श्रृंगारलेला सुस्वर आवाज करीत असतो. सनयांतून निघालेले रागदारीवर सुस्वर सूर रसिकलोकांस आनंद देत असतात. लेजीम व दांडपट्टे यांचे आखाडे बरोबर असून त्यांचे मर्दानी खेळ सुरु असतातच. या दिवशीं हलवायांच्या दुकानीं कलाकंद, बर्फी, पेढे वगैरे उत्तम बनविलेले पदार्थ तबकामध्यें व्यवस्थेनें सजऊन भाविकजनास घेण्याकरितां ठेविलेलीं असतात. उत्तमोत्तम सुवासिक फुलें महाराजावर उधळितात. कपाळी गुलाल असणारी मंडळी रस्तोरस्ती दृष्टीस पडतात. रस्त्याचे बाजूकडील माड्या व धाबीं स्त्रिया व मुलें यांनीं भरून गेलेलीं असतात. पालखी जाण्याचा रस्ता इतका गजबजून गेला असतो कीं फार गर्दी असते. जय श्रीपद्मनाभस्वामिमहाराजकीजय असा नामघोष सर्वांचे मुखांतून सारखा चालू असतो. यामुळें जिकडेतिकडे मंगल दृष्टोत्पत्तीस येतें. पालखीस अर्ति देणाराची अति गर्दी होते. हा सर्व चमत्कार पाहून आपण आनंदसागरांत पोंहत आहों असें प्रेक्षकास वाटून मन गहिवरतें. पालखीची मिरवणूक श्रीपद्मनाभस्वामिमहाराजाचे ठिकाणा-

वरून पुलाचे बाजूनें श्रीज्ञानोबाचे देवळावरून जाऊन नंबर दोनचे शाळेवरून फिरून नगरपट्टीवरून रावसाहेब भानगांवकर यांच्या वाड्यावरून कोपऱ्यावर वळल्यावर खोलगल्लींतून थेट समोर जाऊन सरकार चावडीकडे वळून आग्रारोड सडकेनें नीट श्रीपद्मनाभस्वामिमहाराजांचे ठिकाणीं पुन्हां उजेडाचेवेळीं थाटांत परत येते. नंतर आरति वगैरे होऊन प्रसाद घेऊन मंडळी बिऱ्हाडीं परत जातात. जय पुंडलिकवरदेहरिविठ्ठल, श्रीज्ञानदेवतुकाराममहाराजकी जय, श्रीसद्गुरुनृसिंहसरस्वतिस्वामिमहाराजकीजय श्रीपद्मनाभस्वामिमहाराजकीजय.

**योगाभ्यास उपासना जपतपानुष्ठान देव.चँनँ ॥**
**ब्रह्मज्ञ.न असाध्य जें मुनि जनां. तें नाम संकीर्तनें ॥**
**सत्संगें अपरोक्ष लाभ सहजीं जोडे हरे वासना ॥**
**ऐसें दैवत कोण अन्य जगतीं श्रीपद्मनाभाविना ॥**

---

## उपसंहार--शेवटगोड.

प्रभाताचा समय फार रमणीय असतो. याच वेळेस मुमुक्षुजन नामस्मरण स्तोत्र पठण करीत असतात. शुचिर्भूत ब्राह्मणांचीं स्नानें होऊन देवपुजा वगैरे ब्रह्मकर्म होत असतें. गुरुगृहीं मुलांचीं अध्ययनें सुरूं होतात. सुवासिनी स्त्रिया सौभाग्यालंकारांनीं मंडित होऊन घरोघरीं दारापुढें आणि देवापुढें रंगवल्लिका ( रांगोळ्या ) काढित असतात. गवई लोक भैरवींत सुंदर आलाफ घेत असतात. मोठमोठ्या देवस्थानांतून चौघडे चालू होत असून त्यायोगें गानरसज्ञांचीं कर्णेंद्रियें तृप्त होऊं लागतात. याप्रमाणें होत आहे तोंच पूर्व दिशा आरक्त झाली

ह्मणजे वत्स भेटावें ह्मणून गाई हंबरतात. देवस्थानात अनेक प्रकाच्या:र सुवासिक पुष्पांनीं तबकें भरून पूजेकरितां ठेविलीं असल्यामुळें तेथें सुगंध फार दर्वळून राहत असतो. जिकडे तिकडे बगीच्यातील झाडावर टवटवी दिसते. विद्यार्थीजन शाळेत जाण्याचे गडबडींत असतो कर्मनिष्ठ अर्घ्य देण्याचे बेतात आहेत तोंच सूर्यनारायण आपल्या कोवळें किरणानें मोठमोठ्या मंदिरांच्या सुवर्णकळसावर तेज पाडितो. मोठमोठे वृक्ष टवटवीत व हिरवेगार होऊन जातात, व्यापारी लोक आपापली दुकानें उघडून काम करण्यास उद्युक्त होतात. याप्रमाणें सकाळचा वेळ सौख्य सामुग्रीचा उत्पादक असल्यासुळें प्राणीवर्गास महादानंद प्राप्त होणे हें अगदीं सहाजिकच आहे.

श्रीपद्मनामस्वामीमहाराजांची समाध पांजरा ह्मणजे पार्वती नदीचे तीरावर विस्तीर्ण अशा जागीं आहे. यामुळें तिला एक प्रकारचें विलक्षण सौंदर्य आले आहे. स्नानसंध्याशील नेहमी गंगेवर जाणारे लोक शुचिर्भूत होऊन महाराजांचे दर्शनास येतात. भाविकबाया नदीवरून परत येत असतांना महाराजांचें दर्शन घेतात, सकाळपासून सायंकाळ पर्यंत स्त्रीपुरुषांची तेथें दाटी असते. संस्थानची व्यवस्था नीट सुरळीत चालावी ह्मणून मंडळीचे अग्रहानें प्रथम पालखीचे मिरवणूकीचे दिवशीं वासुदेवबोवा महाराजांचा प्रसादछाटी घेऊन, समाधीची पुजा, अर्चा, नैवेद्य वगैरे नीट सुरळीत चालवीत आहेत. भक्तिमार्गाचे नियमाप्रमाणें रोज काकडआरति, भजनपूजन, पोथी, अष्टपद्या होत असतात. महाराजांची शिष्यशाखा गांवोगांवीं असून त्यापैकीं येथें असलेलें रोज दर्शनास आणि अष्टपदी

भजनपुजनास येत असतात. निरंतर सेवेला असणारे पट्टशिष्य गंगाधर उर्फ महंत समाधीस स्नान घालणें, पूजा, धुपारति ज्ञानेश्वरी, शेजारति वगैरे कामें महाराजांचे वेळेंपासून शुद्धांतःकरणानें करीत आहेत. त्यांस मोरोपंत शिष्य हे मदत करित असतात. हा व्यवसाय नित्याचा असून दोघांची महाराजाकडे सेवा यथास्थितपणें होत आहे. समाधीपुढें पुराण येथील श्रीकृष्ण भंडारी हे सांगत असून भाविक स्त्रीपुरुषांची त्यावेळीं दाटी असते. श्रोतृसमुदायावर त्यांच्या सांगण्याचा ठसा चांगला उमटतो. तसेंच सकाळचे वेळीं हे भक्तियुक्तान्तःकरणानें श्रीमत् भागवताचे श्लोक वाचीत असतात. सौ. लक्ष्मीबाई आलेल्या भाविक बायांचें अदरातिथ्य करितात व त्यांना गौरवितात आणि वासुदेवबोवा आलेल्या संत, भाविकमंडळीचा आदर करितात.

समाधीचे जागेची चतुःसीमा पूर्वेस पार्वती नदीस जाण्याचा रस्ता व पुढें मोठा पूल, पश्चिमेस श्री. विष्णु वामन पाताळे ह्यांचा बगीचा, दक्षिणेस पुंजाजी नाईक ह्यांनीं समाधीस अर्पण केलेली जागा, उत्तरेस पार्वती नदी ह्याप्रमाणें आहे.

श्रीपद्मनाभस्वामिमहाराजांची समाधी कोणत्या ठिकाणीं बांधावी याबद्दल मंडळी विचार करूं लागली तेव्हां प्रथम खोल गल्लीतील गणपुले यांचे घरींच समाधी द्यावी असें कांहींचे ह्मणणें पडलें परंतु तें ठिकाण कित्येकांस नापसंत वाटल्यावरून त्यांनीं शंकर भट सोनगीरकर यांस नदीतीरावर जागा असावी याबद्दल सुचविलें. ईश्वरीघटणा अशी चमत्कारिक आहे कीं त्यावेळेंस मोठ्या मंडळींत प्रेरणा होऊन मंडळीपैकीं बाळाभाऊ जोशी वकील आणि कित्येक सद्गृहस्थ हे मेहरबान मोरो चिंतामण

जोशी हुजूर डेप्युटी कलेक्टर ह्यांचे बंगल्यावर जाऊन त्यांस विनंति केली कीं या महात्म्यास नदीकिनारी जास्त शोभा येईल सबब तेथें समाधी व्हावी. त्यांनीं येथील सुप्रसिद्ध बाबासाहेब गरुड ह्यांचा सल्ला घेण्याबद्दल कळविलें. ते समक्ष आले आणि त्यांनीं म्युनसीपालटिचे व्हाईस प्रेसिडेंट ह्या नात्यानें ती जागा पसंत करून जागा नक्की ठरविली आणि त्या ठिकाणीं त्यांना समाधी दिली.

नंतर आण्णासाहेब बर्वे व रावसाहेब अगाशे हेडमास्तर ह्या दोघांनीं इतर सर्व गृहस्थांचे अनुमताने त्याच ठिकाणीं विचार ठरवून ज्या माहात्म्याचे पुण्याईनें हजारों ब्राह्मणभोजन एकसारखें घडत आलें आहे, त्यांची कांहीं तरी व्यवस्था प्रथम पासून सुरळीत चालावी ह्मणून त्यांचे पुतणें वासुदेवबोवांस पुजाअर्चा, भजन, पूजन सुरूं ठेवण्याबद्दल सांगितलें व त्या प्रमाणें त्यांनीं ती गोष्ट अंतःकरणापासून मान्यकरून आज पावेतों तजविज ठेवित आले. ह्यानंतर अण्णासाहेब बर्वे व भाऊसाहेब किल्लेदार यांच्या खटपटीने पुंजाजी महादजी नाईक ह्याना समाधीचे दक्षीण बाजूकडील बखळ जागा महाराजांस अर्पण करावी अशी प्रेरणा होऊन वर आणखी सर्वे नंबर ६०० पैकीं पोटनंबर २ सुमार आठ गुंठे जमिनीचा एक तुकडा तारीख ४ जून सन १९०१ रोजीं त्यानीं उदार मनाने समाधीस अर्पण केला; ह्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. त्याठिकाणीं हल्लीं पाकशाळा बांधिली असून राहिलेल्या भागांत छोटासा बगीच्या राहोबा वाखारकर यांच्या मेहनतीनें झाला आहे. तेथें सुवासिक फुलें होत असून तीं महाराजांस पुजेच्या वेळीं अर्पण होत असतात.

समाधीचे जागेची व्यवस्था झाल्यानंतर गणपतराव गरुड, दादावकील आणि बापुराव नाईक ह्या तिघांनीं खटपट करून महाराजांस छाया व्हावी ह्मणून तातपुरती छपरी करून दिल्यामुळें भजन, पूजन, अष्टपद्याबद्दल चांगली सोय झाली. सभामंडपाकरितां जागा असावी याबद्दल संभावित मंडळीच्या मनांत आल्यावरून त्यांनीं वासुदेवबोवास म्युनिसिपल कमेटीत अर्ज देण्याबद्दल कळविल्यावरून म्युनिसिपालटीतून मेंबरलोकांचे अनुमतानें ताब्यांत असलेली जागा लांबी फुट ७० रुंद फुट २६ सभामंडपाकरितां ह्मणून तारीख ९ फेब्रुवारी सन १९०३ रोजीं मिळाली.

जागा मिळाली पण तेवढ्या जागेंत अडचण होऊं लागली ह्मणून मंडपाचें काम तहकूब ठेऊन फक्त समाधीचें बांधकामास सुरुवात करून हल्ली तें चित्रविचित्र रंगांनीं युक्त देवळें वगैरेचें नकशीदार सुरेख काम झालें असून तें पाहण्यालायक सुबक आणि उत्तम झालें आहे. आणि समोर श्रीदत्ताचीमूर्ती सुंदर ध्यान असलेली आहे.

समाधीचे मागील बाजूस विष्णु वामन पाताळे सावकार ह्यांची जागा असून त्याठिकाणीं बगीचा होण्यासारखा आहे. तेवढीं जागा ते समाधीस अर्पण करतील तर त्यांना मोठें श्रेय घडणार आहे.

सभामंडपात आणि ब्राह्मणभोजनास संस्थानाला कायमची मोठी जागा आणि विस्तीर्ण पटांगण असावें ह्मणून पुण्यातील सुप्रसिद्ध आण्णासाहेब पटवर्धन यांचे मनांत आले. त्यांनीं येथील विद्यमान थोर गृहस्थांचा या कामांत सल्ला घेतला.

पण ज्या मंडपास हातभर सुद्धां जागा ज्यास्त मिळत नाहीं तेथें येवढें मोठें पटांगण मिळणें दुरापास्त आहे असें येथील मंडळीनें कळविलें. पण ह्या कामांत खटपट सुरू ठेविली असतां महाराज यश देतील असें रा. आण्णासाहेबांनीं दृढतर भाषणानें सांगून मंडळीस खटपट करण्यास लाविलें व अंतीं महाराजांच्या पुण्यप्रतापानें व कृपेनें या खटपटीस यश आलें. उत्तरेकडील भव्य व विस्तीर्ण पटांगण समाधीस मिळालें.

ह्याजबद्दलची थोडक्यांत हकिगत निवेदन करणे जरूर आहे, ती ही कीं, धर्मशाळा व त्या पुढील पायरस्त्यापर्यंत चौफेर जागा विकत मिळण्याविषयीं कमेटीस संस्थानाकडून एक अर्ज दिला गेला. पहिल्यानें सदर्हु विषय कमेटी पुढें निघून धर्मशाळा लोकलबोर्डाची असल्यामुळें विकता येत नाहीं. असा अक्षेप निघून जागेचें प्रकरण तसेंच तहकुब राहिलें. पुढें कांहीं दिवसांनीं शोधकेल्यावरून सदर्हु जागेंत असलेली धर्मशाळा ही कमेटीची आहे असें नजरेस आल्यावर तें प्रकरण पुन्हां कमेटीपुढें निघालें व सदर्हु जागा देण्यालायक आहे किंवा नाहीं व धर्मशाळेची आणि जागेची किंमत वगैरे ठरविण्या करितां जनरल कमेटीतून एक सबकमेटी नेमिली गेली. त्या कमेटींत मेहेरबान शेफर्डसाहेब बहादुर कलेक्टर व प्रेसिडेंट म्युनिसिपालटी, मे. लँबर्टसाहेब बहादुर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेन्ट पोलीस, मेसर्स शंकरराव देवभानकर, कृष्णराव गरुड, यादवराव निफाडकर हे मेंबर होते. वरील गृहस्थांनीं ती जागा समक्ष पाहिली. त्या दिवशीं मे. कलेक्टरसाहेब हे सरकारी कामांत गुंतळे असल्यामुळें त्यांनीं सदर्हु कमेटी चालविण्याचा अधिकार

मे. लॅंबर्ट साहेबांस दिला त्याप्रमाणें त्यांनीं जागा पाहून व धर्मशाळेपासून लोकांची गैरसोय होणार नाहीं असें पाहून व सर्व जागा चौफेर विस्तीर्ण पटांगण अवलोकन करून नदी किनाऱ्याला जाणारा रस्ता हा नदींतून समोरच्या रस्त्यास मिळून देण्याचे संस्थानाकडून व्यवस्था झाल्यास विस्तीर्ण पटांगणाचे चौफेरा सुद्धां सर्व जागा सार्वजनीक कामाकडे देण्याचे त्यांनीं कमेटीस सुचविलें. त्याप्रमाणें धर्मशाळा व रस्ता संस्थानास विकत दिला. व बाकीचें पटांगण सार्वजनिक आरामाकरितां बाग लावण्याचे संस्थानचे वहिवाटदार यांनीं कबूल केल्यास ती जागा त्यांचेकडे ठेवावी अशी कमेटीस औदार्याची सूचना केली. या सूचनानुरोधानें सर्वानुमते ती जागा संस्थानाकडे देण्याचे ठरलें. परंतु त्या जागेंत शेफर्ड-गार्डन करावा ह्मणून वासुदेवबोवास कळविल्यावरून त्यांनीं हि शेफर्डगार्डन करूं ह्मणून उत्सुकतेनें कबुल केलें. ता. १५ आगष्ट १९०६ रोजीं मेहेरबान कमिशनरसाहेबबहादूर ह्यांचे कडून मंजूरी आली, संतांचा प्रभावच असा किं परधर्मी-यांची हि त्यांचे ठिकाणीं श्रद्धा असावी. असो, वाचकहो हल्लीं सभामंडपाचे आणि मिळालेल्या पटांगणाचे दगडी बांधीव काम व्हावयाचें असून तें थोडक्या दिवसांत सुरूं होणार आहे. आमचे येथील श्रीधरनाना केळकर उर्फ नानासाहेब फडणीस यांनीं दोन वर्षांची फर्लो रजा श्रीपद्मनाभस्वामिमहाराज यांचे कामा करितांच घेतली होती. परंतु प्रपंचांतील अपरिहार्य कारणामुळें सदहुं काम लांबणीवर टाकावें लागलें तरि ह्या बद्दल सतत उद्योग ते मनांत बाळगून आहेत आणि सदहुं काम करण्याचें त्यांचे मनांत आहे. जर त्यांनीं ह्या मोठ्या

कामाचा पुढाकार घेण्याचें श्रम घेतलें तर परमेश्वर त्यांना त्या कामांत पूर्ण यश देईल अशी आमची समजूत आहे. असोः—

महाराजांचे कृपारूपदीपाचे उजेडानें मी जो हा ग्रंथ लिहिला आहे त्याचें वाचक मनापासून मनन करतील अशी अशा आहे. इंद्रियातीत जें ब्रह्मज्ञान तें मी काय वर्णावें, परंतु तें जर प्राप्त झालें तर जी गोष्ट दृष्टीस न पडणारी ती दृष्टीशिवाय दिसते. ह्मणजे त्यांचें चरित्र वांचून त्यांतील गोष्टी साधार आहेत हें कळून येईल. जर दैवयोगानें हातास परीस लागला तर किमयागारास जें न मिळणारें सोने तें लोखंडांत सांपडतें. असें जर आहे तर सद्गुरुची कृपा झाल्यास काय प्राप्त होणार नाहीं? त्यांची सत्ता आणि कर्तबगारी अवर्णनीय आहे. ते कोणास काय सद्बुद्धि देतील याचा कांहिं नेम नाहीं. सर्व कांहीं त्यांच्याच कृपेनें होत असतें. हें चरित्रहि त्यांच्याच कृपेचें फल आहे. त्यांच्याच कृपेनें मी बोलतो, त्यांच्याच कृपेनें अल्पमतीनें चरित्र लिहीण्यास आरंभ केला आणि त्यांच्याच सत्तेनें तें पूर्णहि झालें आहे. असें हें चरित्र श्रीगुरुकृपेनें आणि श्रीदाशरथीरामाच्या प्रेरणेनें, यश, श्री, औदार्य, ज्ञान ऐश्वररूपी पंचरत्नांनीं विभूषित जे महाराज त्यांचे चरणी समर्पणकरून त्याचें पठण यशस्वी होवो येवढी प्रार्थना करून लेखणी खालीं ठेवितों.

**क्षेत्रें दिव्य मनोहरें हरिहरें स्थानेबहु आसती ॥**
**देवाच्याच चमत्कृती अतिशयें ज्या त्या स्थळीं वर्तती ॥**
**भक्ताचा महिमा प्रकाशवी, करी विख्यात साधूजना ॥**
**ऐसे दैवत कोण अन्य जगतीं श्रीरामचंद्राविना ॥**

श्रीरघुवीर समर्थ.

**पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—**

गोपाल कंपनी, आग्रारोड–धुळें.

दामु आण्णा दुगल, आग्रारोड–धुळें.

आत्माराम छापखाना–धुळें.

**किंमत आठ आणे शिवाय. ट. ह. व्ही. पी.**